UNIVERSAL
LIBRARY
OU_192897
UNIVERSAL
LIBRARY

॥ महाराष्ट्र-साहित्य-लेखक-ग्रंथमाला ॥

पुष्प १३ वें

( पुस्तक २ रें )

# मानवी हृदय !

( स्वतंत्र सामाजिक कादंबरी )

लेखक,

गंगाधर रामचंद्र साने, बी. ए. बी. टी.

अभिप्राय

श्री. यशवंत गोपाळ जोशी.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

प्रथमावृत्ति ] किं. १२ आणे [ १९३८

प्रकाशक —
**गं रा साने** बी ए बी टी
संपादक, महाराष्ट्र-साहित्यसेवक-
ग्रंथमाला, १७, पेडसेचाळ,
सदाशिव, टिळकरोड, पुणे २

CHECKED. 1951
CHECKED 1956
Checked 1965
Checked 1969

मुद्रक —
**शंकर नरहर जोशी,**
'चित्रशाळा' प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

## । समर्पण ।

प्रस्तुत पुस्तकांत पुरस्कारिलेली
विविध विषयांवरील विचारसरणी
मान्य असणाऱ्या
व
तिच्यासाठीं
काया-वाचा-मनानें व धनानें झटणाऱ्या
थोर महात्म्यांच्या
चरणीं

—गं. रा. साने.

# अभिप्राय.

माझे स्नेही, माझे पहिले प्रकाशक व किंचित् अतिशयोक्तीने म्हणायचे झालें तर मला लेखक बनविणारे माझे प्रेमळ स्नेही श्री गंगाधरपंत साने याच्या "मानवी हृदय" या कादंबरीबद्दल लिहिताना पहिल्यादा मला थोडे आदराने थाबलेच पाहिजे

श्री साने याना माझ्यात काय वाटले कुणास ठाऊक, पण माझ्याकडून माझी पहिली कादबरी "हिरकणी" लिहून घेऊन त्यानीं छापली अत्यंत कष्टाने व त्यागपूर्वक चालविलेल्या स्वत च्या मालेत—स्वत चें लेखन थोडें बाजूला ठेवून केवळ 'काहीतरी चागले वाटले' म्हणून एखाद्या नवशिक्या लेखकाकडून कादबरी लिहवून घेऊन ती छापण्याचे धाडस करणें याला फार महत्त्व आहे!

श्री गंगाधरपंत साने याची "मानवी हृदय" कादंबरी मीं समग्र वाचली आणि मला ती फार आवडली! कारण त्यात हृदयाचा प्रामाणिकपणा फार आहे! 'विशिष्ट विषयाला' आज बाजारी महत्त्व आहे म्हणून त्या विषया-संबंधाने विनाकारणच लेखणी झिजविणारे व नंतर फजित होणाऱ्या लेखका-पेक्षा आपली आहेत ती मते आणि विचार प्रामाणिकपणाने माडणे याला जास्त महत्त्व आहे आणि तो गुण श्री साने याच्या 'मानवी हृदय' या कादंब-रींत भरपूर प्रमाणात आहे!

पण श्री. साने यानी 'मानवी हृदय' ही कादबरी लिहिली आहे असें म्हणण्यापेक्षा श्री साने याचे अभ्यासानें दृढ झालेले विचार सागण्याकरता त्यानी कादबरीस्वरूपाचा नावापुरता आश्रय केला आहे

आपल्या घरात जशा आपण देवादिकाच्या तजबिरी लावतो त्याप्रमाणें श्री साने यानी अनेक संतकवींचीं व सत्कवींची वचनें "मानवी हृदय" या कादबरींत जागोजागीं विखुरलीं आहेत

मानवी स्वभाव स्खलनशील आहे हें जरी खरें असले तरी अशा स्खलनशील पात्राबद्दल सहानुभूति दाखविण्यापेक्षा-जणुं ती पापे आपणच केली आहेत इतक्या अभिनिवेशानें-त्याची म्हणण्यापेक्षा-त्या पापाची वकिली करणें-फारसें श्रेयस्कर नाहीं. आणि तसला आजतागायत लेखकाचा अभिनिवेश श्री साने याच्या या कादंबरींत बिलकूल नाही!

आपल्या हातून चुकले-वाईट वाटले-पुन्हा चागल्याची आस धरली-अशा स्वभावाची पात्रे श्री साने यांच्या कादबरीत आहेत आणि हे व असेच बहुशी मानवी हृदय आहे असे मला वाटते

स्वत श्री साने मात्र स्वत च्या ध्येयवादाच्या आणि विचाराच्या इतक्या गोड गुगीत असतात की आपण निर्माण केलेल्या पात्राचे आणि प्रसंगाचे—मधु-मधुरतर आणि ललित-लुलित-अशी वर्णने फारशी त्याना साधलेली नाहीत आणि तसा त्यानी प्रयत्नही केलेला नाही कारण त्याना पात्राचे स्वभाव-विशेष सागायचे आहेत—शरीरसौष्ठव नव्हे !

'–कसे–कसे होत गेले ' हे वर्णनात्मक सागण्यापेक्षा चटकन् ' काय झाले ' हे ते सागून जातात आणि नतर त्यावर आपले विचार माडतात विचार सागणे-विचार देणे हे या कादबरीचे वैशिष्ट्य आहे

पुणे, ता. २६–८–३८ —यशवंत गोपाळ जोशी.

॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥

# प्रकाशकाची प्रस्तावना

प्रस्तुत कादंबरी १९१८ साली म्हणजे वीस वर्षापूर्वी लिहिलेली असून आज, इतक्या वर्षांनी का होईना, पण तिच्या प्रकाशनाचा योग येत आहे याबद्दल त्या मंगलमयाचें आम्ही प्रथम अनन्यभावाने स्मरण करतो

कालानुक्रमाने पाहिल्यास कादंबरीच्या क्षेत्रातील ही माझी तिसरी कृति होय पहिली कृति 'यमुना' हिच्याबरोबरच आज प्रसिद्ध होत आहे दुसरी 'कमला' इचे भाग्य मागेच उदयास येऊन आमच्या 'माले'च्या प्रथम पुष्पाचा मान तिनेच पटकावला आहे !

चवथी कादंबरी 'लीला' हीहि पण मागेच प्रसिद्ध होऊन गेलेली आहे तिच्या प्रती आता शिल्लक नाहींत असो

प्रस्तुत कादंबरीसंबंधी माझे मित्र श्री यशवंत गोपाळ जोशी, प्रसिद्ध लघुकथालेखक व कादंबरीकार, यानी मोठ्या प्रेमळपणें व आपुलकीने, वेळात वेळ काढून, आपला अभिप्राय लिहून दिला याबद्दल मी त्याचा आभारी आहे

तसेच चित्रशाळेचे श्री शंकरराव व श्री वासुकाका जोशी यानी नेहेमी-प्रमाणे प्रस्तुत पुस्तकाच्या छपाईचे वगैरे काम मोठे सुबक, सुंदर, व तत्परतेनें आणि सहानुभूतीने करून दिले याबद्दल मी त्याचाहि आभारी आहे

शेवटी, शक्य तितकी काळजी घेऊनहि, काही मुद्रणदोष राहून गेले असल्यास, त्याबद्दल सहृदय वाचकानी क्षमा करावी व 'माले'च्या कार्यास हस्ते परहस्तें सप्रेम सहाय्य करावे अशी विनंति करून ही प्रस्तावना येथेच पुरी करतो

पुणें,
ता १७।९।३८

सर्वांचा नम्र,
**गं रा साने.**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | मित्रद्वय | १ |
| २ | परिचय | ३ |
| ३ | वाङ्निश्चय | ६ |
| ४ | प्रेममालन ! | ९ |
| ५ | तानमृत्यु !–सती | १३ |
| ६ | आधा काय ? देश की आदेश ! | १९ |
| ७ | गंगेच्या घाटावर ! | २६ |
| ८ | समाजसेवेचा उपोद्घात | ३० |
| ९ | मोहिनींचे मोहजाल ! | ३३ |
| १० | महात्म्याच्या पायाशी | ३९ |
| ११ | विधवावपनविचार | ४२ |
| १२ | " कैसा वरि वरि दिसताहे चांग— | ४६ |
| १३ | " नव्हे भाविक, केवळ मांग ! " | ४९ |
| १४ | स्वदेशीव्रत | ५४ |
| १५ | महात्म्याचा उपदेश | ६१ |
| १६ | " माय डिअर मिस् चपू ! " | ६६ |
| १७ | सात्त्विक वैधव्य ! | ७३ |
| १८ | अधःपाताच्या कड्यावर | ८२ |
| १९ | खरी ईश्वरपूजा | ९१ |
| २० | नीतिमत्तेची कसोटी ! | ९७ |
| २१ | नागिणींचा दंश ! | १०१ |
| २२ | एक रम्य देखावा ! | १०४ |
| २३ | उपसंहार | १०९ |

## ॥ महाराष्ट्र-साहित्यसेवक ग्रंथमाला ॥

**नियमः**—( १ ) एक रुपया प्रवेशफी भरून कोणासही मालेचे कायम वर्गणीदार होता येते ( २ ) कायम वर्गणीदारास सर्व पुस्तके ३/४ किं स मिळतात ट ख नि

**मालेचीं शिल्लक पुस्तकें !**

( १ ) कमला ! ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी ) ८१०
( २ ) अलौकिक आत्मयज्ञ ! ( २ री आवृत्ति ) ८४
( ३ ) भारतीय संग्राम ! ( सचित्र २ री आवृत्ति ) १८४
( ४ ) सायुज्यसोपान ! ( चटकदार पारमार्थिक ग्रंथ ) २
( ५ ) मुरारि ! ( शिवकालीन ऐति कादंबरी ) २
( ६ ) भारतवर्षाचा धार्मिक इतिहास !
पूर्वार्ध-( सचित्र ) २
( ७ ) प्रपितामहाच्या पदावर !
( शिवकालीन ऐति कादंबरी ) २८८
( ८ ) भारतवर्षाचा धार्मिक इतिहास !
उत्तरार्ध-( सचित्र ) २
( ९ ) भारतवर्षाचा धार्मिक इतिहास ! ( सचित्र एकत्र ) ४
(१०) ( १ ) अल्प रामायण ! ( सचित्र ) ( २ ) ललितवाङ्मय !
( ३ ) पावित्र्यप्रभाव ! ( ४ ) शिवशाही ते पेशवाई !
( सचित्र काव्यमय इतिहास ) भाग १ ते ४
( ५ ) गीतेचें वैशिष्ट्य ! प्रत्येकी किं ८४

**नवीन प्रकाशन !**

(११) (१) यमुना ! (स्वतंत्र सामाजिक कादंबरी) ८१२
(२) मानवी हृदय ! (स्वतंत्र सामाजिक कादंबरी) ८१२

याशिवाय-' मुलांचा मार्गदर्शक,' ८१० ' बालवीर अथवा धाडसी यशवंत ' ८४, ' बायकांची नवी गाणी ' ( सचित्र ) भाग १, २ व ३ प्रत्येकी ८८, व ' तरुणांचा ताडेल ' किं ८८ हीं पुस्तकेंहि आमचेकडे मिळतील नं २,३,४,६,८, यास व 'मुलांचा मार्गदर्शक' यास बक्षिसें मिळालीं आहेत व सर्वच पुस्तकांवर विद्वानांचे व वृत्तपत्रांचे उत्तम अभिप्राय मिळाले आहेत तरी आजच मागवा व उच्च वाङ्मयाचें सेवन करा !

**पत्ता—गं. रा साने,** बी ए, बी टी, पेंडशाची चाळ, खो नं १७, आनंद छापखान्याजवळ, सदाशिव, पुणे नं २

# मानवी हृदय

## प्रकरण १ लें.

### मित्रद्वय.

सायकाळीं ६–६॥ चा सुमार झालेला होता. भगवान् दिनराज सर्व दिवसभर ईश्वरानें नेमून दिलेलें कार्य करून थकून भागून पश्चिमादिग्वधू-गृहीं चालले होते! कर्तव्यकर्माच्या श्रमानें येणाऱ्या मुखमंडलावरील लालींत देखील असणारे एक प्रकारचें सात्विक सौम्य तेज त्याच्या वदनावर विलसत होतें. श्रीक्षेत्र नाशिक येथील पंचवटीचा व गंगेचा देखावा या वेळीं बहारीचा दिसत होता! गंगेच्या काठीं स्नानसंध्याशील ब्रह्मवृंद अस्तोन्मुख सवित्यास आपल्या अर्घ्यप्रदानानें संतुष्ट करीत होता! काळ्या रामाचे देवळापासून असणाऱ्या सुंदर घाटावर इकडे तिकडे नाचत बागडत असणारीं लहान बालकें हसत खिदळत होतीं! त्यांचा निरागस आनंद भगवान् अंशुमाली मोठ्या कौतुकानें पहात होता! देवदर्शन करण्यासाठीं रमणीगण चालला होता. सायवायूच्या लहरी नदीजलावर क्षुद्रतरंग उठवीत होत्या, संध्यावंदन करणाऱ्या ब्रह्मवृंदांच्या शरीरास सुखवीत होत्या, देवदर्शन करून घाटावर वारा खात क्षणभर उभ्या राहणाऱ्या रमणींच्या वसनांशीं क्रीडत होत्या! अंशुमाली वरील सर्व दृश्यास आपल्या कोमल ताम्र करांत लपेटून घेत होता!

नाशिक हें फार जुनें क्षेत्र. अर्थात् तेथें जुने वाडे, मंदिरें, घाट वगैरे पुष्कळच आहेत. अशाच एका जुन्या, भव्य व प्रशस्त वाड्यांतील एका दिवाणखान्यांत वामनराव व श्रीधरपंत असे दोघे मित्र आनंदानें संभाषण करीत बसले होते. दिवाणखाना उत्तम रीतीनें शृंगारला होता. खिडकींतून येणारे कोमल ताम्र रविकिरण जमिनीवर अंथरलेल्या चित्रविचित्र गालिच्यावर पसरले होते! वाड्याच्या मागील बाजूस असणाऱ्या रम्य बगीच्यांतील सुवासिक पुष्पांचा सौगंधिक परिमल वायूच्या शीतल लहरीबरोबर येऊन मनास सुखवीत होता!

" खरोखर तात्यासाहेब ( श्रीधरपत )" वामनराव म्हणाले, "आपल्या देशाचा भाग्योदय व्हावयाचा असल्यास आपल्या देशातील प्रत्येक व्यक्तीस आपली खरी किंमत कळली पाहिजे. आपली पूर्वीची उच्च सात्विक वैभवाची स्थिति व सध्याची तामसी विपन्नावस्था, याचें चित्र ज्या वेळीं प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यापुढें स्पष्टपणें नाचू लागेल, त्याच वेळीं कांहीं कार्य झाल्यास होईल. जोवर आपणांस आपल्या मनुष्यत्वाचीहि जाणीव नाहीं, तोंवर इतर गोष्टी काय कामाच्या? अधारातून मार्ग आक्रमण करण्यास जसा मार्गदर्शक दीप लागतो, त्याप्रमाणें शिक्षणाच्या दीपावाचून बहुजनसमाजास आपल्या खऱ्या स्थितीची जाणीव व्हावी कशी? प्राथमिक शिक्षणाचा सर्वत्र प्रसार, हीच राष्ट्रकार्याची पहिली व अत्यत महत्त्वाची पायरी आहे! तात्यासाहेब, या दृष्टीनें आपण येथे चालविलेलें ' फ्री प्रायमरी स्कूल ' ( मोफत प्राथमिक शाळा ) ही आपल्या देशाची अल्पस्वल्प सेवा तो परमात्मा गोड करून घेवो, म्हणजे झाले! तुमच्याआमच्यासारख्या ससारी जीवांच्या हातून ह्यापेक्षां जास्त काय होणार आहे?" असे म्हणून वामनरावानीं एक सुस्कारा टाकला. त्यावर तात्यासाहेब जरा उत्तेजनपर स्वरांत म्हणाले :—

" कां वामनराव? आपण करतों ही कामगिरी काय थोडीथोडकी आहे? अहो, एवढी तरी जाणीव आज कितीजणाना आहे? "

" तात्या, " वामनराव म्हणतात, " मी त्यासाठीं नाहीं सुस्कारा टाकला. तर आपणांस ह्यापेक्षा जास्त कांहींच करतां येत नाहीं, या विचारानें तो सहज निघून गेला. एकटी स्थिति असती, ससाराचें लिगाड मागें नसतें, तर याहीपेक्षां कदाचित् जास्त कार्य करतां आलें असतें. असो. तथापि, आहे या स्थितींत आपण आपलें कार्य निरलसतेनें करून तें ईश्वरार्पण करावें, एवढेंच आपले हातीं आहे. तात्या, मला आपलें वाटतें कीं, मी चारआठ दिवसांत इहलोक सोडून जाणार. तेव्हा माझ्यामागें आपण ह्या आपल्या प्रिय सस्थेला प्राणापेक्षांहि जास्त जतन करून तिचें संवर्धन करा, एवढाच माझा तुम्हांला निर्वाणीचा संदेश आहे! "

" छे छे, वामनराव, हें काय तुम्हीं भलतेंच बोलतां! " तात्या

म्हणाले, "तुमच्यासारख्या धट्याकट्या मंडळींनीं असें बोलावें हें विचित्र आहे ! हें आपलें काय वेड तुम्हीं डोक्यांत घेतलें आहे भलतेंच ? " '

" वेड नव्हे. मला आपले वाटले झाले, इतकेंच." वामनरावांनीं उत्तर केलें, " बाकी, ही आपली मृत्युलोकची वस्ती ! त्याचा काय नेम कोणावर केव्हां प्रसंग येईल तें ? म्हणून आपले तसें मी बोललों, इतकेंच."

" जाऊ द्याहो ! " तात्या म्हणतात, " चला आतां, जरा फिरावयास जाऊन येऊं, म्हणजे तुम्हाला जरा बरें वाटेल ! " असें म्हणून तात्या वामनरावास फिरावयास घेऊन निघून गेले.

## प्रकरण २ रें.

# परिचय.

आमचे तात्यासाहेब व वामनराव सायंकालचा फेरफटका करून येत आहेत, तोंवर आपण त्यांचा थोडासा परिचय करून घेऊं. श्रीधरपंत ऊर्फ तात्यासाहेब यांचें घराणें खानदानींपैकीं होतें. यांच्या वाडवडिलांनीं बरीच माया केलेली होती. वऱ्हाडाकडे यांच्या बऱ्याच जमिनी होत्या. तसेंच खुद्द नाशकास व पुण्याकडे यांचें कित्येक वाडे होते. एकंदर उत्पन्न सालिना २०-२५ हजारांचें होतें. शिवाय वडिलोपार्जित ४-५ लाखाची असामी वेगळीच. यांच्या पाठीवर दोन भाऊ व एक बहीण होतीं. भावाचीं नांवें गणपतराव व अनंतराव अशीं असून, बहिणीचें नांव लीला होतें. श्रीधरपंताचें वय ३०-३२ वर्षांचें होतें, गणपतराव २६ वर्षांचे होते, अनंतरावास नुकतेंच बाविसावें वर्ष लागलें होतें व लीला पंधरा वर्षांची होती. श्रीधरपंताचें जुन्या रीतीप्रमाणें लहानपणींच लग्न झालें होतें. पण दोन वर्षांपूर्वींच त्यांची पत्नी मृत होऊन त्यांनीं पुन्हां विवाह केला होता. ते मोठे जुन्याचे अभिमानी असल्यामुळें त्यांची पत्नी १२-१३ वर्षांची कोंवळी पोर होती. परंतु जुन्याच्या अभिमानाबरोबरच जर त्यांच्या अंगीं घोडनवऱ्याची अनावर विषयवासना आवरण्याची, व आपली पत्नी वयांत येऊन तिच्या सर्व अवयवांची पूर्ण

वाढ होईतोंवर वाट पाहण्याची ताकद, धमक अथवा अलौकिक सामर्थ्य असतें, तर गोष्ट वेगळी होती. परतु तशी स्थिति नव्हती. इतकेंच नव्हें, तर वडील व मातुःश्री मागेच मरून गेल्यामुळे घरात मोठेपणानें मिरविणारे हेच असल्यामुळे, आपल्या अनावर विषयवासनेस एका गरीब बालिकेस बळी देऊन, लवकरच त्यांनीं तिला क्षयाच्या पथास लावली होती ! सुशील व साध्वी पोर रमा, या वेळीं क्षयाच्या तिसऱ्या अवस्थेस पोंचून आयुष्याचे एक एक दिवस मोजीत होती !

गणपतरावाचा विवाहहि त्याच्या वडिलांनीं श्रीधरपतांच्या पाठोपाठ एका अनुरूप वधूशी करून दिला होता. परतु गरीब बिचाऱ्या त्याच्या पत्नीचे नशीबीं ससारसौख्य फारसें लिहिलें नसल्यामुळें, तिनें लवकरच इहलोकींचा त्याग केला. दोन तीन वर्षे गणपतराव सध्या विधुरावस्थेतच होते. श्रीधरपतास दोनचार मुलेबाळे झालीं होतीं, परतु तीं लहानपणींच वारलीं. गणपतरावास कांहींच मूलबाळ नव्हतें. अनतराव अजून अविवाहितच होते व लीलेच्या लग्नाचा विचारही अजून विशेष जोरानें पुढें आला नव्हता. श्रीधरपताचे शिक्षण जेमतेम मॅट्रिकपर्यंत झालें होतें. गणपतराव एल्. एम. ॲंड एस्. झाले होते. अनतराव यदाच बी. ए. ची परीक्षा पास झाले व लीला इग्रजी सहाव्या यत्तेत होती. आमच्या श्रीधरपताचें घराणें जुन्यापैकीं असले, तरी सध्याच्या युगातील शिक्षणाचे सस्कार त्यावर झाल्याशिवाय कसे राहणार ? आपल्या पोरांबाळांना खाण्याची ददात नसली, तरी शिक्षणामृताचें पान त्यांनी करावयास कांहींच हरकत नाहीं, असें त्याच्या वडिलांस वाटत होतें. त्याचें वडील व मातुःश्री वारल्यावर श्रीधरपताच्या हातींच सर्व कारभार आला. तथापि, आपल्या बंधुभगिनींस, त्यांना हवें तितकें शिक्षण देण्याचे कामीं, त्यांनीं कांहीं कमी केलें नाहीं.

श्रीधरपतांचे मित्र वामनराव हे जवळ जवळ त्यांच्याच वयाचे होते. हे बी. ए. असून ह्यांना तेथील म्युनिसिपल हायस्कूलांत ४०—५० रुपयांची नोकरी होती. यांच्या कुटुबाचें नांव कृष्णाबाई. ही बाळबोध वळणाची एक साध्वी होती. तिचें मराठी ३—४ इयत्तांपर्यंत घरींच शिक्षण झालेलें असून पांडवप्रताप, भारत, रामायण, भक्तिविजय इत्यादि पोथ्यापुराणें वाचून ती आपला काळ सार्थकीं लावीत असे. त्याचप्रमाणें

पतिसेवेंतहि ती मोठी दक्ष असे. वामनरावांस दोन बंधु होते. एक विष्णुपंत व दुसरे विनायकराव. विष्णुपंतांच्या पाठीवर व विनायकरावांचे आधीं त्यांना एक विधवा बहीण होती. तिचें नाव वेणू. विष्णुपंतांचें वय गणपतरावांच्या इतकेंच जवळ जवळ, म्हणजे २५ वर्षांचें होतें. वेणूचें वय २०–२१ वर्षांचें होते, व विनायकरावांस नुकतेंच १९–२० वें वर्ष लागलें होतें. वामनरावांचें उत्पन्न म्हणजे एक त्यांची नोकरी व कोंकणात कांहीं थोडीबहुत त्यांची शेतीभाती होती, तेवढेंच. त्याचें उत्पन्न त्याना सालीना २–३ हजार रुपयांपर्यंत येई. वामनरावांचे वडील वारल्यास ८ वर्षें झालीं, मातुःश्री आधींच निवर्तल्या होत्या. वडील वारले त्या वेळीं वामनराव नुकतेच बी. ए. झाले होते. अर्थात् सर्व संसाराचा गाडा त्यांच्यावरच येऊन पडला. म्हणून त्यांनीं शिक्षकाची नोकरी धरली, व आपल्या भावाबहिणींचा शिक्षणक्रम पुढें चालविला. विनायकरावाच्या पाठीवर चंपू या नावाची १४–१५ वर्षांची त्याना अजून एक बहीण होती. विष्णुपंत नुकतेच वकिलीची परीक्षा पास होऊन धंद्यास लागले होते. विनायकराव बी. ए. च्या क्लासमध्यें होते. चंपी लीलेच्याच वर्गांत होती.

बिचाऱ्या वेणूचें नशीब तिच्या लहानपणींच फुटलें. तिला नहाण येण्यापूर्वीच तिला आजन्म दुःखार्णवात लोटून तिचे पतिराज इहलोक सोडून चालते झाले. त्या वेळीं वेणूचें वय १२–१३ वर्षांचें असेल. तिच्यावर जणू आकाशच फाटलें. परंतु ज्या वयांत तिच्या बाळक्रीडेचा काळ, त्या वेळीं या जगातील अपरपार दुःखाची तिला बिचारीला काय कल्पना असणार ? तथापि, वामनरावांनीं विवेक करून तिला मिड-वाइफ् व नर्स् करून समाजसेवेला तिचा उपयोग व्हावा व तिच्या पोटा-पाण्याचीहि सोय व्हावी, म्हणून त्यांनीं तिला पुण्याच्या 'सेवासदना–' मध्यें ठेविलें होतें. सध्या तिचें शेवटचें वर्ष चालू होतें. विष्णुपंतांच्या पत्नीचें नांव लक्ष्मी असें होतें. ती जरी इंग्रजी दोनचार बुकें शिकली होती, तरी तीहि मोठी पतिसेवापरायण स्त्री होती. पतिसेवेंत दक्ष राहूनहि, फावल्या वेळांत मनोरंजक व उपदेशपर अशीं पुस्तकें वाचून, ती आपलें आयुष्य उत्कृष्ट रीतीनें घालवीत होती. श्रीधरपंतांचें व वामनरावाचें घर जवळजवळच होतें. श्रीधरपंत व वामनराव हे दोघेहि मॅट्रिकपर्यंत सहा-

ध्यायी असल्यामुळें, त्याच्यामध्यें अकृत्रिम मैत्री वसत होती. दोन्ही कुटुंबातील बंधुभगिनी आपापसांत व एकमेकांशीं मोठ्या आनंदानें वागत असत. विष्णुपंत व गणपतराव हेही तसेच सहाध्यायी होते. विनायकराव व अनंतराव एकाच कॉलेजांत होते. फक्त अनंतराव एक वर्ष पुढें होते, इतकेंच. लीला व चंपी सध्या सहाध्यायिनी होत्या. वामनरावांच्या व श्रीधरपंतांच्या वडिलांची शेजारधर्मानें बरीच ओळख होती, व त्यांच्या पाठीमागें तोच क्रम चालून, त्यांच्याहीपेक्षा जास्त परिचयानें सध्या ह्या दोन्ही घरांतील मंडळींची फारच दृढमैत्री झालेली होती. आमचे गणपतराव जरी L. M & S झाले होते, तरी गोरगरिबांस ते फुकट औषधपाणी देत असत. तसेंच राजकीय सामाजिक, धार्मिक इत्यादि चळवळींतहि ते बराच पुढाकार घेत असत.

## प्रकरण ३ रें.

## वाङ्निश्चय.

याप्रमाणें आमच्या मंडळींची आनंदानें कालक्रमणा चाललेली होती. मे महिन्याच्या सुटीसारख्या सुट्टींत श्रीधरपंतांच्या येथें दोन्हीं घरच्या मंडळींच्या मोठ्या बहारीच्या बैठका होत असत ! त्या वेळीं मंडळींत चालणारा निरागस हास्यविनोद व विविध विषयांवरील संभाषणें व वादविवाद, यांच्या खऱ्या आनंदाची कल्पना, तश्या ज्यांचा ‘ काव्यशास्त्रविनोदेन ’ काल जात असेल त्यासच होणार आहे ! इतरास होणें कठीण. असो. अशाच एका सुट्टींतल्या प्रसंगांतल्या एके दिवशीं श्रीधरपंतांच्या दिवाणखान्यांत मंडळी जमून हास्यविनोद चालला होता ! श्रीधरपंत, गणपतराव, आनंदराव, वामनराव, विष्णुपंत, विनायकराव, लीला, वेणू, चंपी इत्यादि मंडळी काव्यशास्त्रविनोदाची बहार लुटीत होती. जवळच्याच खोलींत साध्वी रमा निजली होती. तिच्या प्रकृतीस आतांशा थोडेसें बरें वाटत होतें. असो. कांहीं वेळानें गायनवादनाचा बूट निघाला. लीलेला व चंपीला हार्मोनियम वाजवितां येत होता व गातांही येत होतें. तथापि

लीला चपीपेक्षा दोन्ही कामांत विशेष सरस होती! विनायकरावांचा कंठहि फारच मधुर असून त्याच्या गाण्यानीं मंडळी नुसती डोलत असत! मंडळींच्या आग्रहावरून रमाहि हळूहळू येऊन गायनवादन ऐकण्यास बसली. लवकरच चपी हार्मोनियमवर बसून तिनें एकदोन बहारीच्या चिजा वाजविल्या. नंतर लीलेची पाळी आली. परंतु ती लाजू लागली.

"ह लीले, होऊं दे एकदा. असें काय करतेस? फारच लाजरी बुवा! आपल्या वहिनींची करमणूक करणें हे तर आपलें कर्तव्य आहे!" गणपतराव म्हणाले.

"पण त्यांना त्रासच होत असेल गणपतराव, ह्या तुमच्या आरड्याओरडण्यानें!" विष्णुपंत म्हणाले.

"छे छे," रमा म्हणाली, "त्रास कसचा! आतां चपीनें वाजविलेल्या चिजेनें मला बरेंच समाधान वाटलें." अशा रीतीनें मंडळींनीं बराच आग्रह केल्यावर लीला हार्मोनियमवर बसली. व तिनें एकदोन अप्रतिम चिजा वाजविल्या.

"वा! अशा उत्कृष्ट वादनाला तशीच जर बहारीच्या गाण्याची साथ जमली, तर किती मजा येईल!" अनंतराव म्हणाले, "काय विनायकराव, होऊं द्या मग एकदां तुमची एखादी चीज!" विनायकरावांनीं प्रथम बरेच आढेवेढे घेतले, परंतु "गवयीमंडळींना फारच मान लागतो बुवा!" इत्यादि बरीच निरागस टीका झाल्यावर व तात्यासाहेब, वामनराव, इत्यादि वडील मंडळींनींहि "होऊं दे एकदा, आहे सगळ्या मंडळींच्या मनांत तर!" असा फारच आग्रह केल्यावर विनायकराव गाऊं लागले, व लीलेनेंही त्यांच्या गाण्याची आपल्या कौशल्यसर्वस्वानें फारच बहारीची साथ धरली! विनायकराव गात होतेः—

"या नव नवल नयनोत्सवा—"

गायनवादनाची बहार चालली. दोघेही आपलें गायनवादनकौशल्य दाखवीत होते! आलापांत आलाप मिसळून गेला! सर्व मंडळी एखाद्या मंत्रमुग्ध नागाप्रमाणें नुसती डोलूं लागली! हळुहळू गाणें संपलें. नंतर लीलेलाहि गाण्याचा आग्रह झाला! स्त्रीजातसुलभ लज्जेनें तिनें प्रथम थोडेसे आढेवेढे घेतले. पण सर्व मंडळींचा फारच आग्रह पाहून, तिनें लवक-

रच गायनास व एकीकडे आपल्या कोमल करांगुलींनीं अप्रतिम वादनाची साथ देण्यास सुरवात केली. रमणीच्या कोमल कंठांतून निघणारे गायनाचे तरंग वातावरणात आंदोलन पावू लागले ! लीला गाऊ लागली:—

" खरा तो प्रेमा ना धरि लोभ मनिं । कसा धरि लोभ मनिं S प्रेमा ना धरी लोभ मनिं —"

हळुहळू गाणे थांबलें. पेटीही शान्त झाली. सर्व मंडळींनीं लीलेची फारच वाहवा केली.

" अहाहा, लीलेचें अप्रतिम वादनकौशल्य व विनायकरावांचें नितांतरमणीय गायन यांचा कायमचा संगम किती नयनमनोहर होईल ! " अनंतराव म्हणाले. सर्वत्र मंडळींत निरागस हास्य विलसू लागलें.

" हे रे काय दादा, तुझे आपले कांहींतरी भलतेंच ! " असें म्हणून लीला रागाचा आविर्भाव दाखवीत तेथून पळालीच !

" लीले, लीले, अग इकडे ये ! त्यांत काय आहे एवढें पळण्यासारखें? विनायकराव कोणी वाघोबा का आहेत ? बाकी खरोखर, " ते मंडळीकडे वळून पुढे म्हणतात, " यांचा जोडा मोठा सुरेख जमेल नाहीं ? "

" हो तर. मग काय वामनराव, घेता का आमच्या मुलीला पदरांत ? " तात्या म्हणाले.

" तें तुम्ही आतां विनायकालाच विचारा प्रत्यक्ष!" वामनराव म्हणाले, " बाकी माझी कांहीं हरकत नाहीं. तात्या, तुमच्यासारख्यांचे हे आमच्यावर उपकारच होणार आहेत ! "

" छे हो. उपकार कशाचे ? " तात्या म्हणतात, " अहो, तुमच्या आमच्या मैत्रीस यानें जास्त बळकटीच येणार आहे " तात्यांचा स्वभाव मोठा उदार व दिलदार होता. " मग काय विनायकराव ? " ते पुढें म्हणाले, " घेता का आमच्या लीलेला पावन करून ? "

" तात्या, अहो घेईल तर काय झालं ! " अनंतराव म्हणाले, "त्याच त्यांत मोठ वाईटच होणार आहे कीं नाहीं ? मगाचपासून तर त्याचें लय सारखें लीलेकडे लागलें आहे ! तरी म्हटल आज कॉलेजांतल्या गॅदरिंगपेक्षांहि विनायकराव बहारीनें कां गाताहेत ? " ह्या अनंतरावांच्या थट्टापूर्ण कोटीनें पुन्हा सर्व मंडळींत हंशा पिकला !

"तात्या, आपल्या ह्या औदार्याबद्दल आपली तारीफ करावी तितकी थोडीच!" विष्णुपंत म्हणाले.

"पण याचे सगळें श्रेय आहे माझ्याकडे बरे का! कारण मीच प्रथम हा प्रश्न काढला!" अनंतराव हसतहसत म्हणाले.

"तें खरें. पण विनायकराव कांहींच बोलत नाहींत ते!" तात्या म्हणाले.

"मी काय बोलणार!" विनायकराव म्हणाले, "आपल्या ह्या उपकारानें आपण आम्हांस कायमचे ऋणी करून ठेवलें आहे!" एवढेंच बोलून ते खालीं पाहू लागले. याप्रमाणे विनायक व लीला यांच्या वाङ्‌निश्चयाची बहार झाल्यावर, लवकरच ब्राह्मणाने फराळाचें ताट वर आणलें. लीलेने जी दडी मारली, ती कांहीं पुन्हा वर आलीच नाहीं! असो. 'टिफिन्' झाल्यावर सायंकाळची सर्व मंडळी फिरावयास बाहेर पडली.

## प्रकरण ४ थें.

## प्रेममीलन !

सर्व मंडळी फिरावयास बाहेर गेली खरी. परंतु आमची लीला व विनायकराव दोघेजण मात्र बाहेर गेले नाहींत. विनायकराव आपल्या घरीं येऊन खोलींत विचार करीत पडले होते. त्यांची विचारमालिका चालू होतीः—

"खरोखर लीलेसारखी श्रीमंताची मुलगी मज गरीबाचा अंगीकार करील काय? 'मानापमाना'तल्या भामिनीसारखें माझ्या तोंडावर "धनि मी पति वरिन कशी अधना" असें म्हणून माझा अपमान करून "धिःकार मन साहिना" असे उद्गार तर शेवटीं मला ती काढावयास लावणार नाहींना? पण छेः, तसें असतें तर—तर—तिनें माझ्या पद्याला जणों उत्तरच म्हणून, "खरा तो प्रेमा नाधरि लोभ मनिं" हें पद कां गायिलें असतें? अहाहा, तें पद अजून कसें माझ्या कर्णरंध्रांत घुमत आहे! लीले,

तें तसेंच सतत धुमत रहाव. इतकें भाग्य ह्या कमनशिब्याच्या दैवीं लिहिलें असेल काय ? पण माझ्या मनात अशा शका का म्हणून येतात ! तसें नसते—लीलेचें मजवर प्रेम नसते तर—तर ती आपल्या दादावर—अनत-रावावर—बळेच रागाचा अविर्भाव आणून का पळाली असती ? पण कदाचित् ती स्त्रीजातसुलभलज्जेनें कशावरून पळाली नसेल ?—"इत्यादि अनेक विचारतरगानीं त्याच्या हृदयसागरावर एकच गर्दी केली व त्याच्या हिंदोळयावर बसून त्याचे मन आशानिराशेच्या अवकाशांत हेल-कावे खाऊ लागले ! विनायकरावाचें लीलेच्या ठायीं प्रेम जडलें नव्हतें, असें नाहीं. परतु तो मोठा विचारी मुलगा होता. तो आपल्या मनास वर-करणी थट्टेनें, पण आतून कळवळयाने वारवार सांगे कीं, "वेडया मना, त्या मूकनायकांतील पद्याप्रमाणे मीही तुला किंचित फेरफार करून सागतों कीं, " सुलभ मनीं गणीं न धनिकसुता " परतु आजच्या प्रसगानें त्याचें हृदयच हालवून सोडलें, व ह्याची एकदा शहानिशा करून घेतलीच पाहिजे असा विचार करून, "मना, भावी येणाऱ्या सौख्याच्या आनदा-मृताचा अथवा नैराश्याच्या कटु जहराचा त्याला पिण्यास ' समदुःख-सुख ' ह्या भावनेनें चल ! कोणचीही ऊर्मि हृदयावर काहीं काळ उठवू नकोस, अशी माझी तुला हात जोडून प्रार्थना आहे!" असे म्हणून तो उठला व त्याचे पाय अवशपणे तात्याच्या घराकडे वळले.

या वेळीं अस्तमानाचा समय झाला होता ! सवित्याच्या आरक्तताम्र किरणानीं सकल वसुधरा विनटली होती ! लीलेच्या हृदयात आज आन-दाच्या ऊर्मीस पारावार नव्हता. " वहिनी, मी आपल्या बागेत जाऊन हार्मोनियम वाजवीत बसतें. तुम्ही येथेच पडल्या पडल्या ऐका ह ! " असें म्हणून तिनें आपला हार्मोनियम उद्यानातील एका उघड्या लता-कुजांत नेला, व तो उघडून " आपल्या वहिनींच्या करमणुकीसाठीं " ती आपल्या हृदयानदाचीं पद्यें गाऊ लागली. सारगीच्या आलापासही लाजविणारे आलाप रमणीच्या कठांतून निघू लागले व विद्युल्लतेच्या चापल्यासही मागें सारणाऱ्या तिच्या करकमलाच्या अगुली पेटीच्या पडद्यावर नृत्य करू लागल्या ! लीला या वेळीं एक गुलाबी पातळ नेसली होती ! जवळच असणाऱ्या गुलाबाच्या ताटव्यावरील एक गुलाबपुष्प तिनें आपल्या केशपाशात खोंचून दिलें होतें ! सायवायूच्या शांतप्रशांत

लहरी उद्यानांतील पुष्पराजींस व लतापल्लवास डोलवीत होत्या, सुंदरीच्या वसनाशीं व अलकराजीशीं क्रीडत होत्या ! अस्तास जाणाऱ्या सवित्याची ताम्र किरणें या सर्व सुखद देखाव्यास रंजित करीत होतीं ! जवळ आसपास कोणीहि नाहीं, या भावनेनें ललना मुक्तकंठाने गात होती—

" खरा तो प्रेमा ना धरि लोभ मनीं। कसा धरि लोभ मनींऽप्रेमाऽ ना धरी लोभ मनि "—हृदयानंदाच्या प्रेमभराने सुंदरीच्या कंठातून निघणारे वीणाझंकारसदृश आलाप वायुतरंगावर कंप पावूं लागले ! अत्यंत प्रेमळपणें रमणी पुनःपुन्हा तेच ते चरण घोळून म्हणत होती—

" खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनिं "—आपल्या वहिनींच्याच केवळ करमणुकीसाठीं लीला इतकी मधुर गात असेल काय ? पण तें कांहीं असो. या नितांतरमणीय पद्यांतील उदात्त तत्त्वांच्या श्रवणानें पुष्पें व लता डोलूं लागल्या, पक्ष्यांचें कूजितहि क्षणैक थांबलें ! तें स्वर्गीय तत्त्व व तें गाणारी ही दिव्य बाला यांचा हा कोण बहारीचा संगम, ह्या आनंदानें दिनमणीच्या मुखावरही आनंदाचा रक्तिमा विलसूं लागला ! इतक्यांत "लीले !" असा ध्वनि उमटला!—क्षणार्धांत एकत्वाचा स्वैरानंद विलयास गेला ! सुंदरीनें मागें वळून पाहिलें, तोंच तिच्या वदनावर लज्जेची लाली चढली, तिच्या भालप्रदेशीं स्वेदाबिंदू चमकूं लागले, बाला उठूं लागली ! पण—

" नको, लीले, उठूं नकोस ! " विनायकराव पुढें येऊन म्हणाले, पण लीले, मगाशीं मी ऐकलें तें खरें काय? इतकें माझें थोर भाग्य असेल काय ? " लीला किंचित् विनयानें म्हणाली—

" प्राणनाथ, आपण ऐकलें ते खरें आहे आणि त्यामुळे 'गुणरसपान' करावयास मिळण्याची अपूर्व संधि मला माझ्या बंधूंनीं मिळवून दिली, यामुळें या चरणाच्या गरीब दासीचे भाग्य मात्र आज उदयास आले !"

" अहाहा, सुंदरी लीले, या तुझ्या अमृताहूनही गोड अशा वचनानें खरोखर तू प्रत्यक्ष भूवरच स्वर्ग आणलास, असें मला वाटतें ! " असें म्हणून विनायकरावांनीं तिला आपल्या बाहुपाशांत बद्ध करून प्रेमभरानें तिचें चुंबन घेतलें. तथापि, कोणी पाहील या शंकेनें, मनांत नसताहि लीलेनें लवकरच आपणास त्यांच्या सुखद बाहुपाशांतून सोडवून घेतलें. नंतर विनायकराव व लीला हृदयमीलनाच्या दिव्य आनंदाचे संलाप

करीत त्या उद्यानातील लताकुंजातल्या एका अंतर्भागीं बसली! आकाशो-द्यानाच्या पश्चिम कुंजात पश्चिमदिग्वधूशीं सवित्याचे असेच रहस्यालाप चालू होते! पण अरेरे, अर्ध्या पाव घटकेनें त्या सविताप्रियकरास आपल्या दयितेस सोडून जावें लागणार होतें! विनायकरावांचीही तशीच अवस्था होणार काय ? त्याच्या नशिबीं त्या सवित्याप्रमाणेंच अर्ध्या पाव घटकेचाच आनंद लिहिला आहे काय ? कोणास ठाऊक ?–विधिघटनेचे खेळ आधीं कोणास समजणार ? पण तें कांहीं असलें तरी दोघेही जीव सध्यां प्रेमसंभाषणांत दंग झालेले होते!

" खरोखर देवा, " लिला म्हणाली, " माझ्याच सारख्या सर्व श्रीमंत भगिनींनीं जर गरिबांमध्यें चमकणाऱ्या सद्गुणांच्या हीरककांतीशींच खरें स्वयंवर करण्याचा निश्चय केला, तर केवढें सामाजिक कर्तव्य बजावल्याचें श्रेय त्यांस मिळेल ? खरोखर श्रीमंतांच्या मुलींनीं गुणवंत अशा गरीब तरुणांशीं विवाह केला व गरीब परंतु गुणवंत अशा कन्यकांना जर श्रीमंत तरुणांनीं हातांशीं धरलें, तर केवढें समाजकार्य होणार आहे! नाहीं कां ? "

" प्रिये, तूं म्हणतेस तें किती अक्षरशः खरें आहे म्हणून सांगूं ? विनायकराव म्हणाले, " आणि खरें म्हणशील तर विवाहसंस्था ही एक सामाजिक संस्था आहे. गरीब पोरींच्या आईबापांस पिळून पैसा उकळण्यासाठीं ही संस्था नव्हे. पण आपल्या अंध समाजाच्या हें लक्षांत येईल तेव्हां ना ? "

" तसेंच देवा, " लिला म्हणाली, " हृदयाच्या उत्कट भावनेस ' गुणरसपान ' म्हणजेच खरें सात्त्विक प्रेम होय–' हेंचि सुख ' होय–असें सुशिक्षण मिळालें तर केवढी बहार होईल ? परंतु सध्यांच्या विवाहसंस्थेच्या अधत्वाकडे पाहिलें, म्हणजे मन कसें खिन्न होऊन जातें! खरोखर देवा, सहज जातां जातां समाजकार्यही साधलें जावें, अशा उदात्त भावनेनें ही विवाहसंस्था आखणाऱ्या आपल्या पूर्वजांचे विषयीं मन कृतज्ञतेने भरून येतें. पण तिच्या खऱ्या उद्देशाकडे–तींत सांठवून ठेवलेल्या ' Socialism ' च्या तत्त्वाकडे–कानाडोळा करून, कशी तरी रहाटत असलेली सध्यांची ही संस्था पाहून मात्र वाईट वाटतें! "

" खरें आहे, लाडके, पण त्याला कोण काय करणार ? याची तीव्र

जाणीव जेव्हा समाजांत उत्पन्न होईल, तेव्हाच कांहीं कार्य झाल्यास होणार आहे. पण त्या कामीं तुझ्याप्रमाणें आपल्या उदाहरणानें वळण घालून देणें हें मात्र प्रत्येक सुशिक्षित, सुधारक, व विचारी मानवाचें कर्तव्य आहे ! ”

याप्रमाणे या प्रणयीयुग्माचें विवाहसंस्थेवर संभाषण होता होतां सूर्यास्त झाला. अंधकार पडूं लागला. तरी त्याचें त्यास भानही नव्हते. प्रेमाच्या पहिल्याच आनंदाच्या प्रसंगीं कोणा प्रणयीयुगुलास आजवर वेळेचें भान राहिले आहे ? शेवटीं मोठ्या कष्टांतःकरणानें तीं दोघेंही उठलीं व त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.

## प्रकरण ५ वें.

## तीन मृत्यु !–सती.

काय असेल तें असो. आमच्या वामनरावास जणूं काय त्यांचे मरण आधींच कळले होते कीं काय, नकळे. अंतकाळ जवळ आला म्हणजे कधीं कधीं आत्म्यास असें भविष्यज्ञान होतें म्हणतात. ते कसेंहि असो. पण पहिल्या प्रकरणांत दिलेले उद्गार काढल्यास पुरते आठ दिवसहि लोटले नाहींत, तोंच वामनराव एकाएकी भयंकर आजारी पडले ! अंगांत ताप फणफणून भरला. आमचे गणपतराव स्वतः जातीनें वामनरावांना औषध देत होते. त्याचप्रमाणें सेवाशुश्रूषेसहि कांहीं माणसें कमीं नव्हतीं. मिडवाइफ्चें ट्रेनिंग मिळणारी वेणू अहर्निश आपल्या भावाच्या सेवेंत निमग्न होती. तसेंच प्रत्यक्ष त्याची पत्नी–कृष्णाबाई–तिची तळमळ तर किती चालली असेल, याची कल्पना तिच्यासारख्या साध्वी स्त्रियांनाच येईल ! तसेंच चंपू व लीला हींहि आपणाकडून होईल ती मदत करीत होती. विष्णुपंत व त्यांचें कुटुंब, विनायकराव, अनंतराव, तात्यासाहेब वगैरे सर्व मंडळी सारखी झटत होती ! परंतु तापाचे चिन्ह कांहीं ठीक दिसेना. होतां होता आठ दिवस झाले. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें ! इतरहि गांवांतील एकदोन नामांकित डॉक्टरांस प्रकृति दाखविली. परंतु

प्रकृतीस उतार पडेना. नववा दिवस उगवला ! हा दिवस कसा काय पार पडतो, याची सर्वांस काळजी लागली ! कारण हा नवज्वरच असावा असे सर्व डॉक्टराचे मत पडले. दुपार झाली, सध्याकाळ झाली, तसतसें चिन्ह वाईट दिसू लागलें ! वायूची बडबड सुरू झाली व शेवटीं इतक्यांच्या श्रमाचे सार्थक न होतां, बाराच्या सुमारास वामनरावाचें प्राणोत्क्रमण झाले ! पण मरतामरता शेवटीं देखील क्षणैक शुद्धीवर येऊन त्याचे उद्गार, "तात्या, ..तेवढ्या. आपल्या .सस्थेची ..काळजी . घ्या...ये.. तो ..रा म " असे होते !

वामनरावाच्या मृत्यूनतर त्या घरात किती हलकल्लोळ उडाला असेल त्याचें वर्णन कोणी करावे ? परतु एकदरींत हा महिना म्हणजे वामनरावाच्या घरास ' साडेसाती 'चाच गेला !—कारण, चार आठ दिवसाच्या अतरानें त्याच घरात अजून दोन मृत्यु झाले ! एक विष्णुपताचें कुटुब लक्ष्मीबाई हिचा, व दुसरा आमच्या लीलेच्या हृदयेश्वराचा—विनायकरावाचा ! हाय ! हाय ! निर्घृण काळानें याप्रमाणे उजाड पाडलेल्या त्या घरात दुःखराशीच्या लहरी किती उसळल्या असतील, याचें वर्णन करणें प्रस्तुत लेखकाच्या शक्तीबाहेरचें काम आहे !

* * *

क्षणापूर्वी आनदाने नाचत बागडत असणारीं दोन्हीं गृहे याप्रमाणें काळाच्या अजब तडाक्यानें शोकसागरात बुडून गेलीं ! दोन्हीं घरीं एकप्रकारची गभीर, दुःखद, भीषण छाया पसरली ! अरेरे, मानवा, तू एक बाहुलें आहेस, आणि तुझा सूत्रचालक एक अगम्य अशी शक्ति आहे ! ती जशी नाचवील तसा तू नाचतोस. ह्या जगात तुझ्या स्वाधीन काहीं नाहीं. तुझा ताबा एका काडीवर देखील नाहींना ? अरेरे, असें असताहि, प्रत्यक्ष तुझ्या जीवनाचीं सूत्रें देखील परस्वाधीन असतांहि, कोण तुझा अभिमान, तुझा गर्व, तुझा आनंद ! मानवा, किती ही तुझी शोचनीय स्थिति !

* * *

वरील गोष्टीस दोन एक महिने लोटले. काळाचा अनत ओघ नेहमीं चालूच असतो ! जगतात दृष्टीस पडणाऱ्या नानाविध चमत्काराचें अव

लोकन करण्यास तो क्षणभरही थाबत नाही. सुखदुःखाच्या सर्व वेळा त्यास सारख्याच! हळुहळू दोन्ही घरीं थोडथोडी टवटवी दिसू लागली! कारण, कालातिक्रमासारखे दुःखरोगावर दुसरे औषध नाहीं. जसजसा काल अधिक लोटत जातो, तसतसे मानवी दुःख कमी कमी होत जाऊन पुष्कळ दुःखाचा मागमूसहि नाहींसा होऊन मर्त्य लोकातला वेडा मानव पुन्हा आनदानें नाचू बागडू लागतो! परमेश्वराची लीला अगाध व विचित्र आहे, ह्यांत काहीं शका नाहीं! पण असें आहे हेंहि एकप्रकारें ठीकच आहे. कारण दुःखशोकादिकांच्या प्राणांतिक जखमावर काळ जर अत्यत मृदु अशा मलमाचें हलक्या हातानें विलेपन करून त्या जखमा भरून न काढता,—प्रत्येक शोकप्रसगाची जखम जर तशीच अनतकाळ वेदनाकुल राहती,—तर ह्या नश्वर जगतात मानवाचें अस्तित्वही सभवणें दुरापास्त होते! परतु आधींच दुःखपूर्ण अशा या लोकांतील जिणे मानवास अगदींच असह्य न होता त्यानीं आपलीं कर्तव्यें यथास्थित करीत राहावे, यासाठीं परमेश्वराच्या आज्ञेनुसार निसर्गमाता आपल्या छकुल्यास आंजारून गोंजारून पुन्हा आनदानें नाचाबागडावयास लाविते!

* * *

परतु काहीं दुःखें अत्यत तीव्र असतात व काहीं व्यक्तींस तीं फारच जाणवतात! कालाच्या मृदुहस्तानें त्या दुःखपूर्ण जखमेवर विलेपन केलें जाणाऱ्या मलमाचा काहींच परिणाम न होतां, उलट जसजसा काळ अधिकाधिक जाऊ लागतो तसतसें त्या दुःखाचें विष शरीरांत जास्त जास्त भिनत जाते! पतिनिधनाचे दुःखहि अशाच दुःखापैकीं एक हाय!

ती रात्रीची बारा वाजण्याची वेळ होती. आज पौर्णिमेस एकदोन दिवसच कमी असल्यामुळें बाहेर स्वच्छ पिठासारखे चांदणें पडलें होतें! या वेळीं पचवटींत असणाऱ्या एका घरातून एक व्यक्ति बाहेर पडली व झपझप पावले टाकून तिने नदीतीर गांठलें. या वेळीं कृष्णाबाईनें-( ती व्यक्ती कृष्णाबाईच होती )—एक शुभ्र वस्त्र परिधान केलें होतें. केंस पाठीवर मोकळे सांडले होते. कपाळीं सतीचा मळवट भरला होता! तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारच्या अलौलिक दिव्य निश्चयाचें तेज विल-

सत होतें ! सुनील आकाशप्रांगणांतून सनाथ तारारमणी हा अनाथ देखावा पहात होत्या. निशाकालीन मंद वायूच्या लहरी नदीजलावर अनंत तरंगभंग कंपित करीत होत्या, साध्वीच्या मुक्त केशकलापाशीं क्रीडत होत्या. नदीवर उठणाऱ्या तरंगावर पडलेल्या सुधांशूच्या प्रतिबिंबाचें शरीर कृष्णाबाईच्या भयंकर निश्चयानें जणों कंप पावत होतें ! सर्वत्र शांत निस्तब्धतेचा वास होता. सर्व जगत् निद्रासुखांत मग्न झालें होतें ! साध्वीनें आपलें करकमल जोडलें, नेत्र आकाशाकडे लावले, व ती स्वगत पण मोठ्यानें बोलूं लागली:—

" देवा नारायणा, तुझ्याच आज्ञेनें माझ्या सौभाग्यावर घाला पडला. मी त्याच वेळीं सती जाणार होतें. परंतु आमची ही सती जाण्याची उत्कृष्ट चाल ह्या सध्याच्या सरकारनें बंद केल्यामुळें माझा नाइलाज झाला. परंतु पतिवियोगानें असह्य झालेलें हें जीवन मी आतां कुठवर तरी ठेवूं ? सती नाहीं तर नाही, परंतु स्वर्गांत माझी वाट पहाणें चाललें असतां, मी अशी किती दिवस राहूं ? शेवटीं गंगामाईच्या उदरांत ह्या देहास अर्पण करून त्याच्या सन्निध जावें, ह्या निश्चयानें मी येथें आलें. नाथ, ही मी आले बरें " असें म्हणून तिनें आपलें वस्त्र नीट चापचोपून कसलें व " जय गंगामाय" म्हणून ती आतां उडी टाकणार तोंच, "थांब, थांब, कृष्णाबाई, थांब" असा एका दिव्य आवाजाचा ध्वनि उमटला व एक तेजःपुंज योगी पुढें आला ! "कृष्णाबाई, थांबा " तो पुढें म्हणाला, " आणि माझे—आपल्या बंधूचे—चार शब्द आपण ऐकून घ्या. आपण ह्या जीव देण्याच्या कृत्यास उद्युक्त होऊं नका, अशी माझी आपणांस प्रार्थना आहे ! पतिमरणोत्तर त्याचेंच सदैव चिंतन ठेवून परमेश्वराच्या उपासनेंत प्रत्येक विधवेनें आपला काळ घालवून देहाचें सार्थक करावें, हेंच उचित नाहीं काय ? कारण धर्म, अर्थ, व काम ह्या त्रयीच्या कार्यांत पतिपत्नीचें साहचर्य असलें, तरी मोक्षसाधनाचे कामीं ज्याचा तो आपला मालक व धनी आहे. तें प्रत्येकानें आपण होऊनच मिळविलें पाहिजे. यासाठीं कृष्णाबाई, आपण त्या परमात्म्याच्या भजनपूजनांत आपलें शेष आयुष्य घालवून, आपल्या देहाचें व आत्म्याचें सार्थक करा. नाना तऱ्हेच्या निष्काम व्रतांच्या आचरणानें तुमची काया पुनीत होऊं द्या. " तैसा स्वरूपाचिया पसरा—। लागि प्राणेंद्रिय शरीरा । आटणी

करणें जे वीरा । त्या नाव तप ॥—''ह्या महात्म्या ज्ञानराजाच्या उक्ती-प्रमाणे दिव्य तपाचरण करून तुम्ही आजन्म ईश्वरसेवेंत काळ घालवि-ल्यास परमात्मा सतुष्ट होणार नाहीं काय ? पतिनिधनोत्तर, त्याच्या शवा-बरोबर आपणासही जाळून घेणे, हा एका अर्थानें किती वेडेपणा आहे बरें? खरोखरी पहाता केवळ पतिदेवाशीं एकरूप—एकजीव होऊन, इहलोकीं कांहींही कमी नसतां, केवळ प्रेमाचा आधार तुटला, आणि प्रेम हेंच जीवन,—म्हणून जीवनाची ज्योतही मालवली,ह्याच उत्कट—अत्यत उत्कट भावनेने पतिशवाशेजारीं बसून आनदानें सहगमन करणारी तुमच्यासारखी साध्वी,कृष्णाबाई,कोणच्याही काळीं पाहू जाता लाखात एखादीच निघायची! बाकीच्या बायाचे देह आजपर्यंत निव्वळ जुलुमानें आणि जबरदस्तीनें जाळण्यांत आले ! तेव्हां त्या गरीब अबलेच्या मनात नसतांना, बांबूच्या काठ्यांनीं तिला धडाड जळणाऱ्या चितेत लोटून, बाहेर पडण्यासाठीं तार-स्वरानें ओरडणाऱ्या त्या गरीब गायीस जाळून, वाद्याच्या घोषांत तिचे करुण विलाप बुडवून, स्वतःस धन्य धन्य मानणाऱ्या माणसाना मनुष्यें म्हणण्यापेक्षा राक्षस हें नाव अधिक शोभेल, नाही बरे ? अशा राक्षसी प्रकारास व अमानुष छळास सदयांतःकरणाच्या एका आंग्ल महात्म्यानें आळा घातला,त्याबद्दल त्यास दोष न देतां उलट त्याचे धन्यवाद गावे तेवढे थोडेच होणार आहेत. कृष्णाबाई, धर्मात काय किंवा कशातही काय,जुलमानें कार्य करण्याने खरे श्रेय कधींच प्राप्त होत नाहीं,इतकेंच नव्हे, तर उलट भयकर पातक मात्र केल्याचे पुण्य पदरीं पडते! कृष्णाबाई,तुमच्यासारख्या सतीची गोष्ट केव्हांहि निराळीच. तथापि, पतिवियोगाच्या असह्य यात-नांचे हजारों वृश्चिकदश होत असताहि जी साध्वी केवळ परोपकारासाठीं आपले जीवन वहात असेल तिची केव्हाही धन्य—त्रिवार धन्यच होय ! कृष्णाबाई, समाजाचें हित व समाजसेवा म्हणजे काय, ह्याची आपणांस कल्पनाही नसेल. पण त्याचा दोष तुमच्याकडे नसून तुम्हाला अज्ञान-पकांत ठेवणाऱ्या तुमच्या आईबापाचा आहे. परतु स्वतास अत्यत दुःखांत ठेवूनही, जी समाजाच्या व जगाच्या कल्याणासाठी झटते, तीच व्यक्ति महात्म्याच्या पदास पावते, असा भगवताचा उपदेश आहे ! यासाठीं कृष्णाबाई, माझी—तुमच्या भावाची—तुम्हांला अशी आग्रहाची विनति आहे कीं, आपण आपल्या असह्य दुःखांतून—पतिवियोगानळाच्या

धडाड पेटलेल्या अग्नीच्या तीव्र दाहातून—मुक्त होण्यासाठीं स्वार्थीपणाने मृत्यूच्या शीतल करांत आपला देह अर्पण न करता, शक्य असेल तर समाजसेवेच्या शीतल सुखानें आपल्या तनुमनास सुखवा, किंवा निदान, धर्मशास्त्राच्या आज्ञेनुसार अखंड ईश्वरचिंतनात काळ घालवून, नाहक आत्महत्येच्या पातकाचे धनी न होता, आपल्या आत्म्यास चिरशांतीचा मार्ग मोकळा करून देण्यास झटा ! '' असें म्हणून तो योगी थांबला. क्षणापूर्वी गंगामाईच्या अगाध उदरात उडी घेऊन पतिदैवताशीं— स्वर्गात आपली वाट पहाणाऱ्या पतीशीं—संगत होण्यासाठीं उत्सुक झालेली कृष्णाबाई, या महात्म्याच्या अधिकारयुक्त पण प्रेमळ वाणीने आदरयुक्त स्तिमित झाली, व आदरयुक्त आश्चर्यानें ती त्याच्याकडे पाहू लागली. '' कृष्णाबाई, '' तो योगी तिचे मनोगत जाणून पुढे बोलू लागला, '' आपणास मी आपल्या नांवानें हाक मारिली, याबद्दल आपणास आश्चर्य वाटलें असेल, आणि ते साहजिकच आहे. तथापि मला अंतर्ज्ञानाने आपले नाव कळले, एवढे सांगितलें असता पुरे होईल. तसेंच मी आपणास आपला भाऊ म्हटलें, याबद्दलही आपणांस आश्चर्य वाटलें असेल. पण माई, ह्या जगातील सर्व स्त्रिया मला आईबहिणीं-सारख्या आहेत, आणि म्हणूनच मी आपणांस माझ्या भगिनी समजतों ! याबद्दल आपणास माझा राग तर आला नाहीं ना ? ''

'' छे छे, योगिराज, त्यात राग कशाचा ? '' कृष्णाबाई म्हणाली.

'' तर मग, '' तो योगी म्हणाला, '' आता आपण परत जा व माझ्या सांगण्याचा योग्य तो विचार करून, आपणांस वाटेल ते करा. येऊ तर मी आता माई ? '' असें म्हणून तो योगी जाण्यास निघाला. महात्म्याच्या शब्दाचा व त्याच्या तेजःपुंज कायेचा—शुद्ध सात्त्विक आचरणाने शोभिवंत होऊन देहावर विलसणाऱ्या सात्त्विक तेजाचा—कृष्णाबाईवर हळुहळू परिणाम होऊ लागला !

'' महाराज, थांबा, मी आपणांस एकदां वंदन करतें ! '' असे म्हणून कृष्णाबाईने त्याच्या पायांवर मस्तक ठेविलें, तो तिच्या पाठीवर दोन अश्रुबिंदु पडले !

'' कल्याण, भगिनी, तुझें कल्याण होऊन आत्मोद्धार व समाजोद्धार करण्याचें कार्य तुझ्या हातून तो जगच्चालक परमात्मा खचित करील,

असा माझा तुला आशीर्वाद आहे ! येतो मी अ !" असे म्हणून क्षणार्धांत तो योगी दिसेनासा झाला. त्याच्या वाटेकडे स्तिमितनयना कृष्णाबाई किती वेळ तरी पहात होती ! शेवटी तो दृष्टीच्या पार निघून गेल्यावर, ती हलुहलु घरीं परत आली. या वेळीं चंद्रमा आकाशातून पश्चिमेकडे किंचित् कलला होता. सुधांशु आपल्या धवल प्रभेने तिला स्नान घालीत होता ! जणो आकाशींचा हा कर्मयोगी तिच्यावर उपदेशामृतवृष्टीच करीत आहे !

## प्रकरण ६ वें.

## आधीं काय ? देश कीं आदेश ?

विनायकराव, वामनराव, व लक्ष्मीबाई यांच्या मृत्यूचे दुःख दोन-चार महिने जाऊन थोडेसे कमी होत आहे, तों इकडे तात्यासाहेबांचें कुटुंब—साध्वी रमा—ही शेवटीं क्षयाने मृत झाली ! त्या दुःखाची छाया तात्यांच्या घरावर कांहीं कालपर्यंत वास करीत होती !

* * *

वरील हकीकतीस वर्ष दीड वर्ष झालें. सध्या वेणू मिडवाईफ् व नर्स् होऊन नाशिक येथेंच गणपतरावाच्या प्रमाणेंच गोरगरिबांची व व आडल्यानाडल्यांची सेवाशुश्रूशा व बाळतपणें करीत असे. तथापि, तिचा तो चरितार्थाचाहि थोडाबहुत धंदा असल्यामुळें, व तिच्या एकंदर हुशारी व चलाखीमुळे, श्रीमंतांकडून तीस दरमहा बरीच प्राप्ति एकंदरींत होऊं लागली होती. चंपू सहाव्या यत्तेंतच रखडत होती. लीला मात्र मॅट्रिक पास होऊन सध्यां मोकळीच होती. गणपतरावांनीं पुन्हां विवाह करावा म्हणजे अनंतरावासहि आग्रह करता येईल, आपणाला तर काय आतां लग्न करतांच येणार नाहीं, अशा सबबीवर तात्या गणपतरावास लग्न करण्याचा आग्रह करीत होते. परंतु गणपतराव "पाहू" "पाहू" म्हणून लांबणीवरच टाकीत होते. तेव्हा अनंताच्या तरी मनांत लग्न करायचें आहे कीं नाहीं ? हे कळण्यासाठीं तात्यांनीं एक दिवस त्यास तसें

विचारले; त्यावर अनंतरावांनीं, " सध्यां कांही विचार नाहीं, पुढें काय होईल ते पाहू, ' असें उत्तर दिलें. लीलेचा वाङ्निश्चय झाला असला, तरी प्रत्यक्ष विवाहसमारंभ बिलकुल झालेला नसल्यामुळें, तिचें लग्न दुसऱ्या कोणा योग्य वराशीं करावें, कारण त्यांत शास्त्राची हरकत कांहींच नाहीं, म्हणून त्यांनीं लीलेला विचारलें, त्या वेळीं तिनें आपल्या कपाळावरील कुंकू पुसून, " मला आतां मुळींच लग्न करायचें नाहीं ! " असें दुःखपूर्ण बाणेदारपणानें उत्तर दिलें. वामनराव व विनायकराव मृत्यु पावल्यावर, विष्णुपंत एकटेच पुरुष घरांत राहिले त्यांची पत्नी वारल्यावर कांहीं दिवसांनीं चंपी, वेणू, व कृष्णाबाईनें देखील त्यांना विचारलें, तात्या, गणपतराव वगैरेंनी त्यांना सांगून पाहिलें, परंतु " पाहूं, पाहू " करीत विष्णुपंत दुसऱ्या लग्नाचा विचार लांबणीवर टाकू लागले. याप्रमाणें लग्नकार्यादि दगदगीच्या बाबतींत दोन्ही घरीं शांतताच होती !

* * *

तात्याच्या घरची स्थिति पूर्ण श्रीमंतीची होती, हे मागे सांगितलेंच आहे. नुसतें बसून खाल्लें, तरी देखील कित्येक पिढ्या पुरण्यासारखी त्यांची अलोट संपत्ति होती. मॅट्रिक झाल्यावर व भावी संसाराचा दिव्य स्वर्गीय चित्रपट एकाएकी अदृश्य झाल्यामुळें ' जोगिणी 'च्या अवस्थेंत असणाऱ्या ' नव बाला ' लीलेचा, एक मुलींची स्वतंत्र व फुकट शाळा—विनीयत्तेपासून मॅट्रिकपर्यंत, आतांपर्यंत सुचविल्या गेलेल्या सर्व सुधारणाचा व सूचनांचा योग्य तो अवलंब करून—चालविण्याचा विचार होता.

याप्रमाणं सध्या दोन्हीं घरीं शांततेचें साम्राज्य विलसत होतें. वादळापूर्वी समुद्राच्या पृष्ठभागावर अशीच अपूर्व शांति वास करीत असते ! याप्रमाणें, दोन्ही घरांचें सध्यां आपणांस जरूर तें सकृद्दर्शनीं दिसणारे स्वरूपावलोकन करून, आपण पुढें चालू.

ती दुपारची एकदोन वाजण्याची वेळ होती ! भगवान् सहस्ररश्मी आपलीं चंड किरणें पृथ्वीतलावर फेकून सर्व जगतीतल भाजून काढीत होता ! अशा वेळीं पंचवटींतल्या आमच्या तात्यांच्या घरातील हॉलमध्यें तात्या, गणपतराव, अनंतराव, विष्णुपंत, वेणु अशी मंडळी बसली होती.

लीला आपणास समाजसेवेचें कार्य किती व कसें करता येईल, याविषयीं विचारविनिमय करण्यासाठीं आपल्या मैत्रिणीकडे गेली होती. चपी आपल्या घरींच होती. हॉलच्या सर्व मोठया खिडक्या उन्हाच्या झळया येऊ नयेत म्हणून लावून घेतलेल्या होत्या एक दोन लहान खिडक्या उघडून त्यावर चिकाचे विविध रंगी पडदे सोडले होते! सर्व खिडक्यांच्या वरील बाजूस बसविलेल्या रक्त, नील, हरित, अशा जाड व नक्षीच्या काचांतून रविकिरणे अत्यंत कोमल बनून व त्या त्या रंगांनीं नटून थटून दिवाणखान्यामध्ये इतस्ततः पसरलीं होतीं! तात्याचा दिवाणखाना नेहेमींच रमणीय असे. सर्व हॉलभर जाजम पसरून त्यावर चित्रविचित्र गालिचे घातले होते! तीनचार कोच अत्यंत शुभ्र सरपोस घालून व्यवस्थित रीतीने ठेवून दिले होते. शिवाय एकदोन इझिचेअर्स् ( आरामखुर्च्या ) व रॉकिंग चेअर्स् ( आंदोलन खुर्च्या )हि होत्या. दिवाणखान्याच्या मध्यें एक शिशवीच्या लाकडाचें मोठें ' राऊंड टेबल ' ( वर्तुलाकृति मेज ) असून त्याच्या सभोंवार पाचचार खुर्च्याही व्यवस्थित रीतीनें मांडून दिल्या होत्या. भिंतीवर सभोंवार उच्च अशा जागीं अंतरा-अंतरावर कांहीं ऐतिहासिक,कांहीं देवादिकांचीं,व कांहीं मदनमोहन अशा रमणींचीं "रविवर्म्याचीं चित्रे लावली होतीं! एक दोन मोठे बिलोरी आरसेही भिंतीस टांगले होते! एक दोन गव्याचीं शृंगेंहि त्या दिवाणखान्यास शोभा आणण्याचा यत्न करीत होतीं! टेबलावर कांहीं दैनिक पत्रे व कांहीं मासिकें पडलीं होतीं. एक दोन कपाटें तात्यांच्या येथील ' कुटुंब-ग्रंथ-संग्रह ' युक्त होऊन त्या दिवाणखान्यांत उभीं होतीं! मंडळीमध्ये संभाषण चालू होतेः—

" मग काय अनंतराव, आपण नाहींच का लग्न करीत ? " विष्णुपंत म्हणाले.

" विष्णुपंत, " अनंतराव म्हणतात, " असें मी आपणास कधींच सांगितलें नाहीं. तथापि, सध्या मला ते कर्तव्य नाहीं. व पुढचें जरी कुणास कांहीं निश्चितपणे सांगतां आलें नाहीं, तथापि माझ्या विचाराचा ओघ लग्न न करतां आजन्म ब्रह्मचारी राहून आपल्या देशाची सेवा तनमनधने करून होईल तितकी करावी, याच दिशेनें वहात आहे. खरो-खर विष्णुपंत, सध्यां आपल्या देशास कार्यकर्त्या तरुणतरुणींची किती

जरूर आहे, हें आपण पहातच आहां ! आपल्या बंधुभगिनींचीं ही दुःखे पाहून देखील त्याचे निवारण न करतां, आपण आपल्याच स्वार्थी विषयसुखांत लोळत पडणें, हे आपणासारख्या सुशिक्षितास तरी खास शोभत नाहीं ! विवाह करूनही कार्य करतां येत नाहीं, असें माझें म्हणणें नाहीं, व वैवाहिक स्थितींत देखील जे आपल्या कर्तबगारीची शिकस्त करीत असतील त्याची त्याच्या परि धन्य—खरोखर धन्यच—आहे! तथापि, वैवाहिक बंधनाची बेडी पायांत अडकवून घेण्याचे आधीं प्रत्येक तरुण-तरुणीनें ब्रह्मचारी राहण्याचा निश्चय करून तो शक्य तितका पाळावा यांतच त्यांचें, त्यांच्या आत्म्याचे, त्याच्या देशाचें, व सर्व जगाचे कल्याण आहे, असें तुम्हांस वाटत नाहीं काय ? कारण आत्मोद्धाराच्या दृष्टीनें पहातां परमात्म्याची जोड, ही विषयकर्दमाच्या गाद्यागिरद्यांवर लोळून कधींच होत नसते. अर्थात् विषयाच्या भयंकर मोहिनीपासून सर्वथा अलिप्त राहणे ही गोष्ट म्हणजे सुळावरची पोळी आहे हें मला कबूल आहे, आणि यासाठींच, संसार करून तरी होईल तितका परमार्थ करा, अशी जनकश्रीकृष्णादिकांची शिकवण आहे. तथापि विष्णुपंत, माझें म्हणणें बहुजनसमाजास नसून व्यक्तिविषयक आहे. व त्या दृष्टीने "सर्वथा न करावा स्त्रीसंग" असें 'वेदांतवाणी' बोलणारे तुकोबा सांगतात. आणि याचसाठीं 'विवाहमंगलीं' होणाऱ्या 'सावधान 'या सूचनेस समर्थ जागले! विष्णुपंत, विवाह करायचा म्हणजे काय, कीं ज्यांना ह्या विषयवासनेची दुर्दम्य मोहिनी आवरत नाहीं, त्यांच्यासाठी ही योजना आहे. परंतु ज्याप्रमाणे कुपथ्यकारी पदार्थांचें, आपल्या अनिवार जिव्हा-लौल्यासाठीं, डॉक्टरच्या परवानगीनें, कसेबसें थोडेसें तरी सेवन करण्यापेक्षां अंगांत असणाऱ्या आत्मनिग्रहाच्या जोरावर त्याचें अजिबात सेवन न करणेंच केव्हांही श्रेष्ठ व श्रेयस्कर होय, त्याचप्रमाणें ह्याहि गोष्टीचें आहे. 'विधीनें सेवन। विषय त्यागातें समान—' ह्यांतील खोल अर्थ हाच आहे ! याचसाठीं 'रामकृष्णवाक्सुधेंत' रामकृष्ण नरेंद्रांच्या ब्रह्मचर्याची स्तुति 'बिन् डागळलेलें भांडें' इ. रीतीनें मुक्त कंठानें करतात. तथापि माझ्या म्हणण्याचा भाग असा नव्हे कीं, कोणीही लग्नेंच करू नयेत. कारण लग्न न करण्याच्या—ब्रह्मचर्याच्या—टैऱ्याखालीं होणाऱ्या अनान्वित दुराचारासारखी शरमेची दुसरी कोणतीच गोष्ट नसेल ! तथापि, लग्न करण्याच्या कामीं

स्त्रीपुरुषास कोणच्याही तऱ्हेचा जुल्म नसावा. धार्मिक, सामाजिक, राजकीय, कोणच्याहि बाबतीत काय, अत्यंत न्यायीपणा व निःपक्षपाती-पणा याचें वास्तव्य समाजात असेल,तोच समाज वंदनीय होय ! बाकीच्या समाजांनी आपल्या थोरपणाची कितीही टिमकी वाजवली, तरी त्यांस मी काडीइतकेंहि महत्त्व देत नाहीं ! कारण, केव्हाहि जुलमाने कार्य होत नसतात. जुलमाने साधु निर्माण होत नाहींत, जुलमानें ब्रह्मचारी पैदा होत नाहींत, व जुलमाने ब्रह्मचारिणीही मिळत नसतात ! कुठेंही काय, कोणच्याहि समाजात काय, साधुसंत, ब्रह्मचारी, अशी रत्नें क्वचितच पैदा होतात. रामदासासारखे अमोलिक हिरे हाताच्या बोटावरच मोजावे लागतात ! पण असेच हिरे जितके व जेणेकरून निर्माण होतील अशा तऱ्हेचा उपदेश, शिकवण, व जुल्मरहित मन वळविण्याची तऱ्हा व परिस्थिति ज्या समाजात असेल, तोच समाज सर्व समाजात अत्यंत श्रेष्ठ होय असे तुम्हांस वाटत नाहीं काय ? असा समाज, विष्णुपंत, मला आपल्या कल्पनेच्या हृदयंगम दृश्यातच पहावयास मिळतो आहे, इतरत्र कोठेंही त्याचा वास नाहीं, ही किती दुःखाची गोष्ट आहे बरे ? अशा माझ्या ह्या कल्पनासृष्टींत दिसणाऱ्या दिव्य स्वर्गीय समाजाच्या दृष्टीनें पाहता, एकंदरींत एवढे निष्पन्न खास होतें कीं, असाच समाज असावा अशीच तुकारामासारख्या महात्म्याची इच्छा होती आणि विष्णुपंत एके काळीं असा समाज—निदान पुष्कळसा ह्याच वळणाचा—समाज ह्या आपल्या भारतवर्षांत होताही. व त्या वेळी संपत्ति, सुख, व ऐश्वर्य यांनीं तो कसा डवरलेला होता ! परंतु त्या वैभवाच्या शिखरा-वर—Spiritual—आत्मिक वैभवाच्या शिखरावर आरूढ झालेल्या समाजावरून सध्याच्या अधःपतित व विषयैकपरायण समाजाकडे दृष्टि फिरविली, म्हणजे विष्णुपंत, हृदय कसे दुःखशोकाने भरून येते," असें म्हणून अनंतराव क्षणैक थांबले. काहीं वेळ विसावा घेऊन ते पुढे बोलू लागलेः—

" विष्णुपंत, माझ्या बोलण्यावरून आपणांस अशी एक शंका येईल की, मी म्हणतों हें सर्व काव्यदृष्टीने मोठें हृदयंगम असले, तरी ते प्रत्यक्ष कसे दृष्टीस पडावे ? तर यावर मी आपणांस एक उपाय सुचविणार आहे.तो अगदीं बिनतोड आहे असे नाहीं. तथापि,असे उपाय क्वचितच

दृष्टीस पडतात. पण त्याने कार्य होण्याचा संभव जर जास्त सुकर असला तर, केव्हाही दुर्मिळच अशा ब्रह्मचर्ययुक्त तरुणतरुणी त्याने थोडया-बहुत तरी जास्त निर्माण होतील, असें वाटते. मात्र माझ्या काल्पनिक समाजाचे हुबेहुब चित्र जिथे पाहावयास सांपडेल, तिथेंच ह्याचा संभव जास्त, हे काहीं सांगावयास नको. तो उपाय म्हणजे परमात्म्याच्या आदेश-ग्रहणाचा होय ! आधीं काय ? देश कीं आदेश ? असा याच्यासंबधीं सवाल केल्यास, " आधीं यांनी आदेश ग्रहण करावा व मग देशाच्या कार्याला लागावे !" असेंच मी नेहमीं उत्तर देईन! 'रामकृष्णा'नीं आपल्या उपदेशात समुद्रांत उडी टाकणारास हळद अंगास लावून जाण्यासंबधाचा दिलेला दृष्टांत येथेंही पूर्ण लागू पडतो. खरोखर विष्णुपंत, आपल्या समाजांतील पुढारी म्हणून मिरविणाऱ्या किती तरी पुढाऱ्याची नैतिक वागणूक वाईट असते ! याला अपवाद काहीं असतील, नाहीं असें नाहीं. परंतु बाकी सगळीकडे बजबजपुरी ! ज्याना स्वताचा उद्धार करतां येईना, ते देशाचा उद्धार करावयास निघतात ! ज्यांना स्वताचें पावित्र्य व शील राखतां येईना, ते पावित्र्याच्या व शीलाच्या लब्या लब्या गप्पा ठोकतांना दृष्टीस पडतात ! " दैवयोग कैसा फिरला " या एका पद्यात या स्थितीचे मोठें बहारीचे वर्णन आहे, तें किती बरे सत्य आहे ? परंतु अशा पुढाऱ्याची मान्यताही जितक्यास तितकीच असते. " आधीं केले मग सांगितलें " ह्या कोटींतल्या समर्थ तुकारामादिकांचा स्वतः करून मग दुसऱ्यास उपदेश करण्यावर विशेष कटाक्ष आहे, तो यासाठींच.

" करुनिया दावी । त्याचे पाय माझे जिवीं ॥
बोले तैसा चाले । त्याचीं वदावीं पाउलें । "—तुकाराम

" क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे । "

" बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करोनि बोलणें ।
तयाचीं वचने प्रमाणें । मानिती जनीं ॥"—रामदास

इत्यादि वचनावरून हीच गोष्ट उघड होते. इतकेंच नव्हे, तर स्वतः त्याप्रमाणें न वागतां—किंबहुना त्याउलट वागून—जो नुसत्या देश-भक्तीच्या, आत्मोन्नतीच्या, समाजसुधारणेच्या वगैरे गप्पा मारीत असतो, त्यास समर्थांनीं " करटा " म्हटलें आहे, ही खरोखर दूषणदानाची हद्द

झाली ! यापासून आपल्या समाजानें कांहींच बोध घ्यावयास नको काय ? ज्याच्या त्याच्या जिव्हाग्रीं विलसणारें हें वाक्पांडित्य एक शतांशानें जरी प्रत्यक्ष आचरणांत येईल, तरी किती बहार होईल !

विष्णुपंत, गृहस्थाश्रमाची किती जरी स्तुति केलेली असली तरी ती ब्रह्मचर्याच्या तेजापुढें—तेजपूर्ण कार्यापुढें—केव्हांही फिक्कीच पडणार ! स्वतंत्रतेच्या सात्त्विक आनंदानें आकाशांतून भराऱ्या मारणाऱ्या पक्ष्यास एखाद्या मोठ्या सुंदर आवारांत जरी कोंडून घातलें, तरी त्यास जितका आनंद लाभेल व अनंत देशपर्यटणादिकार्यांचें सौख्य प्राप्त होईल, तितकेंच एखाद्या ब्रह्मचाऱ्याच्या पायांत विवाहशृंखला अडकविल्यानें त्यास कार्य करून आनंद मिळणार आहे ! कुठें तो ब्रह्मचारी विहंगाचा स्वातंत्र्यानंद व कुठें ह्या गृहस्थाश्रमी पक्ष्याचें पारतंत्र्यदुःख ! विष्णुपंत, बहुजनसमाजास केली जाणारी शिकवण व उपदेश वेगळा व व्यक्तीस केला जाणाऱ्या उपदेशाचा ठसा निराळा असतो! तथापि, सर्वत्र न्यायीपणा व पावित्र्याचरण ह्यांच्या हृदयंगम रंगानें शोभिवंत होणारी व माझ्या दृष्टीपुढें चलच्चित्रासारखी नाचून माझ्या हृदयास आनंदविणारी समाजाची ती सिनेमाची फिल्म—तो चित्रपट—विष्णुपंत, माझ्या कधींतरी दृष्टीस पडेल काय ? तो कधीं पडेल तो पडो—विष्णुपंत, ह्या माझ्या कल्पनासृष्टींतल्या सुखस्वप्नास आपण "Utopian Dream" म्हणा हवें तर—परंतु त्या फिल्ममधील रंगभूमीवर वावरणाऱ्या विवाहित व अविवाहित अशा तरुण-तरुणींमध्यें मी आपला ब्रह्मचाऱ्याचा पार्ट—माझी ती भूमिका—मी पार पाडण्याचा अटोकाट यत्न करणार ! परमेश्वरानें, त्या जगच्चालकानें मला ह्या माझ्या कार्यांत साह्य करावें, एवढीच माझी त्या परमात्म्याजवळ प्रार्थना आहे, आणि " सत्य संकल्पाचा दाता भगवान् " ती माझी मनकामना पूर्ण करीलच करील, अशी माझी खात्री आहे !" याप्रमाणें अनंतरावांनी आपलें हृदयींचें गूज बोलून एक सुस्कारा टाकला व विसावा घेण्यासाठीं ते कोचावर मागें कलंडले! अनंतरावाच्या ह्या अधिकारयुक्त व तेजस्वी वाणीनें सर्व मंडळी नुसती थक्कच झाली! त्यांच्या तेजस्वी भाषणावर आक्षेप घेण्यासारखें त्यांत कांहींच नव्हतें. उलट, सर्व मंडळींनीं या त्यांच्या अत्यंत उच्च, उदात्त, व पावित्र्यतेज-

पूरित अशा भाषणाबद्दल त्याची वाहवाच केली! मग इतरही बऱ्याच गप्पा झाल्या. नंतर कांहीं वेळानें टिफिन् वगैरे करून मंडळी फिरावयास बाहेर पडली

## प्रकरण ७ वें.

## गंगेच्या घाटावर !

प्रातःकाळीं ४॥–५ वाजण्याचा समय होता! ती पौर्णिमेची रात्र असल्यामुळें सुनील आकाशांतून सुधांशु आपल्या धवल ज्योत्स्नेनें वसुंधरेस अमृतस्नान घालीत होता! त्या अमृतजलाचे ओघळ आर्द्र अशा वृक्षपाषाणादिकांच्या पृष्ठभागावर विलसत होते! दवबिंदूंचे जागोजागीं चमकणारे मौक्तिककण हें त्याचेंच अपर रूप होतें! अशा वेळीं गंगेच्या घाटावर नदीजलांत आपलें कोमल पदपल्लव सोडून एक षोडश वर्षाची बाला बसली होती. गौरकाय बालेनें एक धवल वस्त्र परिधान केलें होतें! सुंदरीचा भ्रमरभ्रमकर कुरल केशपाश पाठीवर, स्कंधावर विहरत होता. प्रातर्वायूच्या शांतप्रशांत लहरी नदीजलास कंपित करीत होत्या, सुंदरीच्या वसनाशीं क्रीडत होत्या, रमणीच्या मुक्त अलकराजीस इतस्ततः नाचवीत होत्या. सुंदरीचा वर्ण गौर, तिनें परिधान केलेलें वसन शुभ्र, व तिच्या सभोंवार उसळलेला ज्योत्स्नामृतसागर—प्रकाशोदधी—हि धवलच! अहाहा! किती हा बहारीचा संगम! सर्वत्र शांततेचें—गाढ शांततेचें साम्राज्य पसरलेलें होतें! अशा शांत, गंभीर, आनंददायक प्रातःकालच्या रमणीय प्रसंगीं पवित्र गंगामातेच्या जलांत पाय सोडून बसलेल्या त्या दिव्य बालेकडे पाहिलें असतां, ही प्रत्यक्ष पावित्र्यदेवता तर मानवी देहानें येथें अवतरली नाहीं ना, असा भास होई! पवित्र वस्तूंचा कोण हा नितांतरमणीय संगम! पवित्र नदीजल, निर्मल नीलाकाश, सर्वत्र पसरलेली सुधांशुची प्रभा, व त्या प्रभेंत अवगाहन करणारी पवित्र सुंदरी! असें पावित्र्याचें हृदयंगम दृश्य एखादा चितारी रंगवील काय?

परंतु अरेरे, वाचकवृंद, आपण त्या सुंदरीच्या धवल भालप्रदेशाकडे

पाहिलें काय? आपल्या अनुपम तेजानें चमचम करीत सलज्ज हास्याची कौमुदी सुधांशुच्या कौमुदींत मिसळून देणाऱ्या आकाशींच्या सनाथ तारारमणी ह्या पृथ्वीवरील अनाथ बालिकेच्या धवल कपाळाकडे पाहून तिचा निर्दय उपहास करीत होत्या! परंतु आपल्या अतुलनीय सौंदर्यप्रभेनें स्वर्गीच्या तारारमणीसहि लज्जित करणाऱ्या सुंदरीला त्याचें भानच नसावें असें दिसलें! निसर्गाचा नितांतमनोहर देखावा पाहून मनांत उठणाऱ्या अनंत गंभीर विचारतरंगाशीं ती तन्मय झालेली होती! सुधांशुच्या सुंदरी जरी त्या अनाथ बालेस हसत होत्या, तरी कारुण, वात्सल्य, स्नेह, दया, अनुकंपा, इत्यादि कोमल मनोविकारांनीं अंतर्बाह्य भरलेलें सुधांशुचें हृदय तिच्या अनाथ अवस्थेकडे पाहून नदीजलावर कंप पावत होतें! सुंदरीची गंभीर विचारमाला चालू होती! तिच्या मुखचंद्रावर दुःखाची छटा विलसत होती. सात्त्विक पावित्र्यतेचें अलौकिक दिव्य तेजहि त्या वदनावर खेळत होतें! वर्षादीडवर्षापूर्वी आपल्या मनोहर हास्याच्या कौमुदीनें आसमंतातभार्गी तें मुखमंडल दिव्य तेज पसरीत असे. परंतु सध्या तें मुखमंडल क्वचितच हास्य करी. व त्या वेळींहि राजसपणापेक्षा सात्त्विकतेचा आनंद तिच्या वदनावर प्रतिबिंबित झालेला दिसे! लीलेचें ह्या जगांतील राजस ऐश्वर्य संपून ती पारलौकिक सात्त्विक ऐश्वर्यानें विनटली होती! लीला आत्मगत बोलत होती:—

त्या गोष्टीला आज दीड वर्ष होऊन गेलें! नाथ, आपण ह्या नश्वर जगास व आपल्या लाडक्या लीलेस सोडून गेलांत त्यास आज दीड वर्ष झालें! हाय! देवा, ह्या अभागिनीस एकटीच टाकून आपणास कसें हो एकटेंच जाववलें? प्राणनाथ, 'ह्या अभागिनीस आतां आपलें दर्शन होणार नाहीं' ह्या विचारानें माझ्या हृदयाची किती कालवाकालव होत आहे, याची आपणास कल्पना येते काय? भवितव्यते, आशेच्या ऐंद्रजालिक दीपाची मोहिनी दाखवून क्षणार्धांत तो देखावा पुसून टाकतांना तुला कांहींच कां ग वाटू नये? माझ्यासारख्या किती तरी भगिनी विलाप करीत असतील, त्याची तुला कांहींच कींव येत नाहीं ना?" असें म्हणून लीलेनें एक गंभीर सुस्कारा टाकला!

"नाथ," आकाशाकडे आपले विलोल नेत्र लावून लीला पुढें बोलूं लागली, "याच गंगेच्या काठावर, याच दिवशीं, आपण दीड

एक वर्षापूर्वी भावी आनंदाच्या किती तरी गोष्टी बोलत बसलों होतों, तें तुम्हास आठवतें का ? परंतु अरेरे, एका अजब शक्तीच्या सूत्रचालकत्वावर आनंदानें नाचणाऱ्या आम्हा मानवास आमच्या पराधीनतेचा विसर पडून आम्ही जों क्षणैक स्वर्गीय आनंदांत दंग होतों, तोंच ती शक्ति आम्हास आमच्या परवशतेची जाणीव करून देते ! अरेरे, परवशतेच्या कटु जहराचें अखंड पान करणाऱ्या मानवा, कोण ही तुझी भूल ! तुझ्या क्षणांक्षणीं रडण्याचे करुण विलाप ऐकून एखाद्या पाषाणाचेंहि चित्त द्रवेल ! परंतु, परवशतेंतच आनंद मानणाऱ्या जीवास याहून दुसरें काय मिळणार ? सुखदुःखाच्या झोल्यावर बसलेल्या जीवा, एका महात्म्या कवीनें—" man-a pendulum betwixt joy & sorrov " असें तुझें वर्णन केले आहे तें किती यथार्थ आहे ? नाथ, अशा क्षणांक्षणीं रडविणाऱ्या सुखापेक्षां आपण दोघेही चिरंतन सुखाची जोड करून घेऊ व त्या दिव्य लोकांत अनंत काळ सुखानें राहू ! नाथा, आपणही यालना तिथे राहावयास ? " असें म्हणून लीला पुन्हा स्वस्थ बसली ! तिचे नेत्र तसेच आकाशाकडे लागले होते ! विचारमालिकेंत गर्क झालेल्या रमणीस या वेळीं आपल्या देहाचें देखील भान नसावें असें दिसलें ! तिनें आपला कोमल वामकर घाटावर टेकला होता ! सव्य करकमल तिच्या मांडीवर पडलें होते ! सुंदरी निश्चल मनानें चंद्रबिंबाकडे पहात होती ! सुंदरीच्या देहास सुखविण्यासाठीं नदीच्या लाटा तिच्या पायावर लोळण घेत होत्या, वायूच्या शांतलहरी तिच्या देहलतिकेस शीतलता आणीत होत्या, चंद्रज्योत्स्नाही तिला आपल्या शीतलतेंत लपेटून घेत होती ! हळुहळु लीलेनें आपले नेत्र खालीं केले ! ती पुन्हा स्वगत बोलूं लागली:—

" परवां मी बाहेरून घरीं आल्यावर दादांनी ( अनंतरावानी ) मला त्या दिवशीं झालेलें संभाषण सांगितलेन्.अहाहा! दादाचे व माझे विचार कसे तंतोतंत जुळतात. खरोखर आमच्या सर्व घरात मला दादा किती प्रिय वाटतो! त्याचें माझे विचार किती पण जुळतात ! दादा, जगच्चालकाचा आदेश ग्रहण करण्यास तू कुठेंही जाशील, कारण तू पुरुष आहेस, परंतु मजसारख्या तरुणीच्या मनांत तोच विचार आल्यास त्यांनीं कोठें जावें ? त्यांना समाजांतल्या समाजांत राहूनच होईल तितकें ईश्वरचिंतन

करून आदेशग्रहण केलें पाहिजे! अहाहा, मजसारख्या विचाराच्या तरु-णींस काहीं वर्षे तपाचरणासाठीं एकांतवासांत घालविण्यास एखादा 'योगीनींचा मठ' निघाल्यास किती बहार होईल! पण असा मठ नसला, म्हणून ही लीला डगमगणारी नव्हे! ज्याला इच्छा आहे त्याला अनंत मार्ग मिळतात. कोणच्याही कार्यासंबंधानें ज्याची खरीखरी उत्कटता असते, तो कोणच्याहि स्थितींत त्यापासून रतिमात्र न ढळतां तें कार्य करतोच करतो! हृदयाची तळमळ मात्र तितकी हवी. माझ्या प्राणनाथांना समाजसेवेची किती आवड होती! ते जर जिवंत असते, तर आम्ही दोघांनीं मिळून समाजसेवेचा स्वर्गीय आनंद लुटला असता! परंतु देवा, आपले हृदयाच्या आवडीचें कार्य मी यापुढें आजन्म करून, प्रत्येक कार्य करतांना आपल्या आठवणीच्या सुखाचा आस्वाद घेऊन, त्याच अमृतपानावर मी ताजीतवानी होत जाईन! माझ्या सुखाचा आधार म्हणजे आतां एक समाजसेवा!" असें म्हणून लीला थांबली! या वेळीं सुधांशूचा आरक्त गोल अस्ताचलावर स्थित झाला होता! त्याच्या रक्तधवल किरणांचा नाच नदीतरंगावर चालू होता! गंगामातेचें स्नान करण्यासाठीं हळुहळू मंडळी येऊं लागली! जगतांत चेतना संचरूं लागली. निद्रित जग हळुहळू जागृत होऊं लागलें. प्रातःकालीन भूपाळ्यांचा मधुर स्वर मधूनमधून एखाद्या भाविक कंठांतून ऐकूं येण्यास सुरवात झाली! तेव्हां लीला तेथून उठली. तिनें मावळत्या चंद्रास व वीचिमालिनी गंगामातेस अनन्यभावानें नमस्कार केला! चंद्रानें आपला रक्तधवल कर तिच्या मस्तकीं ठेवला! जणों तो तिला पावित्र्याचा आशीर्वादच देत आहे! हळुहळू लीला हरिगुण गात घरीं आली!

## प्रकरण ८ वें.

# समाजसेवेचा उपोद्घात.

लीलेने गंगेच्या घाटावर केलेल्या निश्चयाप्रमाणे खरोखरच आपणास सर्वस्वीं समाज-सेवेच्या कार्यास वाहून घेतलें. सर्वांच्या अत्यंत प्रेमास पात्र अशा लीलेचा वाङ्निश्चय ठरला, त्या वेळीं एक लाख रुपये तिला देणगी दाखल—ज्याला 'यौतक' असें नामाभिधान आहे—तिला देण्याचें तिच्या प्रेमळ भावांनी ठरविलें होतें ! त्या लाख रुपयाचा विनियोग—पोटापुरते आपणास थोडेसे पैसे ठेवून—तिनें सर्वस्वी देशकार्याकडे—समाज सेवेकडे अर्पण करून करण्याचा निश्चय केला. त्यासाठीं एक मोठी थोरली सुंदर इमारत एक प्रशस्त जागा खरेदी करून बांधण्याचा तिचा विचार होता. त्यांत ' अनाथविद्यार्थिनीगृह ' 'स्त्रीवाचनमंदिर' व पुण्यपत्तनस्थ ' सेवासदना'तलि शक्य तितक्या सोयी आणण्याचा तिचा विचार होता त्यांतल्यात्यांत ' अनाथविद्यार्थिनीगृहा ' साठीं तिची विशेष तळमळ होती. 'अनाथ' या शब्दाचा अर्थ मात्र केवळ 'विधवा' असा न करितां, ' अत्यंत गरीब स्थितींतल्या ' असा तिचा व्यापक अर्थ होता. हे आपले सर्व विचार नाशिक येथलि महिलावृंदापुढें मांडण्यासाठीं तिनें आज पंचवटींतल्या व नाशिक येथील सर्व गृहिणींना, तिच्या एका मैत्रिणीच्या ओळखीच्या घरीं आमंत्रण केलें होतें. घराच्या मागील प्रशस्त असणाऱ्या पटांगणांत आज सायंकाळीं महिलासमाज जमणार होता. असो.

ठरल्याप्रमाणें सायंकाळीं ६ वाजण्याच्या सुमारास त्या घरांतलि पटांगण रमणीगणांनीं फुलून गेलें. त्यांत बाला, तरुणी, वृद्धा असा सर्व प्रकारचा नारीगण दृग्गोचर होई. लीला, येणाऱ्या स्त्रीसमाजाचें,हसतमुखानें अभिनंदन करून त्यांना व्यवस्थितपणें आंत नेऊन बसविण्यांत आपल्या मैत्रिणींसह दाराशीं गर्क झाली होती ! सहा वाजतां बराच स्त्रीसमाज जमल्यावर लीलेनें त्या समाजास आपल्या भावी कार्याच्या रूपरेषेची स्पष्ट व सुंदर कल्पना आणून दिली.

" भगिनींनो व मातांनो," लीला बोलत होती," आपल्या समाजांत अशीं कितीतरी गरीब स्थितींत खितपत पडलेलीं रमणीरत्नें असतील कीं, केवळ योग्य मदतीच्या अभावीं त्यांना आपल्या गुणांच्या तेजानें

चमकावयास सापडत नसेल. अरेरे, "ग्रे' नामक एका आंग्ल कवीनें आपल्या एका 'स्मशान–गीता'त म्हटल्याप्रमाणें, अशीं कितीतरी रत्नें केवळ दारिद्र्यामुळें समाजसागराच्या अज्ञात अशा कपाऱ्यातून पडली असतील, किती तरी सौगंधिक पुष्पे केवळ द्रव्याभावामुळे सुकून जात असतील! भगिनीनो, सध्याच्या आपल्या देशाची परिस्थिति इतक्या निकृष्ट अवस्थेला कां पोहोंचली बरें ? सध्यांच्या माता पूर्वीप्रमाणें वीर, कवी, मुत्सद्दी, संत, राष्ट्रभक्त, अशा दिव्य संतानास का बरें प्रसवीत नाहीत ? पूर्वींच्या वैभवशाली स्वातंत्र्यात वास करणाऱ्या मातांची शिकवण व योग्यता कुठे, व अलीकडल्या माताची स्थिति कुठें! प्रिय भगिनींनो, कोणच्याही देशाचा उद्धार करणे, हे आपल्या हातचें आहे! "जिच्या हातीं पाळण्याची दोरी, ती जगा उद्धरी!" हें वचन आपला अधिकार किती मोठा व जबाबदारीचा आहे, हें आपणास दाखवीत नाहीं काय ? तेव्हा सुंदर गृहिणी व पवित्राचरणी स्वदेश सेविका निर्माण करून, शक्य तितका राष्ट्रकार्यास हातभार लावावा, असा या संस्थेचा उद्देश आहे! 'महिलाश्रम' व 'विधवाश्रम' असे त्याचे दोन भाग करून दोहोंतही अत्यंत गरीब व असहाय अशा स्थितींतल्या मुली घेण्याचा आमचा विचार आहे. ज्याना ऐपत असेल त्यांनीं पैसे देऊन आपल्या पत्नी अथवा भगिनी, आमच्या येथील शिक्षणामृताचे पान करावयास ठेविल्यास, त्यानाही आम्ही आनंदाने संस्थेत घेऊ. मातांनो, उच्च भावना, उच्च कल्पना, व उच्च विचार हेच खरें शिक्षण नव्हे काय ? ह्या शिक्षणानें पूर्वींच्या माता, 'ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा' थय्थय् नाचत असे अशा 'गुंड्या' पुत्ररत्नास प्रसवीत असत! परंतु सध्यांच्या माता अशा पुत्ररत्नास का बरें प्रसवीत नाहींत ? याचें कारण तशा तऱ्हेच्या उच्च भावनांचा व दिव्यकल्पनाचा अभाव हेंच होय! अज्ञानांधकारांत सदैव खितपत पडून पशूसारखें लेंढार उत्पन्न करावे, त्याना कसेंबसें वाढवावें, व त्याचे 'दोन हाताचे चार हात' करून, त्याना एकदांचे पुन्हां त्याच मार्गास लावले, म्हणजे झालें आपण कृतकृत्य, अशी सध्याच्या आयाची समजूत! परंतु ही किती शोचनीय स्थिति आहे बरे ? भगिनीनो, ज्या आपली 'स्वर्गापेक्षांही योग्यता श्रेष्ठ,' तेच आपण आपल्या आळशी अज्ञानाने देशाचें व आपल्या समाजाचें किती भयंकर नुकसान

करीत आहोत, याची आपणास कल्पनाहि नसेल ! अप्रत्यक्षपणें इतकेंहि म्हणण्यास मला हरकत वाटत नाही कीं, आपला देश पारतंत्र्याच्या रौरव-नरकात लोळत पडण्यास आपणच कारण आहोंत ! प्रिय भगिनींनो, ही आपली स्थिति सुधारावी, अशी आपली इच्छा नाही काय ? इच्छा असेल—आतापर्यंत आपल्या हातून होणाऱ्या अक्षम्य पातकाचें क्षालन करण्याची तळमळ असेल—तर यापुढे तरी जागे होऊन कार्यास लागा, अशी माझी आपणांस नम्र विनति आहे. शेवटी या संस्थेस एक विनयत्तेपासून मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिक्षण देणारें—त्या कामीं एका पैचीहि तोशीस न लागतां देणारें—'कन्याशाळा' गृहहि जोडण्याचा आमचा विचार आहे. तरी या कामी माझ्या भागिनींनी शारीरिक, मानसिक, द्रव्यद्वारा, ज्यांना जशी शक्य, तशी त्यांनी मदत करावी व आपल्या मातृभूमीचा उद्धार करण्याचे महापुण्याची जोड मिळवावी, अशी माझी सर्वांस हात जोडून विनति आहे. अजून एकदोन गोष्टीचा उल्लेख करावयाचा राहिला. तो म्हणजे या संस्थेस जोडूनच एक ' स्त्रीवाचनमंदिर 'हि उघडलें जाईल. तें पंधरवड्यांतून एक दिवस बंद राहील, व त्या दिवशीं महिलासमाजाची सभा होऊन, एखाद्या उपयुक्त विषयावर संभाषण करून विचार-विनिमय केला जावा असा आमचा विचार आहे. '' असे म्हणून लीलेनें आपले भाषण पुरे केले. तिचें भाषण चालू असता समाज-सेवेच्या पवित्र व्रताच्या निश्चयाचे सात्विक तेज तिच्या मुखमंडलावर विलसत होतें. श्रोतृसमाजांत तिच्या भाषणाचा बराच परिणाम झाला. बऱ्याच स्त्रीवक्त्यांचीं सहानुभूतिपर भाषणें झालीं, व नंतर सभा संपली, व रमणीगण लीलेच्या समाजसेवेच्या कल्पनेची स्तुति करीत घरोघर चालता झाला!

## प्रकरण ९ वें.

# मोहिनीचें मोहजाल !

आमच्या लीलेनें वरीलप्रमाणे उद्योग आरंभिला, तसाच गणपतराव व विष्णुपंत या दोघांचाही समाजसेवेसाठीं उद्योग चालूच होता. त्यांच्या वांट्यास येणाऱ्या दीड दोन लाख रुपयांचा विनियोग गणपतरावांनीं समाजसेवेसाठीं करण्याचें ठरविलें. शिवाय त्यास वार्षिक वीस हजार रुपयांतूनही दर वर्षास ५—७ हजार रुपये मिळतच असत. त्यांतील निर्वाहासाठीं लागणारे तेवढे पैसे ठेवून बाकीचे पैसेहि ते त्याच कार्यास वहात असत. त्यांनीं एक 'अनाथविद्यार्थीगृह' काढलें व केवळ खरोखर 'अनाथ'—असहाय—अशा मुलांचाच त्यात ते समावेश करीत असत. त्यांच्या देखरेखीसाठीं विष्णुपंत त्यास येऊन मिळालें. तसेंच विष्णुपंतांच्या मृत बधूंनीं—वामनरावांनीं—व तात्यांनीं काढलेलें 'मोफत शिक्षणालय'हि, तात्या त्याची हयगय करू लागले म्हणून, गणपतराव व विष्णुपंत ह्यांनीं आपल्याकडे घेतलें व कांहीं स्वेच्छेनें काम करणाऱ्या व कांहीं पगारी, अशा शिक्षकांच्या साह्यानें, तें त्यांनीं सुरळीत चालविलें. तसेंच पंचवटींत व नाशिक येथें दोनचार "मोफत वाचनालयें"हि त्यांनीं उघडलीं व त्यांवर देखरेख करण्यासाठीं मोफत अगर पगारी सेक्रेटरी नेमले. याशिवाय 'मद्यपाननिषेधप्रसार', 'पैसाफंड', 'गोरक्षण' इत्यादि गोष्टींसाठीं त्यांनीं आपल्या अनाथविद्यार्थीगृहांतील उत्साही स्वयंसेवकांची योजना केली. तसेंच गोरगरिबांसाठीं त्यांनीं एक रुग्णालय स्थापिलें, व त्यांत गरीब रोग्यांची सेवाशुश्रूषा करण्यासाठीं गणपतराव जातीनें झटत असत. या कामीं वेणूचाहि त्यांना फार उपयोग होई. इतकेंच नव्हे, तर त्या कामीं इतरांचा कोणाचा उपयोग होणें शक्य नसल्यामुळें, गणपतराव व वेणू ह्यांनांच 'रुग्णालया'ची व्यवस्था मुख्यत्वेंकरून पहावी लागे. गरीब व नडलेल्या बायांचीं बाळंतपणें वेणू मोठ्या आस्थेनें करी. तसेंच तेथें वारंवार भरणाऱ्या जत्रेसारख्या प्रसंगीं कॉलऱ्याच्या वगैरे सांथी पसरत, त्या वेळीं दोघेही अनाथ रोग्यांची शुश्रूषा झटून करीत. याप्रमाणें गणपतराव, वेणू, व विष्णुपंत हीं तिघेहि जण लीलेप्रमाणेंच आपल्यापरी शक्य तितकी 'समाजसेवा' करीत होतीं.

परंतु आमच्या तात्यासाहेबांनीं वामनरावांच्या मृत्यूनंतर या समाज-सेवेस फाटा दिला होता, व त्यांच्या पत्नीच्या मृत्यूनंतर तर ते दिवसें-दिवस जास्तच रंगेल बनत चालले. लवकरच त्यांचा स्वभाव ओळखून त्यांच्या भोवतीं त्यांच्याच सारख्या रंगेल मंडळींचें कडें पडलें व आमचे तात्या निरनिराळ्या व्यसनाच्या प्रवाहांत दिवसें-दिवस वहात चालले ! त्यांना मदिरेचें व्यसन जडलें, जुगारीहि मधूनमधून होतीच; शिवाय वारांगनेच्याहि मोहपाशात ते हळुहळू अडकणार, अशी स्पष्ट चिन्हें दिसू लागलीं !

एके दिवशीं संध्याकाळी सहा वाजण्याचे सुमारास तात्या इतर 'समान-शील' मंडळींबरोबर आपल्या अशाच एका रंगेल मित्राच्या घरी बसले होते ! त्याचा दिवाणखाना अश्लील अशा शृंगारवस्तूंनी थाटलेला होता. कांही अर्धवट नग्नावस्थेंतलि, कांहीं पूर्ण नग्नावस्थेंतील व कांही तर त्याच्याही पलीकडे मजल पोंचलेल्या अत्यंत घाणेरड्या प्रकाराच्या मनमोहक तसबिरी सर्वत्र लावलेल्या होत्या. दिवाणखान्यामधोमध असणाऱ्या राऊंड टेबला-वर 'शांपेन' वगैरे मादिरेच्या बाटल्या व ग्लास दिसत होते. हे यांचे रंगेल मित्र असेच एक यांच्यासारखे फटिंग होते ! त्यांना बायकापोरें कोणीं नव्हती. यांचे आयुष्याचें ध्येय म्हणजे निव्वळ चैन व आषक-बाजी. वडिलांनीं यास दत्तक घेऊन त्यांच्यासाठीं कमावून ठेवलेल्या अमित द्रव्यराशीची ते आपल्या चंगीभंगीपणांत मनमुराद खैरात करीत होते. यांचे नांव नानासाहेब. सध्यां ते जवळ जवळ कफल्लक बनले होते, तरी त्यांच्या मतें आपल्या एकंदर मित्रमंडळांत आपल्या तोडीचा कोणीतरी लक्षाधीश रंगेल हवा, त्याशिवाय खरी बहार येत नाहीं, या सद्धेतूनें (!) त्यांनीं तात्यांच्या, आधींच तयार असणाऱ्या मनोभूमिकेंत, अत्यंत मोहक अशा व्यसनांचें हळुहळू बीजारोपण केलें, व तें इतकें बेमालूम कीं, तात्या त्यांना एक आपला जिवश्चकंठश्च स्नेही समजू लागले. असो. नानासाहेबांच्या दिवाणखान्यांत दारूचे पेले झोकता झोकतां भाषण अगदीं रंगांत आलें होतें:—

"मग काय तात्या ! " नानासाहेब म्हणाले, "मग येणार ना एकदां त्या रंगाजीकडे ! अहाहा, ती रंगा म्हणजे खरोखर एक रंभा

आहे ! आपणाला तर बुवा तिच्याशिवाय एक क्षणभरही चैन पडत नाहीं. तात्या, तुम्ही एकदां चलाच तिकडे. ''

" कशाला, कशाला ? '' तात्या म्हणाले, " मला नका बुवा तिकडे नेऊ ! ''

" वा, तात्या तुम्ही तर एक अगदीं मोठे विश्वामित्रच दिसतां !'' नानासाहेब म्हणाले, " पण पहा हो, एकदा त्या मेनकेस पाहिलेंत कीं, लटपटून जाल बरें कां ? '' असें म्हणून ते फिदीफिदी हसू लागले ! सर्व मंडळींत मोठा हशा पिकला ! याप्रमाणें इतरही बराच अचकट विचकट विनोद झाल्यावर, मंडळी दारूच्या धुंदींत फिरावयास बाहेर पडली !

नानासाहेबानीं आपल्या संपत्तीच्या केलेल्या या विनियोगाकडे पाहिलें, म्हणजे लाखो रुपयांचें द्रव्य आपल्या दत्तक पुत्रासाठीं हाडाचीं काडें करून साठवून ठेवणाऱ्या वडिलांची कींव करावी तेवढी थोडीच, असें वाटू लागतें. खरोखर आपल्या समाजातली ही दत्तकासंबंधीची अंध समजूत कधीं नाहींशी होईल कोणास ठाऊक ? ज्यांना खरोखर पोरेंबाळें होऊन तीं दुर्दैवानें लहानपणींच मरून जे शेवटीं लौकिक दृष्ट्या निपुत्रिक राहतात त्यांनीं खरोखर ' निपुत्रिकाला नरकवास ' या शास्त्रवचनानें बिलकुल भिऊन जाऊं नये. कारण, अजिबात लग्नच न केल्यामुळें ज्याना पुत्र असणें अशक्य, अथवा लग्न करून ज्याचीं पोरेंबाळें जगत नाहींत, त्याच्यासाठीं वरील शास्त्रलिखित नसून, ज्यांना विवाह करूनहि मुलें अजिबात होत नाहींत त्याच्यासाठींच तें वचन आहे. यासाठींच ते दुसरी, तिसरी भार्या करून एखादें पुत्रसंतान होतें कीं काय याची मोठ्या आतुरतेनें वाट पहात असतात ! वरील शास्त्रवचन कशाकरितां लिहिलें आहे, त्याची व्याप्ति किती, व तें कितपत पाळलें जावें, इत्यादि गोष्टींचा विचार करण्याचें प्रस्तुत स्थल नव्हे. तथापि, दत्तक घेतलेल्या पुत्रासाठीं देखील, आपल्या क्रोडों रुपयांचा ऐवज न ठेवतां, आपण आहोंत तोंवर अथवा आपल्या पश्चात्, त्यानें शिकूनसवरून शहाणे व्हावे व पुढेंमागें कांहीं आकस्मिक व्यंग अथवा दैवी आपत्ति आल्यास त्याला खाण्यापिण्याची ददात पडूं नये, इतके पैसे ठेवून, बाकीचें द्रव्य अत्यंत उपयुक्त अशा सामाजिक व राजकीय संस्थांस त्यांनीं अर्पण केल्यास खरोखर किती बहार होईल ! हीच गोष्ट ज्यांना औरस संतान-

प्राप्ति आहे त्यांनींही लक्षांत घेतल्यास किती बरें होईल! पण हें आमच्या लक्षांत येईल तेव्हां ना ! रांडांच्या घरीं व दारूच्या गुत्त्यातून लाखों रुपयांचा चक्काचूर आपल्या औरस अथवा दत्तक घेतलेल्या कुळदीपक दिवट्या मुलानें केलेला आमच्या अंध वडिलांस पाहवतो, परंतु त्याच पैशाचा योग्य रीतीनें व्यय करून एखाद्या उपयुक्त सामाजिक संस्थेस ते पैसे देण्याचें कोणाच्या ध्यानींहि येत नाहीं ! अरेरे, अंधत्वाची कोण ही जबरदस्त भूल !

रंगाजी ही एक अत्यंत लावण्यवती अशी वारांगना होती ! कैक श्रीमंताच्या नयनास भुलवून तिनें आजपर्यंत लक्षावधि संपत्ति गोळा केली होती. तिच्या धंद्यात ती जितकी वाकबगार होती तितकी दुसरी विश्वयोषिता क्वचितच असेल. त्यातच निसर्गदत्त असणारें अप्सरेसारखें सौंदर्य व वीणाझंकारसदृश असा अत्यंत मधुर आवाज,यांची भर पडली होती ! त्यांतच तिच्या नवयौवनाचा बहार असल्यामुळें तर, तिनें नाशिक येथील कित्येक श्रीमंत तरुणांस नुसते वेडे करून सोडलें होतें ! आमच्या नानासाहेबांचें व रंगाजीचें फारच मेतकूट असे ! ते तिचे एक सुशिक्षित अथवा सभ्य दलालच होते म्हटलें तरी चालेल !

रात्रीं १०–११ वाजण्याचा सुमार झाला होता ! बाकीच्या सर्व गृहांतील दीप हलुहलू मालविले अथवा मंद केले जात असतां, आमच्या रंगाजीच्या माडींत प्रकाशाचा नुसता लखलखाट उडाला होता ! वारांगनेच्या महालांत आज अद्वितीय रोषनाईचा अपूर्व थाट दृग्गोचर होत होता!—कारण आज तसेंच मोठें सावज जाळ्यांत पकडण्याचें रंगाजी व नानासाहेब यांचें ठरलें होतें ! जमिनीवर हरतऱ्हेचे गालिचे पसरून जागोजाग शुभ्र वस्त्राच्छादित बैठकी ठेवून त्यावर लोड ठेवले होते. बैठकीच्या मध्यभागीं दोन चार रौप्य तबकांतून पानसुपारी, अत्तरगुलाब, पुष्पगुच्छ, व खाद्यपेय व्यवस्थित ठेविले होतें. शिवाय भिंतीस जागोजाग जाई, जुई, मदनबाण, इत्यादि पुष्पांचे कोमल हार लटकावून दिले होते ! वारांगनेच्या महालांत शोभतील अशा कामोद्दीपक तसबिरा सर्वत्र दीप प्रकाशांत दिसत होत्या ! तबला, सारंगी, हातपेटी, वीणा, इत्यादि गायनसामुग्री एका बाजूस दृग्गोचर होत होती !

रंगाजी ठरल्याप्रमाणें कोणाची तरी मार्गप्रतीक्षा करीत बसली

होती. तिनें आज एक अस्मानी रंगाचें सुंदर व अत्यंत विरविरीत वस्त्र परिधान केलें होतें ! केशपाशाची रचना मोठी मनमोहक रीतीनें करून त्यावर तिनें एक फुलाची वेणी घातली होती ! सुंदरीच्या कर्णप्रदेशीं हिरव्यागार पाचेचे लोलक विलसत होते ! तांबूलभक्षणानें तिचें आरक्त ओष्ठबिंब जास्तच खुलत होतें !

इतक्यात दाराशीं गलका ऐकू येऊ लागला.

" नका हो नानासाहेब, मला नका बुवा ह्या फंदात पाडूं !" तात्या जराशा काकुळतीच्या स्वरात म्हणत होते.

" चला हो तात्या, त्यांत काय आहे एवढे मोठेसें ! " नानासाहेब त्याचा हात धरून त्यांना जिन्याच्या दाराशीं ओढीत म्हणाले; " अहो, नुसते चलाल तर खरें ! नुसतें यायला तुमचें काय जातें ! तुम्हाला कांहीं त्याबद्दल फी नाहीं पडणार, समजलेंत ! पुन्हां तुम्ही नका येऊं पाहिजे तर ! अहो, आमच्या रंगाजीचें गाणें तर नुसतें ऐका. नुसती गोहरजान आहे दुसरी गोहरजान ! तात्या, तुम्ही फारच अरसिक बोवा ! " असें म्हणून नाना खदखदा हसलें ! बरोबरच्या इतर मंडळीं-नीहि त्यांच्या हास्याची री ओढली. तात्यास फारच लाजल्यासारखें झालें. आधीं नुकत्याच जडलेल्या वारुणीच्या व्यसनाबद्दल त्यांस वाईट वाटतच होते. त्यातच ह्याची भर पडली. सदसद्विवेकबुद्धीचा व मनाचा झगडा क्षणैक चालू झाला. एकीकडे नाना त्यांस वर ओढीतच होते. इतक्यांत माडीवरून मंजुमधुर आवाज झाला—

" नाना, अहो, नसलें त्यांना यायचें तर तुमचा तरी कां बाई त्यांना उगीच आग्रह ! " या मंजुमधुर कूजितानें मनाचाच शेवटीं विजय होऊन " नुसतें जाऊं तर खरें. त्यात काय आपले जाणार आहे ! घटकाभर करमणूक तरी होईल. घरीं तरी स्वस्थच पडायचें कीं नाही ! त्यापेक्षां चार घटका गाणें ऐकून करमणूक तरी केली मनाची ! " असें मनाशींच म्हणून तात्या सर्व मंडळींबरोबर जिना चढूं लागले. लवकरच मंडळी वर आली. सुंदरीनें हसतमुखानें आपले नेत्रकटाक्ष सर्वांवर व त्यांतल्या त्यांत तात्यांवर विशेषच फेकून त्यांचें फारच गोड स्वागत केलें ! तात्यांच्या सदसद्विवेक बुद्धीच्या किल्ल्याचे मजले व बुरुज एकएक धडाधड कोसळण्यास प्रारंभ झाला !

" आमचे तात्या किनी रंगाजी, फारच पापभीरु व साधे बुवा ! " सर्व मंडळी आसनस्थ झाल्यावर नाना हसतमुखानें म्हणाले, " अहो, त्याना नुसतें चला म्हटलें तर कोण त्यांनीं आढेवेढे घेतले म्हणता ? छे छे, कांहीं पुसू नका ! पण शेवटीं आणले बुवा एकदांचे कसें तरी तुमचें गाणें ऐकावयास ! "

" होय का ? " आपली कमनीय मान हलवीत रंगा म्हणाली, " तर मग अशा सज्जन मनुष्याचे पाय मजसारख्या अबलेच्या क्षुद्र गानश्रवणास माझ्या घरीं लागले, तेव्हा माझे भाग्य मोठेंच म्हटलें पाहिजे ! " असें म्हणून तिनें हसतमुखानें तात्याच्यावर पुन्हा एक नयनकटाक्ष फेकला. " घ्यावें मंडळी यातले कांहीं " असे म्हणून तिनें तबकें पुढें सारलीं. नानासाहेबानीं दोनचार दारूचे ग्लास झोकून तात्यासहि त्यांनीं व रंगाजींनीं आग्रहानें पाजले. विडा खाऊन सर्वांचीं तोंडे रंगलीं ! सिगारेटचा धूर वातावरणांत मिसळून गेला ! गायनाच्या साथीस लागणाऱ्या सर्व आयुधाची सिद्धताच असल्यामुळें " ह, होऊद्या रंगाजी एखाद्या चिजेची बहार ! " असें नानासाहेबादि मंडळींनीं म्हटल्यावर रंगाजी एक हिंदुस्थानी पद्य गाऊ लागली—

" अरे पानि भरेलीऽपानि भरेलीऽकोन अलबेलीकी नार, झमाऽझम्—" गायनाचे नितांत मनोहर आलाप वातावरणांत मिसळूं लागले. सुंदरीचे कामोद्दीपक हावभाव मनाच्या वातावरणांत विहरू लागले व सर्व मंडळी अगदीं बेभान झाली. याप्रमाणे दोनतीन हिंदुस्थानी पद्यें झाल्यावर कांहीं मराठी पद्ये गाण्याची त्यांना विनंति करण्यांत आली. रमणी आपल्या विविध अंगविक्षेपानें मदनशरांचें मोहन पसरीत पुन्हा गाऊ लागली—

" मला मदन भासे हा ऽ मोही मना । मानी जना या ऽ भामा मना । मला मदन ।—"

हलुहलू गाणें थाबलें. या गाण्यानें मंडळी अगदीं गारच झाली. नंतर कांहीं वेळ विसावा घेऊन व विडा वगैरे खाऊन तिनें अजून दोन तीन ' खरा तो प्रेमा ' 'धन्य जाहला' ' मना तळमळसी ' इत्यादि पद्यें गायिलीं. बिचाऱ्या तात्यासाहेबास सुंदरीच्या अप्रतिम लावण्यानें व तिच्या गानप्रसंगींच्या विविध चेष्टानीं नुसतें वेडें करून सोडले ! आमचे रंगेल नानासाहेब तर, "ओहो, वाहवा, खाशी" असें करीत रंगाजीस जणू

भेटण्यासाठींच पुढे पुढें सरकू लागले ! हळुहळू गाण्याचा थाट संपला ! पुन्हा खाद्यपेयादिकाचा स्वीकार होऊन विड्याचा बार, सिगारेटचा धूर, इत्यादि झाल्यावर रंगाजींनीं स्वहस्ताने सर्वांस अत्तरगुलाब दिलें व सर्वांच्या गळ्यांत पुष्पहार घातले ! दोन्ही क्रिया करताना, जणू काय चुकूनच, असा आपला कोमल हस्तस्पर्श त्यांनीं तात्यांच्या देहास केला ! त्या सुकुमार हस्ताचा स्पर्श होताच तात्यांचें सर्वांग रोमांचित झालें ! सदसद्विवेकबुद्धीचा शेवटचा मजलाहि जमीनदोस्त झाला ! तात्या खरोखर वेडावून गेले ! परंतु पहिलाच प्रसंग असल्यामुळे ते कांहीं विशेष बोलले नाहींत, इतकेंच. शेवटीं मंडळी जाण्यास उठली त्या वेळीं—

" पुन्हा आल्यास यांना घेऊन या बरं का नाना? पुन्हां हे पाय माझ्या अभागिनीच्या दृष्टीस पडतील काय ? " असें म्हणून त्या मदालसेनें एक शेवटचा नयनबाण सस्मित वदनानें तात्यांकडे फेंकला ! त्यांनीं बिचारे तात्या पुरेच जाया झालें ? मंडळी हळुहळू चालती झाली. रंगाजी हास्य मुद्रेने त्यांच्याकडे, विशेषतः तात्यांच्याकडे पहात होती ! जणूं काय, " आतां तू या पाशांतून कसा सुटतोस ते पहातेंच मी ! " अशा स्वाभिमान मुद्रेनेच ती हास्य करीत होती, व तें तिला शोभण्यासारखेंच होतें! कारण एखाद्या तपस्व्याचीही समाधि भंग पाववील—चंचळ करील—असेंच त्या हरिणाक्षीचें सौंदर्य होतें !

## प्रकरण १० वें.

## महात्म्याच्या पायाशीं.

आमच्या अनंतरावांनीं केलेला कृतनिश्चय ताबडतोब अमलांत आणण्याच्या ते विचारास लागले. मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या रात्रीं, तिकडे तात्या रंगाजीच्या माडींत तिच्या नयनकटाक्षांनीं विद्ध होत व गानप्रसंगीं व हावभाव करतांना तिच्या कानांत हलणाऱ्या हिरव्यागार पाचेच्या लोलकांची प्रभा तिच्या वदनावर खुलत असतां त्यांनीं आकर्षिले जात असतां, आमचे अनंतराव 'सीतागुंफे'त योगासन घालून बस-

लेल्या एका महात्म्या तपस्व्याच्या पायाशी बसले होते! योग्याच्या अंगावर तेजःपुंज कांति विलसत होती! जवळच पेटलेल्या धुर्मीतलि मदज्वाळाचा प्रकाश त्याच्या देहावर पडून एकंदर सात्त्विक गांभीर्यांत भर टाकीत होता! जवळच योग्याची एक कफनी, एक एकतारी, एक कटोरा, व कांहीं ग्रंथ पडले होते. वाचक, आपण ह्या महात्म्यास ओळखिलें काय? कृष्णाबाईस आत्महत्येच्या विचारापासून परतवून त्यांस योग्य तो उपदेश करणाराच हा महात्मा होय! हळुहळू महात्मा समाधींतून शुद्धिवर आला. अनंतरावांची विनंति ऐकून त्यास फार आनंद झाला व हास्यमुखानें तो अनंतरावास म्हणालाः—

" अनंतराव, आपली इच्छा ऐकून मला फार आनंद होत आहे! आपल्या विचाराचे व निश्चयाचे तरुणांची आज खरोखर आपल्या देशास फार वाण आहे. "कार्यक्षेत्र अत्यंत विस्तृत आहे; कार्यकर्त्यांचीच आज जरुरी आहे" हे ना. गोखल्यांचें वाक्य चिरस्मरणीय आहे. तेव्हां आपला हा अलौकिक निश्चयाचा विचार ऐकून मला कसें आनंदाचें भरते येत आहे! ईशकृपेनें आपला हेतु तडीस जावो, अशी माझी त्या प्रभूस अनन्य प्रार्थना आहे! तथापि, यदाकदाचित् तो नाहींच तडीस गेला, व आपणांस गृहस्थाश्रमाच्या पायरीवर जरी उतरावे लागलें, तरी त्यांत काहींच पातक किंवा गुन्हा नाहीं. "Not failure but low aim is crime" हें वाक्य केव्हाही खरेंच आहे. निदान, आपण एका उदात्त हेतूसाठीं अंतःकरणपूर्वक झटत होता, एवढी गोष्ट तरी त्या परमात्म्याच्या घरी खास रुजू होईल. व त्या आपल्या एक प्रकारच्या खालीं येण्यास, विषयवासनेस यत्किंचित्ही आवरण्याचा ज्यांच्या स्वप्नस्वप्नांतरीहि कधीं विचार येत नाहीं! त्या विषयातल्या किड्यांनीं हसण्याचा काहींच अधिकार पोंचत नाहीं. उदात्त हेतूसाठीं झटतांना केवळ अशक्य म्हणूनच त्याच्या खालच्या पायरीवर येणें यास मी तर–' उदात्त अधःपात ' ( a noble fall ) असेंच नामाभिधान देईन! असो, तर चला, आपण आतांच त्र्यंबकेश्वराच्या वाटेस लागू. तेथें माझी एक एकांतवासाची पर्णकुटिका आहे, तेथें आपणांस वाटेल तितक्या दिवस आपण रहा. परब्रह्मचिंतनाच्या अवघड कड्यावर चढण्याचे कामीं माझ्याकडून होईल तितकी मी आपणांस मदत करीन!"

" चला तर, " असें म्हणून अनंतरावही मोठ्या आनंदानें उठले ! योग्यानें आपल्या सामानाचें एक लहानसें गांठोडें बांधलें. अनंतरावांनींही आपले गांठोडें घेतलें व दोघेही मार्गास लागले !

एकाच आईच्या पोटांतून आलेल्या व एकाच घरांत वाढलेल्या दोघां भावांत किती हें जमीनअस्मानाचें अंतर ! एका भावाचा निश्चय कम- कुवत, तर दुसऱ्याचा तितकाच अलौकिक ! एक विषयवासनेची थोडी- बहुत तृप्ति झाली असताहि निरनिराळ्या व्यसनाच्या प्रवाहांत वहात होता, तर दुसरा विषयवासनेस पायाखालीं तुडवून ईश्वराचा ' आदेश ' मिळण्याची वाट पहात होता ! एक विश्वयोषितेच्या सौंदर्याचें चिंतन करीत होता, तर दुसरा परमात्म्याच्या अलौकिक ध्यानाची गोडी चाखीत होता ! एक कुमार्गगामी छछोर तरुणांच्या संगतींत रंगला होता, तर दुसरा सत्संगतीच्या मधुर रंगानें रंजित होत होता ! एकाच आईच्या पोटच्या दोघां लेकरांत असा फरक कां व्हावा, याचा कोणी उलगडा करील काय !

प्रातःकालच्या सुमारास आमचे दोघे प्रवासी त्र्यंबकेश्वरापाशीं येऊन पोहोंचले. प्रातःकालच्या अंधुक प्रकाशांत, योग्याच्या माहितीचीच वाट असल्यामुळें, ते हळुहळू डोंगर चढूं लागले. लवकरच ते माथ्यावर जाऊन पोहोंचले. या वेळीं पूर्वदिग्भागीं अव्याज प्रेमाचा आरक्त सागर उसळला होता ! उषासुंदरीच्या गालावरील गुलाब फुलले होते ! त्र्यंबकेश्वरावर एका बाजूस असणाऱ्या त्या महात्म्याच्या उटजापाशीं जेव्हां अनंतराव येऊन पोहोंचले, त्यावेळीं तेथील रमणीय देखावा पाहून त्यांचें चित्त आनंदानें प्रफुल्लित झालें ! ज्या योगसाधनाच्या ब्रह्मानंदाची गोडी ते त्या महात्म्याच्या कृपेनें चाखणार होते, त्यांस आसपासचा प्रदेश असाच नितांतरमणीय—सृष्टीच्या सात्विक ऐश्वर्यानें भरलेला- असा लागत असतो. " शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः " या भगवद्गीतेंतल्या सहाव्या अध्यायांतील श्लोकार्धापैकीं " शुचौ देशे " ह्या पदावर टीका करतांना भगवान् ज्ञानेश्वरांनीं ज्या रमणीय प्रदेशाचें वर्णन केलें आहे, तशाच तऱ्हेचा येथील बहारीचा देखावा होता ! पिक- सारिकादिकांचें कूजन, मयूरांचें नितांतमनोहर हास्य, मृगबालकांचें निर्भीत मनानें इतस्ततः होणारें निराग्रस विचरण, विविध पुष्पांच्या लता

व त्यांवर हसणारीं—डोलणारीं विविध कुसुमें, चित्रविचित्र वृक्षराजी इत्यादि निसर्गमनोहर देखावा पाहून चित्त कसें प्रसन्न होतें ! " मन करारे प्रसन्न । सकळ सिद्धीचें कारण !–" या तुकोक्तिप्रमाणें साहजिकच योगाभ्यासास व मनःप्रसन्नतेस त्याची मदत होते ! हळुहळू 'उदयाचलीं मित्र आला.'—पूर्वाचलावर दृश्यमान होणाऱ्या परमात्म्याच्या त्या सोज्वल रूपास—त्या सगुण परब्रह्मास—दोघानींहि भक्तिपुरस्सर अभिवादन केलें व नतर उटजांत शिरून ते आपल्या पुढील कार्यक्रमास लागले !

## प्रकरण ११ वें

## विधवावपन—विचार.

इकडे पंचवटींत एके दिवशीं सध्याकाळीं ५—६ वाजण्याच्या सुमारास चपू, कृष्णाबाई, व लीला अशा गप्पा गोष्टी करीत बसल्या होत्या.

" वहिनी, तुम्ही आपले डोकीवरील केस कांहो काढलेत परवां ? " नुकताच केशभार हलका केलेल्या कृष्णाबाईच्या डोक्याकडे पाहून चंपू म्हणाली, " इश्श बाई, हें कितीतरी ओंगळवाणें दिसते ! "

" वन्स, तशी शास्त्राज्ञा आहे म्हणून मी ते काढले. मला काय करावयाचे आतां विधवेला ते केंस ? आतां काय त्यांची शोभा ? " कृष्णाबाईनें उत्तर केलें.

" पण केंस काढू नयेत, अशाबद्दलहि शास्त्राज्ञा आहेना ? स्मृतीमध्यें दोन्ही तऱ्हेचीं वचनें आहेत, अस म्हणतात बाई. कोणी म्हणतात, 'पतिमरणोत्तर विधवेनें केस ठेवले तर ती बाई नरकांत जाईल' तर कोणी म्हणतात कीं, 'काढले तर जाईल!' तेव्हा वागावें तरी कसें बाई माणसांनीं? बाकी हें फारच ओंगळवाणें व वाईट दिसतें हो. अलीकडे पुष्कळ विधवा सकेशा राहू लागल्या आहेत. तेव्हां तुम्ही तशा राहिला असतात, तर कांहीं सध्यां पडत चाललेल्या रूढीच्या विरुद्ध नसतें झालें. बाकी तें

जुन्या 'सोवळे' होण्याच्या रूढीला मात्र सोडून झाले असते खरे!" चपू किंचित् हसून म्हणाली.

"चपू" लीला म्हणाली, "कृष्णाबाईंनीं केंस काढलें तें ओंगळ दिसतें असें तू म्हणालीस. त्याचा अर्थ सुशिक्षित तऱ्हेनें सागावयाचा म्हणजे, 'नैसर्गिक सौंदर्याची त्याने हानि होते.' परतु चंपू, ही चाल कशीही पडली असो, पण त्यावर आपणास एक उदात्त कल्पना बसवता येणार नाहीं काय? ज्यावर आपलें निरतिशय प्रेम, ज्याच्यासाटीं सौंदर्याचें वर्धन करावयाचे, प्रेमाच्या जीवनाचा जो आधार, तो पति नाहींसा झाल्यावर—हरपल्यावर—त्याच्या वियोगाच्या दुःखाने वेडया झालेल्या जीवास, आता आपणास हे सौंदर्य काय करावयाचें, ह्या सौंदर्याचें कोणापुढें प्रदर्शन करावयाचे आहे, असें वाटून, एखाद्या पतिप्रेमाशीं तद्रूप झालेल्या त्याच्या स्त्रियेनें जर आपला केशभार उतरून टाकला—हें फालतु, बाह्य, व भारभूत सौंदर्य कमी केलें—तर त्यांत आश्चर्य करण्यासारखे काय आहे? तें पूर्ण साहजिक नव्हे काय? 'शेले' च्या 'ॲडोनिस्' नामक नितातरम्य काव्यांत ॲडोनिसूच्या मृत्यूने दुःखविव्हल झालेल्या—शोकविव्हल झालेल्या—काव्यदेवता आपला केशपाश कापून त्याच्या अगावर टाकतात असें वर्णन केलें आहे, त्याचा अर्थ असाच नव्हे काय? तसेच 'स्पेक्टेटर' मध्यें 'ॲडिसन'नीं, मला वाटतें, आपल्या सुरवातीच्याच लेखमालिकातून, एका सुदर विधवेकडून तिरस्कृत अशा सरदाराच्या वागण्याचें वर्णन दिलें आहे, ते ह्याच मासल्याचे आहे. प्रत्यक्ष व्यवहारांतहि आपण असेंच पाहतो कीं, अत्यत निराश अशा मनुष्याची दिनचर्या कशी तरी चाललेली असते! कांहीं तरी खावें, काहींतरी प्यावें, व काहीतरी ल्यावें, असाच त्याचा दिनक्रम असत नाहीं काय? पुढे जरी कर्तव्यकर्माचें आचरणासाठीं तो झटू लागला—सामाजिक कर्तव्यांत तो गढून गेला—तरी व्यक्तिविषयक बाबतींत त्याची पूर्ण उदासीनताच दिसून येते! इहलोकींच्या त्याच्या आशेचे दीप मालवलेले असतात, ऐहिक ऐश्वर्याच्या आशेचे मनोरे ढासळलेले असतात! संन्यास हा विविध तऱ्हेचा असतो. अत्यत नैराश्य व अत्यत वैराग्य याची सन्यासावस्थेंतील वागणूक सारखीच असते! ज्यावर आपलें प्रेम जडलें, व जो पदार्थ आपल्या जीवनाचा आधार झाला, त्याच्या हर-

पण्यानें दुःखी जिवाची किती कालवाकालव होते, ह्याची कल्पना, तसा ज्यास अनुभव असेल,त्यासच होईल! इतरांस होणें कठीण. अशा स्थितींत, प्रत्यक्ष जीवही जेथें निव्वळ कर्तव्यपालनासाठीं जगवायचा, तेथे नाना विलास, भोग, व चैन यांची गोष्ट कशास हवी ? तेव्हां नुसतें केशभार हलका करणेंच तर काय, पण खऱ्या विधवेची प्रत्येक क्रिया आपणांस ह्याच गोष्टीची सत्यता पटवील ! परतु चपूताई, मी ही सध्याच्या समाज-स्थितींतली गोष्ट बोलत नाही, हें तू विसरू नकोस. स्वयवृत अशा भर्त्या-बरोबर आनदानें स्वर्गीय सुखाचा आस्वाद घेणाऱ्या कालातील विधवेची गोष्ट मी सागत आहे. त्या वेळच्या उत्कट प्रेमाची मजल पतिशवा-बरोबर आनंदानें सहगमन करण्यापर्यंत सुद्धां पोचली होती. पण हीं सर्व स्वेच्छेचीं—साहजिक—अशीं कार्यें अथवा परिणाम आहेत.चपू,ही चाल—सतीच्या चालीप्रमाणेंच—जुलूमजबरदस्तीची नसून स्वेच्छेची आहे, हें तू विसरू नकोस ! कोणचीही गोष्ट काय, ती जुलमानें केल्यानें का त्याचें श्रेय मिळत असतें ? जुलमानें जसे साधु, सत, सन्याशी, ब्रह्मचारी, ब्रह्मचारिणी मिळत नाहींत, तसेच जुलमानें प्रेमाचा शोकाहि आणता येत नाहीं ! ज्या समाजात, प्रेम कशाशीं खातात हें ठाऊकहि नाहीं अशा बालवयांत लग्नें लावून देऊन, नवरा मेल्यावर बालपणींच सन्यासदीक्षेची शिक्षा मागहृदयी कसाई धर्माच्या थोताडाखालीं गरीब बालिकांवर लादतात, त्या काळच्या समाजातील माझें चित्र नव्हे, हें चपू तू विसरू नकोस ? अरेरे, धर्माच्या नावाखालीं कसाईखाना माजावि-णाऱ्या धर्मलडानो, धर्म म्हणजे काय हें तरी तुम्हांस समजतें काय ? अधरूढीच्या राक्षसी आराध्यानो, धर्म कशाशीं खातात याची तरी तुम्हांस ओळख आहे काय ? धर्म याचा तुमचा अर्थ जुलूम ! परतु परमे-श्वराच्या घरीं त्याचा असा अर्थ नाहीं, व स्वताच्या जातीला मात्र अनत सुखाच्या मेजवान्यांची खैरात करून चैनींत लोळणाऱ्या धर्माभि-मान्यानीं लक्षांत ठेवावें कीं, तो तुमच्या अन्यायाबद्दल, पक्षपातित्वाबद्दल व कसायी वृत्तीबद्दल तुम्हास शिक्षा केल्याशिवाय कधींही राहणार नाहीं ! पण चपू '' सात्विक रागाच्या बेभान अवस्थेतून क्षणैक शुद्धीवर आल्या-सारखें करून लीला पुढें म्हणाली, " चपू, मी ही कोणीकडच्या कोणी-कडेंच भडकलें ! तेव्हा माझ्या म्हणण्याचा भाग इतकाच कीं, जी खरी

पतिप्रेमा स्त्री असेल ( आणि अशी स्त्री सध्या लाखातही एकादीच सांपडेल कां नाहीं याची वानवाच आहे ) तिला दुर्दैवानें जर वैधव्य प्राप्त झालें तर समाजहिताचें कर्तव्य व आत्मसुखलालसेचा, अत्यत उच्च कां होईना, पण आप्पलपोटेपणा जर आड न येता,तर ती प्रथम सतीच गेली असती व वरील कारणामुळें जरी ती जगली, तरी सर्व भोगादिकांचा त्याग करून ती एखाद्या तपस्विनीसारखी राहील! सध्या बऱ्याच सकेशा विधवा दिसून येतात, त्यांचें सकेशत्व व त्यांचा थाटमाट हा एवढेंच दाखवितो कीं, एकतर त्यापैकीं पुष्कळांच्या-शेकडा नव्याण्णवांच्या-बाबतींत खरेंखरें स्वयवर अथवा प्रेमविवाहच होत नाहींत! तेव्हां या बाबतींत त्यांनाही ज़ुन्या लोकांनीं नांवें ठेवण्यापूर्वी आपल्या अधचालिकडे लक्ष द्यावें, व मी म्हणते अशा दृष्टीनें त्याचा विचार करावा. तथापि चपू, अशा समाजातही कृष्णाबाईसारख्या कांहीं साध्वी स्त्रिया निपजतात, हें पाहून मनास किती समाधान वाटतें ! खरोखर, वामनराव व कृष्णाबाई यांचें किती अकृत्रिम प्रेम होतें हें मी तुला तरी वर्णन करून सागावयासच पाहिजे असें नाहीं! चपू,तुला सांगितलें तर कदाचित् आश्चर्य वाटेल, पण मीदेखील आता हा केशभार लवकरच उतरणार आहे!" असें म्हणून लीलेनें एक सुस्कारा टाकून ती स्वस्थ बसली.

"पण ज्या आपण साध्वी स्त्रिया, पति जिवंत असता परपुरुषांचा स्पर्शही आपणांस खपत नाहीं, त्याच आपण पतिमरणोत्तर वाटेल त्या घटिंगणास केवळ रूढीसाठीं आपल्या देहास दर महिनापधरा दिवसांनीं स्पर्श करू देतों,तेव्हां धन्यच आपली म्हणायची! असें कोणी म्हणतात." चंपूनें प्रश्न केला.

"चपू," लीला म्हणाली,"तें म्हणणें सर्वथैव खरें आहे, व तो प्रकार केव्हांही सर्वस्वी त्याज्यच आहे,पण त्यावरही विचार केल्यास उपाय निघणार नाहीं, असें नाहीं,एवढेंच मी येथें सांगते. प्रत्यक्ष अमलांत आणतांना तुला कदाचित् तो कळेलच. पण त्याचबरोबर परक्या घटिंगणाचा स्पर्शहि ह्या देहास होणार नाहीं, असें मी तुला आश्वासन देतें." नतर क्षणभर त्या मंडळींत स्वस्थता होती. नतर कायसें आठवल्यासारखें होऊन चपू म्हणाली—

" काय हो लीलाताई ! शास्त्रात दोन्ही तऱ्हेच्या आज्ञा आहेत, तेव्हा केवळ शास्त्रावरून कसे वागावें ! "

" चपूताई, " लीला म्हणाली, " तू बरोबर विचारलेंस. ' शास्त्राज्ञा प्रमाण ' असेच चालावयाचें असेल तर प्रथम श्रुति, नतर स्मृति व नतर पुराणें अशा त्यांवरील श्रुतिस्मृतिपुराणग्रंथाच्या योग्यतेच्या पायऱ्या आहेत. त्याचा अर्थ असा कीं, श्रुतिस्मृतींचा विरोध आल्यास श्रुति प्रमाण मानावी. याचप्रमाणे स्मृति व पुराणे यांची गोष्ट. ज्यांचा शास्त्रावर अंध विश्वास नसेल, त्यांनीं सदसद्विवेकबुद्धीची कास धरून वागावे. तथापि, खऱ्या शास्त्राज्ञेस झुगारून देण्यापूर्वी–(आणि असा प्रसग क्वचितच येईल)–त्या शास्त्राज्ञेत काय अर्थ आहे, त्यात काय विचार अथवा भावना गोवल्या आहेत, हें सूक्ष्म दृष्टीनें पहावे, म्हणजे लौकिकी तऱ्हेने नाहीं, तरी खऱ्या अर्थानें त्याचे उत्तर आपणांस कळेल. ज्याचेविषयी कांहींच कळणार नाहीं त्याविषयीं उदासीनवृत्ति ठेवावी, व ज्याच्या अन्यायित्वाविषयीं आपली खात्री झाली असेल, त्याना उघड उघड झुगारून द्यावें ! " याप्रमाणें बराच वेळ असेंच विषयावरून विषय निघत, बरेंच सभाषण झाल्य वर, सध्याकाळी लीला परत घरी आली.

---

## प्रकरण १२ वें.

## " कैसा वरि वरि दिसताहे चांग–'

ती सध्याकाळीं सात वाजण्याची वेळ होती. भगवान् दिनराज अस्तास जाऊन कांहीं काळ लोटला होता. चपू आपल्या मैत्रिणीबरोबर फिरावयास गेली होती. विष्णुपंतहि कोर्टातून येऊन जरा फेरफटका करण्यासाठीं बाहेर गेले होते. अशा वेळीं कृष्णाबाई हातामध्यें एक तुळशीची माळ घेऊन अगणांत तुळशीपुढे ईश्वरनामस्मरण करीत बसलीं होती. इतक्यांत–" काय, कृष्णाबाई आहेत का घरांत ? " असें म्हणत एक चौतीस पस्तीस वर्षें वयाचे भटजी घरांत शिरले. " या दिनकरभटजी, ही मी आहेच इथें " असें म्हणून कृष्णाबाईनीं त्याचें स्वागत

केलें. अत्यत स्वच्छ अशा अगण्यांत हरिणाजिन व ताब्या ठेवीत ठेवीत भटजी म्हणाले,—

" वा, आपण तर अगदीं ईश्वराच्या नामात दग झालेल्या दिसतां!" त्यावर कृष्णाबाई विनयानें म्हणालीः—

" कसचें,कसचें. बसली होतें झाल घटकाभर तुळशीपुढें."बाकी खरोखर त्या महात्म्या योग्याच्या उपदेशाचा परिणाम तिच्या मनावर चागला होऊन तिनें आत्महत्येचा विचार सोडून देऊन, खरोखरच आत्मोद्धारासाठी खऱ्या तपश्चर्येचा मार्ग स्वीकारला होता. प्रातःकाळीं पांचच्या सुमारास शय्यात्याग करून, करवदन व भूमिवदन झाल्यावर शौचमुखमार्जन करून व पाणी तापत ठेवून,एकीकडे ती पहाटेच्या भूपाळ्या म्हणत असे. तोंवर पाणी तापल्यावर स्नान करून देवपूजा करी व घटका दोन घटका जप करून मग देवदर्शन करून आल्यावर, ती गृहकृत्यास लागे. विष्णुपत जेऊन कोर्टात गेल्यावर ती भोजनोत्तर अर्धा पाव घटका विश्राति घेऊन, मग एखादी भक्तिविजयासारखी पोथी वाचीत बसे. सध्याकाळीं पुराणश्रवण झाल्यावर, देवदर्शन करून परत आल्यावर, घटकाभर निवांतपणें तुळशीपुढें बसून पुन्हा ती ईश्वरी नामांत दग होई! नतर भोजनोत्तर कामधाम सारून ईश्वराचें नामस्मरण करीत ती झोपीं जाई! तिनें गादीसारख्या मृदुशय्येचा देखील पतिमरणोत्तर त्याग केला होता. असा तिचा दिनक्रम असे. शिवाय एकादशी, प्रदोष, शिवरात्र, जयत्या,सोळा सोमवार, कार्तिकस्नान, माघस्नान, पर्वण्या,दानधर्म,वाती, इत्यादि व्रतेंवैकल्यें व उपासतापासानीं ती आपली काया पुनीत करण्यास झटत होती ती वेगळीच! याप्रमाणें, ती एक घरांत असूनही एखाद्या बालबोध व जुन्या तऱ्हेच्या तपस्विनीसारखी राहात असे!

दिनकरभटजींनीं त्यांचा विनय पाहून हसत हसत उत्तर केलें:— " वा, कृष्णाबाई, हा आपला विनय आपल्या थोरपणास फारच शोभतो!"

" बरें पण, तें असो." कृष्णाबाई म्हणाली, " पण दिनकरभटजी, मला एकदा गतभर्तृका विधवेनीं कशा तऱ्हेनें राहावें, पतिमरणोत्तर तिनें आपल्या आयुष्याची कालक्रमणा कशा तऱ्हेनें करावी, याबद्दलचें तुमच्या शास्त्रांतलें वर्णन पुन्हा एकदा सांगा पाहू! मला किनी भटजी, तें भारीच आवडतें!"

" मी आपल्याला तें पुष्कळ वेळां सांगितलेंच आहे. " भटजी म्हणाले, " मग पुन्हा कशाला ? जातो आता मी. मग उशीर होईल ! "

" बसा हो, जाल आतां " कृष्णाबाई म्हणाली " पण भटजी, पुन्हा तें सांगितलेंत म्हणून काय बिघडलें ? खरोखर भटजी, आतां माझें चित्त अशाच तऱ्हेच्या गोष्टींत रमते. सांगाच ना मला पुन्हा एकदां तें ! तुम्ही तें फारच छान सांगता. "

" कसचें, कसचें " असें म्हणून भटजींनीं पुन्हा एकदां तें सांगितलें. विधवेने किती साध्या तऱ्हेनें रहावें, भोगविलासादिकांचा त्याग करून एखाद्या संन्यासिनीप्रमाणें तिने आपला दिनक्रम कसा चालवावा, नाना-तऱ्हेच्या व्रतादि आचरणांनीं आपल्या देहास कष्टवून परमात्म्याची कशी आराधना करावी, इत्यादि गोष्टींचे त्यांनीं मोठ्या बहारीनें वर्णन केलें ! तें सर्व एकाग्र मनानें नयन मिटून श्रवण करीत असतां भोळी बिचारी कृष्णाबाई आनदानें डुलत होती ! अरेरे, कृष्णाबाई, त्या अंधुक प्रकाशांत जर दिनकरभटजींच्या मुखाकडे व नेत्राकडे तुमची नजर जाती, तर खरोखर तुम्ही इतक्या फसला नसतात,—भूदेव म्हणून ज्याच्यावर तुम्हीं इतका विश्वास टाकला, तो खरोखर एक नरराक्षस आहे. याची तुम्हाला केव्हांच जाणीव झाली असती ! परतु भटजींनीं आपल्या मिष्टास भाषणानें कृष्णाबाईचा विश्वास चांगलाच सपादन केला होता. दिनकर-भटजी हे तात्याच्या इथेंच रहात असत. घरांतील देवपूजा, नैवेद्य, वैश्वदेव, इत्यादि करून दोन्ही काल ते त्यांच्याच इथें रहात असत. घरांतील आण, ने वगैरे वरचेही किरकोळ कामं तेच पहात असत. सध्या त्यांस भार्या, पुत्र, वगैरे कोणीच नव्हते. त्याचा तो भव्य देह, त्यावर ते भस्माचे त्रिपुड्र, ते तिबोटी गंध, गळ्यातली ती रुद्राक्षाची माळ, त्यांचीं स्नानसध्यादि सर्व कर्मे, त्यांचें तें सोवळेंओवळें, ती त्यांची टिळाटोपी, इत्यादि थाटमाट पाहून भोळ्या बिचाऱ्या कृष्णाबाईस ते एक भूदेवच वाटत ! आतांशा आतांशा तर ह्या कानफाट्या भटजींच्या फेऱ्या कृष्णाबाईच्या इथें वारं-वार होत असत ! ' ज्याचा कोणच्याहि गोष्टीवर चटकन् विश्वास बसतो तो फसतोहि चटकन् ' या नियमाप्रमाणें भटजींच्या वरवरच्या झका-कीस भोळी बिचारी कृष्णाबाई फसली. त्याच्या गोडगोड शास्त्रवचनांच्या

भुलीखालीं हा नरपशू एक खोल खड्डा खणून ठेवीत असेल, याची तीस विचारीस कल्पनाहि नव्हती ! अरेरे, कृष्णाबाई, " बोली मैदाची बरवी असे । वाटे अतरीं घालावे फांसे ।। कैसा वरिवरि दिसताहे चाग । नव्हे भाविक, केवळ मांग ।। " ही तुकारामाची उक्ति तुमच्या कधींच वाचण्यात आली नाहीं काय ? असे जर घरोघरीं भूदेव निर्माण होऊं लागले, तर मग आणखी काय हवे ? पण तें आता तुम्हास सांगून काय उपयोग ?

## प्रकरण १३ वें

## " नव्हे भाविक, केवळ मांग ! "

मध्यरात्र उलटून गेली होती! साधारण तीन वाजण्याचा सुमार होता. सर्व जगत् शांत निस्तब्ध अशा निद्रासुखाचा अनुभव घेत होतें! तृतीयेची ती रात्र असल्यामुळे चंद्रकोरींतून भूतलावर पसरणारा अंधुक प्रकाश रात्रीची भीषणता जास्त वाढवीत होता. पण चद्राचीच जिथें ही स्थिति, तेथें चमचम करीत असणाऱ्या तारकासमूहाकडे कोण पहाणार ? त्यांच्या रूपज्योतीच्या बहरानें कोणाचे चित्त प्रफुल्लित होणार ? वायूच्या मद-मद लहरी वहात होत्या ! अशा वेळीं एक व्यक्ति झपझप पावले टाकीत वामनरावाच्या दारापाशीं येऊन ठेपली, व मुद्दाम उघडें ठेवलेले मागील दार हळूच लोटून ती आत शिरली. विष्णुपंत व चपी माडीवर गाढ निद्रा-सुखांत मग्न झाली होती. ती व्यक्ति थेट कृष्णाबाई जेथे निजली होती तेथें गेली व त्यांस उठवून हलक्या आवाजात म्हणाली—

" ह, कृष्णाबाई, ऊठा. येतां ना मग पर्वस्नान करावयास ? आजचा पर्वकाळ खरोखर एक कपिलाषष्ठीचा योग आहे ! या वेळीं गगामातेचें स्नान करून जितकें दान कराल, तितका पुण्याचा सचय थोडाच होणार आहे ! " कृष्णाबाईहि जागी होऊन तडक उठली. तिला स्वस्थ झोंप नव्हतीच. आदल्या दिवशीं भटजींनीं सांगितल्याप्रमाणें—ती व्यक्ति भटजीच होती—आजच्या पर्वकालाचीं तिला सुखस्वप्नें पडत होतीं. ' आपण जणूं

काय गंगातीरीं उभे आहोत, हाताच्या ओंजळींत गंगेचें तें शुद्ध उदक घेतलें आहे व दिनकरभटजी आपणास मंत्र सांगत आहेत व ती आपली अनन्यभक्ति पाहून आकाशांतून देव आपणावर पुष्पवृष्टि करीत आहेत!" असें आनंदमय स्वप्न तिला पडत होतें. समाधानाचें हास्य तिच्या मुखावर विलसत होतें! मंदपणें जळणाऱ्या कृष्णाबाईच्या घरांतील दीपप्रकाशात तें कृष्णाबाईचें हास्य पाहून भटजींचा कामानल भडकूं लागला! "अहाहा! ह्या अधरामृताचें, ह्या गुलाबी गालाचें आतां एका घटकेंत मी पान करणार!" ह्या विचारानें तो क्षणैक हसला! पण क्षणार्धांत आपलें तें हास्य आवरून त्यानें कृष्णाबाईस जागें केलें. "इथेंच ह्या पक्व बिंबाचें पान करूं काय?" असाही त्यास अनिवार मोह उत्पन्न झाला होता. परंतु तो मोठा धूर्त असल्यामुळें, आपला भावी रचलेला डाव फुकट जाऊं नये म्हणून, त्यानें आपलें संयमन केलें व त्यानें त्या गरीब हरिणीस जागें केलें. कृष्णाबाई अत्यंत सुंदर अशी एक स्त्री होती. तिचें वय यावेळीं पंचवीस सव्वीसच्या सुमाराचें होतें. या वेळीं यौवनाचा भर असल्यामुळें नैसर्गिक सौंदर्यास कितीहि दाबण्याचा यत्न केला, तरी तें रमणीच्या देहलतिकेवर थोडेबहुत तरी विलसल्यावाचून कसें राहील? अत्यंत शुभ्र वस्त्र परिधान केलेल्या कृष्णाबाईचा गौरवर्ण त्यानें अधिकच खुलून दिसे. यौवनभरांतील ध्यानींमनींहि नसणारी तिची ती गजगति, ते तिचे गुलाबी गाल, तिचे ते कंकणविरहित शुभ्र करकमल, केवळ सहज पाहिल्याप्रमाणें ते तिचे अत्यंत उल्लासित नेत्रपात,—अरेरे, परमार्थाच्या निर्मल पथाचें आक्रमण करणाऱ्या कृष्णाबाई, अशा तुमच्या यौवनभरानें नितांतरमणीय दिसणाऱ्या देहलतिकेकडे पाहून एखाद्या सज्जनाच्या मनांत तुमच्याविषयीं सात्त्विक भावच जागृत झाला असता. परंतु या जगांत सज्जनांबरोबरच दुर्जनांचाही वास आहे, व त्यांतले त्यांत उघड उघड दुर्जनपणापेक्षां सज्जनपणाच्या बेमालूम आवरणाखालीं—पांघरुणाखालीं वावरणारा दुष्टपणा हा फारच भयंकर असतो! यासाठींच तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर इत्यादि महात्म्यांनीं अशा वर वर चकाकणाऱ्या नकली सोन्यापासून सावध राहण्यासाठीं हृदयाच्या कळवळ्यानें उपदेश केला आहे. अंतःकरणांत 'व्याळ कामा'चा भडका उडालेले भटजी असेच 'रुद्राक्षमालाधारी' भूदेव (!) होते. बाई, ह्यांच्यापासून अजून तरी तुम्ही

सावध व्हा. पण छे, त्या पाहा, हृदयाच्या उल्लासानें पर्वस्नानासाठीं त्या निघाल्याच!—" चला भटजी, चला लवकर. नाहीतर वेळ टळून जाईल.' असें म्हणून कृष्णाबाई एक पातळ व ताब्या घेऊन लगबगीने घराबाहेर पडली. भटजीहि बरोबर निघालेच. " आता एका पावघटकेच्या आंत ह्या रमणीय कुसुमाचा मी आस्वाद घेणार !" ह्या भावनेने त्यांच्या हृदयास ज्या आनंदाच्या उकळ्या येत होत्या त्या कांहीं विलक्षणच! अंधारी रात्र असल्यामुळे त्याचा बेत तडीस जाण्यास तिचे चांगलेंच सहाय होत होते. अथवा, असे दुष्ट लोक मुद्दामच अशा कृष्णरात्रीं आपलीं कृष्ण-कारस्थाने पार पाडण्याचा डाव साधीत असतात,असे दिसते. तेच नैसर्गिक देखावे! पण त्याचा कोणी कसा उपयोग करतो, कोणी कसा करतो ! कांहीं पावले चालून गेल्यावर आधीच योजून ठेवलेल्या बेताप्रमाणें, " चला, आपण ह्या जवळच्या रस्त्याने जाऊ,म्हणजे वेळेवर पोहोंचू " असें म्हणून भटजी एका बोळांत शिरले. त्या गल्लींत कोणीच रहात नव्हतें. कधीं एकदा पर्वकाळीं स्नान केल्याचें पुण्य मिळवीन ह्या विचारानें उल्लसित झालेल्या कृष्णाबाईहि त्यांच्या मागोमाग चालत होत्या. गल्लींतल्या एका मध्यवर्ती घरापाशीं आल्यावर भटजी थांबले. घरातून एका मंद दीपाचे प्रकाशकिरण बाहेर रस्त्यावर येत होते. " कृष्णाबाई, या, माझा एक स्नेही इथें राहतो.त्यानेंहि मला आज ह्या कपिलाषष्ठीसारख्या अपूर्व पर्वासाठीं उठवण्यास सांगितले आहे. तेव्हा त्याला घेऊनच आपण जाऊ या " असे म्हणून भटजी आत शिरलेच !

" पण आपल्यास उशीर—" कृष्णाबाई पुटपुटली.

" छे छे, उशीर नाहीं होणार. अहो,अजून चांगलीं १५-२० मिनिटें आहेत. आपण सहज पांच मिनिटांत जाऊन पोहोंचू ! " भटजींनीं समाधान केलें. कृष्णाबाईहि त्यांच्या मागे गेल्या. " रामभट, उठा, उठा, पर्वकाळची वेळ झाली ना ? " असें खोटेंच पण मोठ्यानें म्हणत, त्या मंदपणें जळणाऱ्या दीपप्रकाशाच्या खोलींत कृष्णाबाईस जणों सहजच नेल्यावर, त्यानें प्रथम त्या खोलीच्या दारास आंतून एक बरोबर लपवून आणलेले भक्कम कुलूप ठोकले ! खोलींत अर्थात् कोणीच नव्हतें. कोपऱ्यांत एक शुभ्र वस्त्राची शय्या होती. त्यावर एखाद्या निज-

लेल्या माणसाप्रमाणें पाघरुण घालून ठेवलें होतें. जवळच एक पान-सुपारीचा डबा व एका तबकात कांहीं सौगंधिक पुष्पें होतीं! क्षणार्धांत त्या नीचानें त्या सुंदरीचा हात पकडला व " सुंदरी, तुझ्यावर अनुरक्त झालेल्या ह्या दासाची एकदा तू मनकामना पूर्ण कर ना! कृष्णाबाई, आज वर्ष दीडवर्ष मला तुमचा कसा ध्यास लागून राहिला आहे! अरेरे, यौवनानें फुलणारे हे तुमच्या गालावरील गुलाब असेच सुकून जाण्यापेक्षां—" पण कृष्णाबाईच्या डोळ्यापुढें क्षणार्धांत लक्कन् सर्व प्रकाश पडला! भीतीनें व रागानें त्यांचें सर्वांग लटलट कापू लागलें! " नीचा, सोड मला ! " असें म्हणून एका झटक्यासरशीं त्यांनीं आपला हात त्याच्या हातांतून सोडविला व " धावा हो धांवा ! या दीन अबलेची लज्जा कोणी तरी रक्षण करा!" असें म्हणून तिनें दाराकडे धांव घेतली.

" नको, कृष्णाबाई, तू अशी उगीच कां धावतेस ? " अत्यंत शांतपणानें डोळे मिचकावीत भटजी म्हणाले, " सुंदरी, तू कितीहि आरडाओरडा केलास, तरी या निर्जन गल्लींत तुझ्या कोण बरें रक्षणास येणार आहे ! लाडके, तुला वाटेल कीं, हाच का मी तो वेदांताच्या गोष्टी सांगणारा भूदेव ! पण हे पहा प्रिये, त्या वेदांताच्या गोष्टी दिवसा सांगायच्या ! रात्रीं त्यांचा काय संबंध ! ही पृथ्वी अशा माझ्यासारख्या 'वेदोनारायणां'नींच जास्त भरली आहे ! हें पहा, आपण अशीच प्रातःस्नानाच्या निमित्तानें मधून मधून मजा मारीत जाऊं ! तुझा एकंदर संन्यासिनीचा थाट व माझे भस्माचे पट्टे व वेदघोष पाहून आपणास नावे ठेवण्याची कोणाची प्राज्ञा आहे ! लाडके, उलट सकेशा विधवांना व स्नानसंध्या न करणाऱ्या लोकांना धर्मलंड, बाडगे, सुधारक, असे म्हणावयास आपण तयारच ! पण जुन्या व बाळबोध राहणींत राहिल्यावर, आपण गुप्तपणें कितीही क्रीडा केल्या, मजा मारली, चैन भोगली, तरी तें आपल्या समाजांत आजकाल खपतें आहे ! हें पहा, सुंदरी, ज्या समाजास ज्या वेषांत अशी मजा खपते तो वेष आपण घेतला म्हणून काय बिघडलें ! आपल्याला मुख्य मजा व चैनीशीं कारण ! पुन्हा आपले उजळ माथ्यानीं समाजांत जुन्या व बाळबोध मार्गांनीं जाणारे म्हणून मिरवावयास आपण तयारच ! मग काय कृष्णाबाई, एक गोडसा—"असें म्हणून त्या नीचानें पुन्हा तो

मृदुहस्त पकडला ! भटजींचा कामानल क्षणोक्षणीं वाढू लागला. तरी ते अत्यंत शांतपणें बोलत होते. कारण " आता ही मैना कुठे पळते ? " अशी त्याची खात्रीच होती ! पुन्हा एकदा कृष्णाबाईने हात सोडवून पळण्याचा यत्न केला. परंतु भटजींच्या हाताची पक्कड जास्त जास्त बळकट होत होती. त्यामुळें ती नुसती रागानें थरथर कापत होती ! आता हा कामांध नरपशू आपला बळी घेणार ह्या भीतीनें तिचें सर्वांग लटलट कांपू लागलें, व " देवा, आता ह्या दीन दासीची लज्जा रक्षण करणें सर्वथैव तुझ्या हातीं आहे ! धाव रे धांव, आता नको अंत पाहूस ! " असा तिनें मनामध्यें परमेश्वराचा धावा आरंभला.

" सुंदरी, " तो नरपशू पुढें बोलू लागला, " तूं असा भ्रुकुटीभंग करून माझ्याकडे कां बरें पाहतेस ? पण, अहाहा, ह्या रागांतसुद्धां तुझे गालावरील गुलाब किती सुंदर व खुलून दिसतात ! मग नाहीं का तुला या तुझ्या दासाची करुणा येत ? "

" चांडाळा, सोड, सोड मला ! " असें म्हणून आपलें सर्व बळ एकवटून तिनें आपला हात एका झटक्यासच पुन्हा सोडवला व "हाय रे दैवा ! धावा हो, कोणी ह्या दीन गायीची ह्या लांडग्यापासून सोडवणूक करा ! नारायणा ! धांव रे धांव ! " असें म्हणून ती खोलींत सैरावैरा धावू लागली. आतां मात्र भटजींनीं आपले खरें स्वरूप दाखविलें!

" अबे लवडी," तिचा हात पकडून तिला त्या शय्येकडे खेंचीत तो कामांध राक्षस म्हणाला, " कां उगीच बोंब मारतेस ? कोण तुझा जार तुझें रक्षण करावयास येतो तो पाहतोंच आतां! " असें म्हणून त्या नीचानें तिच्या निऱ्यास हात घातला ! हाय ! हाय ! कोण तो भयंकर देखावा ! त्या भयाण रात्रीस, एका निर्मनुष्य गल्लींतल्या घरांत, त्या पशूच्या तावडींत ती अबला सांपडली होती !–पण इतक्यांत खाडकन् दारावर एक लत्ताप्रहार झाला व तत्क्षणींच काड् काड् करीत मोडून पडणाऱ्या दारांतून एक अत्यंत तेजःपुंज महात्मा आंत शिरला व "नीचा भटुरड्या, त्या अबलेची अब्रू घेण्यास हात घालणाऱ्या दुरात्म्या, घे आपल्या पापाचें प्रायश्चित्त ! " असें म्हणून त्यानें हातांतील काठीच्या एका तडाख्यानेंच त्या बोक्यास जमिनीवर लोळविलें ! व ह्या देखाव्यानें भयभीत झालेल्या व बेशुद्ध पडत असलेल्या कृष्णाबाईस त्या तिच्या

भावानें—कारण वाचक, तो महात्मा आपल्या परिचयाचा तिचा मानलेला भाऊच होता—आपल्या मांडीवर घेतले व जवळ असलेले आर्द्रवस्त्र तिच्या डोळ्यास वगैरे लावून तिला त्यानें सावध केलें.

"दिनकरभटजी!" तो महात्मा पुढे बोलू लागला, "जा, मी तुम्हांला एकवेळ जीवदान देतो आहे. परंतु पुन्हा जर अशा फंदात पडाल, तर याद राखून रहा! जिथे असाल तिथें तुमची हड्डी चांगलीच नरम करीन, हें पक्कें लक्षांत ठेवा! जा, चालते व्हा." दिनकरभटजींनीं आपली पाठ चोळींत चोळीत लवकरच तेथून पाय काढला!

"कृष्णाबाई, कोण हा आज तुमच्यावर भयंकर प्रसंग!" दिनकर-भटजी तेथून गेल्यावर तो महात्मा म्हणाला.

"पण भाऊराया, तुम्ही माझी या प्रसंगातून मुक्तता केलीत, याबद्दल मी तुमची किती उतराई होऊ?" असें म्हणून कृष्णाबाईनें त्या योग्याचे चरणावर मस्तक ठेविले व ते अश्रूंनीं न्हाणून काढलें!

"बरें तर, आता चला, कृष्णाबाई, तुम्हाला मी घरीं पोंचवितों." तो महात्मा पुढें म्हणाला, "पर्वकाळच्या गप्पा मारून ह्या भटानें तुम्हास चांगलीच अद्दल दिली! मला या विषयावर तुमच्याशीं पुष्कळ बोलावयाचें आहे. पण तें मग पुढें केव्हातरी पाहू. आता तुम्ही आधीं घरीं चला." असें म्हणून त्यांनीं तिला घरीं पोंचविलें व तो महात्मा पहातां पहातां एखाद्या तेजःपुंज तुटलेल्या ताऱ्याप्रमाणें क्षणार्धांत दिसेनासा झाला!

## प्रकरण १४ वें.

# स्वदेशीव्रत.

सायंकाळीं सव्वासहाचा सुमार झाला होता. लीलेचे "अबलोन्नति कार्यालय" निघून आज "स्वदेशीव्रत" ह्या विषयावर तिचें व्याख्यान होणार होतें! "कार्यालयाचीं" विविध अंगे व्यवस्थितपणे चालू झालीं होतीं. "कार्यालया" तील शाळेच्या मध्यमार्गी असणाऱ्या प्रशस्त चौकांत व्यवस्थित रीतीनें मांडून ठेवलेल्या आसनावरून रमणीगण विराज-

मान झाला होता. लवकरच प्रास्ताविक भाषण करण्यासाठीं म्हणून लीलाताईच्या मैत्रिण वेणूबाई ह्या उठल्या. त्या म्हणाल्याः—

" कुलीन स्त्रियानो व भगिनींनो, आजचा दिवस मी किती भाग्याचा समजते ! नाशिकच्या आधुनिक इतिहासात आजचा दिवस बऱ्याच महत्त्वाचा गणला जाईल, अशी माझी खात्री आहे. माझ्या प्रिय मैत्रिणीचा—लीलाताईचा—विचार आपणास कळून आपण त्याबद्दल जी कळकळ दाखविली व त्यांना जें परोपरीनें साह्य केलेंत, त्याबद्दल आम्ही आपले अत्यत आभारी आहों. असेच उत्तरोत्तर देशसेवेचे व समाजसेवेचे कार्यास आपण दुप्पट उत्साहानें साह्य कराल अशी मला आशा आहे. भगिनींनो व मातानो, आपल्याच निरलस मदतीचे दृश्य चित्र ह्या " अबलोन्नति कार्यालया "चे रूपानें आज आपणासमोर उभे आहे ! कार्यालयाची दिवसेंदिवस होत असणारी भरभराट हें आपल्याच आशीर्वादाचें फल, असें आम्हीं समजतों. असाच आपला सदैव आशीर्वाद आपल्या या सेविकांवर असावा!" असें म्हणून वेणूबाई खालीं बसल्या. नतर अध्यक्षाचे जागीं गावांतील एका सुशिक्षित व श्रीमत अशा भगिनीची निवड होऊन, त्यानीं थोडक्यांत चार शब्द बोलून विषयाचा उपोद्घात केल्यावर, लीला टाळ्यांच्या कडकडाटांत भाषण करण्यास उभी राहिलीः—

" मातांनो व भगिनींनो, तुमच्या रूपानें विनटलेल्या त्या जगन्मातेस नमस्कार करून मी आपल्या भाषणास सुरवात करतें. पण त्यापूर्वी आपल्या निरलस मदतीबद्दल आपले मनःपूर्वक आभार मानल्यावांचून मला राहवत नाहीं ! "—या वेळीं लीलेचा कठ व नयन भरून आले होते! आपल्या आशेचें भावी चित्र इतकें उठावदार निघेल, याची तिला कल्पना नव्हती. पण तेंच आज प्रत्यक्षपणें पाहतांना तिचा कठ गहिंवरला व तिचे नेत्र आनदाश्रूंनीं भरून आले, हें साहजिकच आहे! पण लवकरच पदरानें तिनें आपले डोळे पुसले व ती पुढे बोलू लागलीः—

" भगिनींनो, आजचा विषय ' स्वदेशीव्रत ' असा आहे, हें आपणांस ठाऊकच आहे. स्वदेशीव्रतासारखी अत्यत साधी गोष्ट देखील आज आपणांस समजावून देण्याचा प्रसग यावा, यापेक्षां आपल्या अधोगतीची साक्ष ती दुसरी काय हवी ? भगिनींनो, मला पुष्कळ वृद्ध वृद्ध बायांनीं विचारलेलें ठाऊक आहे कीं, "बायकांनीं शिकून काय करायचें आहे ?

त्यांना कां कुठे नोकरी करायची आहे ? ” जसे कांहीं नोकरीशिवाय शिक्षणाचा दुसरा कांहीं उपयोगच नाहीं ! भगिनींनो, शिक्षणाने ज्या कांहीं उदात्त वृत्तींची भावना हृदयात उत्पन्न होते, त्यांपैकींच स्वदेशाभिमान ही एक वृत्ति आहे. स्वदेशीव्रतपालनासारखी अत्यत साधी गोष्ट, जी स्वराज्यकालीं आपणा स्त्रियास न शिकताही समजत असे, तीच आज शिक्षणाने आपणास समजून घेतली पाहिजे. स्वातंत्र्याच्या लयाबरोबर त्याच्या अनुषगाने असणाऱ्या वृत्तींचा झालेला लोप आपणांस अशा उपायानें भरून काढला पाहिजे. भगिनींनो, ‘ यस् फ्यस् ’ करतां आलें म्हणजे तिला सुशिक्षित स्त्री म्हणता येईलच, असें नव्हें. कारण अशा किती तरी ‘यस् फ्यस्’ करणाऱ्या स्त्रिया व पुरुष मी पाहिले आहेत कीं, जे नखशिखांत विलायती वस्त्रांनीं आपली काया शोभिवत करून मोठ्या ऐटीनें सुशिक्षित म्हणून मिरवितात ! स्वदेशीव्रतपालन हा आपल्या स्त्रियांचाच केवळ विषय नव्हे. तो आपल्या प्रमाणेंच— कदाचित् कांकणभर जास्तच—पुरुषाचाहि विषय आहे ! खरोखर ज्या घरांतील पुरुष व स्त्रिया हरएक बाबतींत आपल्या देशाची चिंता वाहात असतील, स्वदेशाच्या प्रेमासाठीं जे आपल्या आवडीनावडी बाजूस ठेवीत असतील, व जरूर पडल्यास व शक्य असल्यास जे चार पैसे जास्त देऊनहि स्वदेशी मालाचेंच ग्रहण करीत असतील,—याप्रमाणे प्रत्येक क्षणाला ज्या घरामध्यें अहर्निश स्वदेशकल्याणाबद्दल स्त्रीपुरुषाची सारखीच तळमळ दिसून येत असेल, तें घर किती धन्य होय ! परतु अरेरे, अशीं पृथ्वीवरील नदनवनें आपणांस किती बरें पहावयास सापडतील ? स्वदेशी चळवळीची लाट आली त्यावेळेस अगावरील एकूण एक विलायती कपडे जाळण्यापर्यंत ज्यांच्या स्वदेशभक्तीची उज्ज्वल ज्वाला जाऊन पोहोंचली होती, त्यांचेच देह आतां परदेशी वस्त्रांत विनटलेले दिसावे, यापेक्षा दुर्भाग्य तें कोणचें ? स्वदेशीची लाट आली त्या वेळीं ज्यांच्या दुकानांत एके काळीं विलायती जिन्नस औषधास देखील दृष्टीस पडत नसे व ज्यांचीं दुकानें ह्या देशी मालाच्या भरभराटीनेंच उदयास आलीं, त्यांचींच दुकानें सांप्रतकाळीं विलायती मालाने खच्चून भरलीं जावींत, यापेक्षां दैवदुर्विलसित तें काय असणार ? भगिनींनो, वाक्पांडित्य ज्याच्या त्याच्या जिव्हाग्रीं मात्र खेळू

लागलें आहे. परंतु नखशिखांत विलायती बनणाऱ्या देशभक्ताचा उपदेश कोण ऐकणार ? कारण " बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करोनि बोलणें । तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥–" असें समर्थांचें त्रिकालाबाधित वचनच आहे. चहूंकडून नाडून गेलों, अशी ओरड करणाऱ्या ह्या मंडळींचे, स्वदेशी माल घेताना तर कोणी हात धरीत नाहींना ?

खरोखर, माझ्या प्रिय भगिनींनो, रामचंद्र प्रभूंची आपल्या मायदेशासाठीं केवढी तळमळ ! अयोध्येचा त्यांना किती निदिध्यास ! अहाहा अशाच एका निदिध्यासाचे प्रसंगीं त्यांच्या तोंडून " जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी " असे निघालेले धन्योद्गार कुठें, व संसार स्वर्गमय करण्याच्या गप्पा मारणारे आम्ही–' स्वर्गाहून जिची योग्यता अधिक' त्या मायभूमीशीं बेइमान होऊन तिला अधिकाधिकच पारतंत्र्यांत गोंवण्याची खटपट करणारे आम्ही कोठें ?

भगिनींनो, प्रत्येक क्षणाला पैशाचा प्रवाह विलायतेंत जात असतांना नुसत्या गप्पा मारून काय उपयोग होणार ? आपण एक अगदीं साधेंच उदाहरण घेऊं या. हा पदार्थ गरीबाच्या झोंपडीपासून तों राजाच्या राजवाड्यापर्यंत शिरला आहे. तो कोणचा ? तर चहा ! भगिनींनो, हिंदुस्थानच्या उत्तर टोंकापासून दक्षिण टोंकापर्यंत व पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत, जिकडे तिकडे आपणास चहाच्या कपबशांचा खडखडाट ऐकू येत नाहीं काय ? हें चहाचें खूळ किती बेसुमार वाढलें आहे, याचें मी आपणांस वर्णन करूनच सांगावयास हवें असें नाहीं ! अमक्या मुलीनें पोलकाच अंगांत घातला, तमक्या मुलीनें पायांत जोडाच घातलान् म्हणून तीस नाकें मुरडणाऱ्या म्हाताऱ्या आजीबाईंना माझें असें विचारणें आहे कीं, " आजीबाई, मग तुम्हाला हो कशाला हें चहाचें खूळ हवें ? " भगिनींनो, राग मानूं नका. पण मला अशा किती तरी बालबोध आजीबाई ठाऊक आहेत कीं, ज्यांना लिप्टनच्या चहावाचून एक दिवस देखील सुचायचें नाहीं, किंवा धड करमायचें नाहीं ! जुन्याचा अभिमान धरणाऱ्या माझ्या वृद्ध मातांना माझी अशी नम्र विनंति आहे कीं, मातांनो, चालीरीतींत फरक पडणें ही गोष्ट अपरिहार्य आहे. तुमचे वाडवडील तुमच्या चालीस नांवे ठेवून स्वतःस बालबोध म्हणवून घेत असतील व तुम्हीहि स्वतः तसेंच करीत आहां.

असे हें चालायचेंच परंतु मातांनो, माझ्या वृद्ध मातांनो, तुमच्या पायावर लोटांगण घालून मी तुमच्यापाशीं एकच गोष्ट मागतें, आणि ती म्हणजे जीं जीं खुळें, जीं जीं व्यसनें, आपल्या देशास सपशेल रसातळास नेण्यासाठीं आपल्यांत घुसलीं असतील, त्यांना त्यांना तुम्ही आपल्या घरांतून पार हद्दपार करा! माझ्या वृद्ध मातांनो, आपण माझ्या बोलण्याचा राग मानू नका, पण जी स्वदेशी पोलक्यानीं, स्वदेशी लुगड्यानें, चिटानें, अथवा पातळानें व स्वदेशींच कंकणानें आपला देह शोभिवंत करते, जी स्त्री लिप्टनच्या चहास स्पर्शहि करीत नाहीं, जी हरएक बाबतींत स्वदेशीची चिंता वाहते, अशा स्त्रीनें जरी पायांत जोडा घातला असला व उन्हासाठीं वगैरे हातांत छत्री घेतली असली, तिनें जरी म्हाळसाकाकूसारखा नागाचा फडा डोक्यावर न उभारतां केसांचा आंबाडा घातला असला, तरी अशी स्त्री–स्वदेशासाठीं अहर्निश हृदय जळणारी अशी स्त्री–विलायती चहांत विलायती साखऱ्या घालून, विलायती कपबशांतून तो पीत पीत, विलायती आस्वादानें रंगणाऱ्या एखाद्या सोंवळ्या आजीबाईपेक्षा मी जास्त योग्यतेची समजते! मातांनो, आपले आजेपणजे कधीं चहा पीत होते काय? पण म्हणून आपण पिऊं नये, असा माझ्या म्हणण्याचा भाग नाहीं. चालीरीतींत–खाण्यापिण्याच्या, वागण्यासवरण्याच्या, वस्त्रप्रावरणाच्या, चालीरीतींत–फेरफार होणे अपरिहार्य आहे व या बाबतींत एकानें दुसऱ्यास हसणे केव्हाही योग्य होणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर असें करणें म्हणजे एका कावळ्यानें दुसऱ्या कावळ्यास तू माझ्यापेक्षां जास्त काळा आहेस, असें म्हणण्यासारखेंच हास्यास्पद आहे, असें प्रतिपादन करणारी मी, केवळ जुनें म्हणूनच त्या चालीस चिकटा, असें कधींच म्हणणार नाहीं. एवढेंच कीं, ती चाल सोडतांना आपण स्वदेशाच्या हिताशीं बेइमान होत नाहीं ना, व आपण नीतिमार्गापासून भ्रष्ट होत नाहीं ना, याचा विचार करून ती सोडावी. प्रस्तुत प्रसंगीं पहिल्या विचाराशीं आपणास कर्तव्य आहे. तेव्हां माझ्या भगिनींनीं-विशेषेंकरून वृद्ध व अशिक्षित भगिनींनीं-दुसऱ्यास नांवें ठेवतांना वरील दृष्टीचा स्वीकार करावा, त्यांनीं आपला दृष्टिकोन अशा रीतीनें बदलावा, अशी माझी त्यांस नम्र विनंति आहे. जें शिक्षण स्वदेशाशीं बेइमान–केवळ आपल्या इष्कीखातर, चैनीसाठीं, व हौशी-

करितां–होण्यास शिकविते, त्यास सुशिक्षण म्हणण्यापेक्षां कुशिक्षण म्हटलेलेंच जास्त बरें ! आता माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नव्हे कीं, आज प्रत्येक गोष्ट तुम्हाला स्वदेशींच मिळेल. अशाहि काहीं आयुष्यातील अत्यत निकडीच्या गोष्टी असतील कीं, केवळ अपरिहार्य म्हणून तुम्हास त्या विलायती घ्याव्या लागतील. माझ्या म्हणण्याचा भाग इतकाच कीं, कोणचीही वस्तु घेताना ती देशी मिळते कां नाहीं, याची आधीं पूर्ण चौकशी करा, व मिळत नसल्यास व तीवाचून तुमचें चालत असल्यास ती घेण्याचें शक्य तितकें टाळा. कारण इथें विलायती मालासाठीं खर्च होणारा प्रत्येक पैसा सातासमुद्राच्या पलीकडे जाऊन तुमच्या देशास भिकार बनवीत आहे, ह्या जळवा तुमच्या राष्ट्रपुरुषाच्या देहांतील संपत्तिरूप रक्त सारख्या शोषीत आहेत, हे लक्षांत ठेवून त्यांचीं नाकें जितकी ठेचता येतील तितकी ठेचा ! व मग विलायती वस्तू घेणे झालीच– व अशा काहीं वस्तू निघतील ही गोष्ट मला, अत्यत कष्टानें का होईना, पण कबूल करणे भाग आहे–तर त्या वस्तूच्या गरजेचा, टिकण्याचा,. व लागण्याच्या सातत्याचा व तसाच त्यांच्या किंमतीचा वगैरे विचार करून मग जी घेणें असेल ती घ्या ! भगिनींनो, शिक्षणामृतपान करूनहि काहीं स्वदेशाशीं बेमान होणारीं माणसे आपल्यात असतील. तथापि, त्याचा दोष शिक्षणास देतां येत नाहीं, तर त्या व्यक्तीस द्यावा लागतो. ईश्वराचें नामस्मरण करीत पढरीस जाणाऱ्या वारकऱ्यांतहि एखादा दारूबाज निघाला, म्हणून त्या देवाच्या नावास त्यानें कमीपणा येत नाहीं. अशा कांहीं व्यक्ति असतात कीं, त्याच्यावर कशाचाच परिणाम होत नाहीं. परतु बहुजनसमाजाची अशी स्थिति नाहीं. शिक्षणाचा जों जों प्रसार जास्त होईल, तों तों इतर गोष्टींप्रमाणेच हेंहि तत्त्व लोकास कळेल. परतु अशिक्षित माणसाच्या मानाने सुशिक्षित माणसे म्हणजे सध्यां ‘दर्यांमें खसखस ’ अशी स्थिति आहे, व म्हणूनच परदेशी मालाचा खप इतका दिसून येतो. पण ज्या वेळीं शिक्षणाची ज्योत प्रत्येक हृदयांत पेटून तें हृदय स्वदेशकल्याणाच्या चिंतनाने जळू लागेल, त्या दिवशीं काहीं अपूर्वच चमत्कार दृष्टीस पडेल ! कारण प्रत्येक गोष्टीच्या—मग ती राजकीय असो, सामाजिक असो, अथवा धार्मिक असो—मुळाशीं शिक्षण आहे, हें केव्हाही व कोणीहि विसरू नये ! यासाठींच

' फूल नाहीं फुलाची पाकळी ' या न्यायानें आमचा त्या दिशेनें प्रयत्न चालू आहे. तो तुमच्याप्रमाणेच तो जगच्चालक गोड करून घेऊन तो अपूर्व चमत्काराचा दिवस आपणास लवकरच दाखवो अशी त्याची प्रार्थना करून, मी आपली रजा घेतें. '' याप्रमाणें भाषण करून लीला टाळ्यांच्या गजरात खालीं बसल्यावर, इतरहि दोघीतिघी भगिनींचें भाषण झाले व शेवटीं समारोपादाखल चार शब्द सांगताना अध्यक्षीणबाई म्हणाल्याः—

'' आतांपर्यंत झालेल्या माझ्या भगिनींच्या भाषणावरून स्वदेशीव्रत-पालन व त्यासाठीं सुशिक्षण ह्या बाबी आपणास किती आवश्यक आहेत, हें आपणांस दिसून आलेंच आहे. माझ्या भगिनी व मैत्रीण लीलाताई, यांची आपल्या भगिनींच्या उन्नतीसाठीं दिसून येणारी कळकळ व उत्साह खरोखर अपूर्व आहे व त्यांच्या कार्यांत त्यास यथाशक्ति हातभार लावणें आपलें कर्तव्य आहे. त्यांनीं महिन्यांतून दोनचारदां हा जो व्याख्यानाचा सुप्रसंग जुळवून आणण्याचें योजिलें आहे, त्यामुळें आपणांतील सख्य व साहचर्य वाढून, शिवाय आपणांस विविध विषयावरील विचारपरिपक्क भाषणें ऐकावयास सांपडून, आपल्या ज्ञानांत त्यायोगें भरच पडणार आहे. असो. शेवटीं लीलाताईनीं जो आपणा सर्वांस आज बिनमोल उपदेश केला त्याबद्दल आपणां सर्वांच्या तर्फें मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतें. मात्र त्यांचे खरे आभार आपण सक्रिय आचरणानेंच मानून दाखवा अशी आपणांस शेवटीं विनंती करून, मी खालीं बसते. '' याप्रमाणें अध्यक्षीणबाईचें थोडक्यांत भाषण झाल्यावर सभा बरखास्त झाली व जमलेला नारीगण हळुहळू आपापल्या घरीं जाता झाला !

## प्रकरण १५ वें

## महात्म्याचा उपदेश.

" खरोखर भगिनी, त्या दिवशींचा कोण तुझ्यावरील तो भयकर प्रसग ! " आमचा तेजःपुज महात्मा एके दिवशीं सायकाळीं त्याच्च अगणांत बसून कृष्णाबाईशीं बोलत होता, " त्या नरपशूनें अगदीं तुझ्या अब्रूवरच्च घाला घातला होतान् ! "

" भाऊराया, पण त्या सकटांतून तू मला वांचविलेंस ना ! " कृष्णाबाई म्हणाली, "खरोखर तूं मला एक द्रौपदीचा पाठीराखा कृष्णच भेटलास ! "

" वा, वा, कृष्णाबाई, म्हणजे अप्रत्यक्षपणें आपणा स्वतःस आपण द्रौपदीच म्हणवून घेतलेंत !" महात्मा किंचित् थट्टेच्या स्मितानें म्हणाला, " पण समर्थांचें वचन ठाऊक आहे ना, ' आपुली आपण करी '—

" तसे नव्हे बरें भाऊराया, " कृष्णाबाई त्यास मध्येंच अडवून म्हणाली, " माझा कांहीं तसा म्हणण्याचा हेतू नव्हता. बाकी खरोखर मला तुमच्यासारखा पाठीराखा बधु मिळाला ही माझ्यावर परमेश्वराची केवढी कृपा ! " डोळे पाण्यानें भरून येऊन कृष्णाबाई म्हणाली.

" छे, छे, कृष्णाबाई, तुम्ही अशा कष्टी का होता ! " महात्मा तीस धीर देत म्हणाला, "अहो, अत्यत शुद्ध पण निर्बल अशा प्राण्याचे रक्षणासाठीं तो परमात्मा कोणच्या ना कोणच्या तरी रूपाने अवतरतच असतो ! "

" योगीराज, आपल्या ह्या अतर्ज्ञानाचा उपयोग आपण असा सत्कारणीं करतां, हें आपणांस भूषणावहच आहे." पदरानें डोळे पुसून कृष्णाबाई आदराने म्हणाली.

" कसचें, कसचें ! " महात्मा म्हणाला " बाकी भगिनी, खरोखर मला असें वाटतें कीं, नानातऱ्हेच्या दुःखानें लोक गांजून गेले असतां, निरनिराळ्या तऱ्हेच्या हालअपेष्टांनीं लोक रजीस आलेले पाहून देखील, निव्वळ डोळ्यांवर कातडें ओढून घेऊन, सिद्धांच्या कोटीस पोहोंचलेल्या महात्म्यांनीं आपल्याच ब्रह्मानदसुखांत मग्न राहणें हा निव्वळ आप्पलपोटेपणा आहे. कारण खरा साधु म्हणजे " जे का रजले गांजले ।

त्यासी म्हणवी जो आपुले । –" तोच होय, असे तुकोबा सांगतात. तसेंच साधूची वृत्ति म्हणजे–" भूतांची दया हे भांडवल संता । आपुल्या ममता नाहीं देहीं " अशी असतें, असे तुकोबानींच दुसऱ्या अभंगांत सांगितले आहे. संतपण फुकाचे नाहीं. गाद्यागिरद्यांवर लोळून, पंच पक्कान्नांचा पुरवा झोडून संतपण मिळत नसते. दुःखिताचे दुःख हरावें, आर्तांचें भय वारावें, दुसऱ्याच्या सुखाने सुखावे, दुसऱ्याच्या दुःखानें ढळढळां रडावें, भूतदयेसाठीं प्रत्यक्ष देहावर येऊन बेतली असतांहि त्याची क्षिति नसावी, व आपला देह सारखा चंदनाप्रमाणें रंजल्यागांजल्यांच्या दुःखनिवारणार्थ कष्टवून त्यांतच आपण आनंदून जावें, यालाच संतवृत्ति म्हणतात. अशा वृत्तीचे संत, माई, हाताच्या बोटावर मोजण्याइतके तरी सांपडतील कीं नाहीं, याची वानवाच आहे. आपल्या ऋद्धिसिद्धींच्या जोरावर, दुसऱ्याच्या डोळ्यांत धूळ फेकून, समाजास उघड उघड लुटून, राजयोगाच्या ऐश्वर्यांत " नारायण " करीत मजा मारणाऱ्या आधुनिक साधुसंताकडे पाहिले म्हणजे सखेद हसू येतें व लोकांच्या अज्ञानाची कींव वाटते ! " दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहीये " याप्रमाणे आपणा लोकांची स्थिति आहे. ह्या आपल्या अज्ञानांधकारातून आपण कधीं जागें होऊ तो सुदिन म्हणायचा ! भगिनी, तुकारामरामदासांसारखे, अथवा विवेकानंद, रामतीर्थ, रामकृष्ण, लोकमान्य यांसारखे, खरे साधुसंत निर्माण होऊन, ही भोंदू गुरूची साथ कधीं विलयास जाईल का गे ? अहाहा, अशा तऱ्हेनें रात्रंदिवस ' जगाच्या कल्याणा ' साठीं तळमळणाऱ्या साधूकडे पाहून कोण बरें कृतज्ञ हृदयानें गहिंवरून जाऊन, " काय वानूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवितसे ! ॥ " असे तुकोबाप्रमाणें म्हणणार नाहीं ?

" वा, योगीराज, आपणही याच्यांत आत्मस्तुतीच अप्रत्यक्षपणे आरंभिली आहे म्हणायची ! " त्याची थट्टा त्याच्याच गळ्यात घालीत कृष्णाबाई हसत हसत म्हणाली !

" छे, छे, भगिनी, " तो योगी म्हणाला, " कुठें ते थोर महात्मे व कुठें मी यःकश्चित् रजःकण ! परंतु ' फूल नाहीं फुलाची पाकळी ' या न्यायानें माझ्याकडून होईल तितकी त्या परमात्म्याची–अखिल चराचरांत

नटलेल्या त्या जगज्जीवनाची—सेवा करतो आहे झाले! असो. पण भगिनी, यापुढे तरी तू सावध रहा व बैरागी, साधु, संत इ. नावांनीं मोडणाऱ्या सर्व व्यक्तींबद्दल फाजील विश्वासानें अंध होऊं नकोस. मी आताच सांगितलेल्या साधुसंतांच्या खुणा पूर्ण ध्यानांत ठेव व त्या जिथे असतील तेथेच खरें साधुत्व आहे असे पक्कें जाण—मग वरचा वेष साधूचा असो, वा नसो, कारण, साधू हे वेषावरून ओळखायचे नसून कृतीवरून ओळखायचे असतात! धार्मिकपणासारखाच संतपणा हा दिसण्यापेक्षा असण्यावर जास्त अवलंबून असतो, धर्माप्रमाणेंच त्यास कोणच्याही वेषांत राहाता येते! भगिनी, तुझ्यासारख्या भोळ्या मानवाची ह्या जगात वरच्या झळाळीनें व नकली पोशाखानें फसगत होऊ नये, म्हणून अशा दांभिक, भोंदू व नीच साधूचीं बिंगें तुकोबासारख्या महात्म्यानीं "बोली मैदाची बरवी असे" इ. अभंगांतून व "दंभस्फोट" सारख्या प्रकरणांतून चांगलीच चव्हाट्यावर आणलीं आहेत! वास्तविक, बाह्य वेषाचा व विविध अंगाचा थाटमाट हीं नुसती साधनें आहेत, साध्यें नव्हेत, हें केव्हाहि विसरता कामा नये, पण हेंच तुझ्यासारख्या भाबड्या जीवास कळत नाही व तो साधनासच साध्य म्हणून कवटाळून तीं दिसतील तेथें साधुत्वाच्या कल्पनेनें धांव घेतो, व अखेर पुष्कळदा फसगतीच्या खाड्यांत पडतो! भगिनी, ह्या साधनाची—बाह्य साधनाची विशेष मातब्बरी नाहीं. त्याच्या वाचून देखील एखादा मनुष्य साधुत्वाचें व मुक्तावस्थेचें साध्य गाठू शकेल, व त्या साधनाचा उपयोग करणाऱ्यांत देखील, माई, तुझ्या त्या दिनकरभटासारखे कित्येक दांभिक नरपशू असतील. सोवळें ओवळें, रक्षाविलेपन, कफनी, जपमाळ, नेत्र मिटणें, इ. सर्व साधनें आहेत. खरें साधुत्व यात नाहीं—यात सांपडेलच, असें नाहीं. संतांच्या या बाबतींतल्या व्याख्या ऐक, म्हणजे तुझी खात्री होईलः—

" परधन आणि पराविया नारी। येथुनी जो दुरी तो सोंवळा॥"

" ज्याला परधन विष। तोचि खरा हरीदास॥"

" कनककांता नये चित्ता। तोचि परमार्थ पूरता॥"

तसाच " मनाचा मवाळ " हाही तुकोबांचा अभंग या कामीं उत्कृष्ट मार्गदर्शक आहे. किंबहुना, सर्व साधुसंताच्या ग्रंथातून आशीं

हजारों वचनें असतील, कीं ज्यांतील बोध वाचून एखाद्या लहान बालकाचीही समजूत पटेल व त्याच्या हृदयाचा कळवळा त्यास समजेल ! पण माई, आम्ही लहान मुलाहूनही अज्ञ आहोत, असें म्हणावें लागतें. अथवा आधीं आम्ही ते वांचतो आहोतच कशाला, व वाचले यदाकदाचित् कधीं काळीं, तरी आमच्या डोळ्यांवरची भुरळ जाते आहे कशाला? पण आम्हांस असें कळेना कीं, अगावर भस्माचे वगैरे पट्टे ओढल्यानेंच जर साधुत्व येतें, तर एखादा पटाईत (म्ह. पट्टे असलेला) बिब्या वाघही मोठा सत झाला असता; तासचे तास पाण्यांत उभे राहिल्याने जर साधुत्व येतें, तर बिचारे मासे सर्व जन्म पाण्यांतच असतात; डोळे मिटून तासचे तास बसल्यानेंच जर साधुपणा मिळता, तर बकालाही ती पदवी केव्हांच प्राप्त होती; अंगाला राख फासल्याने साधूपणा मिळत असेल, तर राखेंत लोळणारे गर्दभराज हे महान् साधूच म्हणावे लागतील, लांब लांब जटादिकांचा संभार वाढविल्यानेंच महतपदप्राप्ति होत असेल, तर एखाद्या अस्वलालाहि कां साधु म्हणू नये ! पण तसें नव्हे—

" डोई वाढवुनि केश । भुतें आणिती अगास ॥
परि ते नव्हती सतजन । तेथे नाहीं आत्मखूण॥–" असें तुकोबा म्हणतात, तेंच खरें. कारण अरडीदरडीच्या बिळांत बसल्यानें जर साधूपणा येता, तर नेहेमीं बिळांतच राहणारे उदीरमामा हे पहिल्या प्रतीचे साधु म्हणून आजकाल भूतलावर गाजले असते. पण ही सगळी भूल आहे ! खरें पाहतां आपल्या सर्व क्रियांस कारण एक मन आहे. तें साधुत्वाच्या वेषातहि अत्यत नीच वासना धरू शकते व बिनसाधूच्या वेषातही सुष्ट विचार करू शकते. तेव्हां ' चकाकतें तें सर्व सोनेच ' असें समजणाऱ्याची दिशाभूल व्हावी, ह्यांत काय नवल !

" कळस ढिमाचे पोकळ । जळो वरील तें झळाळ । काय करू चित्रींव फळ । आतु शेण !॥" असें ज्ञानोबाराय आपणास सागत आहेत. "ऐसें कैसें रे सोवळें । शिवतां होतसें ओवळें"। इत्यादि दासांचे अभग व " आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी॥ " हाही अभग हेंच दाखवीत आहे. यावरून दांभिकपणाची चीड सर्व साधुसंतांस किती होती व लोकांची दिशाभूल होऊं नये यासाठीं त्यांना किती कळकळ वाटत असे, हें चांगलेंच व्यक्त होतें ! शेवटीं अशाच कळकळीच्या एका

आधुनिक कवींचे पद्य हेंच तत्त्व मनावर ठसवीत आहे, तें तुला सांगि-तल्यावाचून माझ्याने राहवत नाहीं. ऐक तो कवि काय म्हणतो तें.—

" एकाचि आकार, आकार। आंत भिन्न आचार॥ एकाचि०॥ध्रु०॥
उच्च नभीं उडतो। परि तो गरुड असे कीं घार?॥१॥
विमल मार्ग दावी। परि तो साव असे कीं चोर?॥२॥" इ.इ.

याप्रमाणे अनंत उदाहरणे देऊन शेवटीं अशा या मायेच्या बाजारांतून वरच्या झकाकीस भुलून वेड्या मानवाची फसगत न व्हावी, म्हणून तो कवि हृदयाच्या कळवळ्यानें शेवटचा सिद्धान्त सांगतो कीः—

" अंतरंग जाणे। प्राण्या, मायेचा बाजार!॥" अहाहा, कृष्णा-बाई, किती हा उदात्त उपदेश! हा तू सदैव आपल्या हृत्पटलावर कोरून ठेव बरें. म्हणजे यापुढें कितीही 'दिनकरभटजी' आले, तरी तुझी केव्हांहि फसगत होणार नाहीं व सत्याचा, साधुत्वाचा, संतपणाचा खरा मार्ग नेहेमीं तुझ्या डोळ्यापुढे राहील!" याप्रमाणें हृदयाच्या उल्लासानें आपल्या भगिनीस उपदेशामृत पाजून तो तेजःपुंज महात्मा विसावा घेण्यासाठीं क्षणभर स्वस्थ बसला. त्याच अंगणांत अत्यंत नीच वासना धरून वेदां-ताच्या गोष्टी सांगत बसणारा तो मैंद भटजी व आकुंचित दृष्टीची व वरच्या झकाकीस फसणारी—भुलणारी—ती पूर्वीची कृष्णाबाई कुठें, व अत्यंत उदात्त भावनेनें प्रेरित झालेला तो महात्मा योगी व दृष्टि साफ झाल्यामुळें अंतरंगाचा ठाव घेण्यास धाव घेणारी आजची कृष्णाबाई कोठें! कारण खरोखरच कृष्णाबाईचें मन आता चांगलेच पोळले होतें! तेव्हा आता पुढें काय करावें व कशा तऱ्हेनें आयुष्याचा विनियोग करावा, या विवचनेंतच ती थोडीबहुत होती, तोंच तिचा हेतु जाणून तो महात्मा पुढें बोलू लागलाः—

" भगिनी, यासाठीं आतां तुम्ही प्रथम पांचसहा वर्षें झटून शिक्षणा-मृताचें जितकें पान करतां येईल तितकें करा, व आपला देह नंतर तुम्ही समाजसेवेस अर्पण करून, येथें चाललेल्या लीलाताईच्या अत्यंत स्तुत्य उद्योगांत त्यांना कायावाचामनानें हातभार लावा, म्हणजे जनतेच्या ह्या सेवेनें 'जनीं जनार्दन' असा तो परमात्मा खास संतुष्ट होईल! कारण "हजारों यज्ञापेक्षां एक परोपकाराचें कृत्य जास्त श्रेयस्कर आहे" असें भगवान् बुद्धांचें वचन आहे! एकीकडे आत्मोद्धारासाठीं—अर्थात् उघड्या

डोळ्यांनीं—यत्न चालू ठेवून ज्ञानयज्ञासारख्या श्रेष्ठ यज्ञाचें कार्य तुम्ही निरलसतेनें बजावा, यातच तुमचें ऐहिक व पारलौकिक कल्याण आहे. बरें, बराच वेळ झाला, येऊ तर मी आता ! " असें म्हणून तो महात्मा उठलाच !

" महाराज, थाबा, मी आपणास एकदा वंदन करते ! खरोखर योगीराज, आजचा तुमचा उपदेश माझ्या मनावर फार ठसला व त्याप्रमाणेच वागण्याची मी आताच आपल्या पायावर डोकें ठेवून शपथ घेतें ! " असे म्हणून कृष्णाबाईनें त्यांच्या पायावर मस्तक ठेवलें !

" कल्याण, माझ्या भगिनींचें सदैव कल्याण असो, व तुझा हेतु तो परमात्मा तडीस नेवो ! " असा त्यांनीं आशीर्वाद दिला व तो महात्मा " जातो बर ! " असें म्हणून विद्युद्वेगानें तेथून नाहींसा झाला !

## प्रकरण १६ वें.

## " माय डिअर मिस् चंपू ! "

चपूला सध्या १७ वें वर्ष सपत आलें होतें. सहाव्या यत्तेत एक दोन वर्षें गोतें खाऊन ती एकदांची कशीबशी सातव्या यत्तेंत गेली होती. तथापि, आताशा आताशा तिचे अभ्यासाकडे लक्ष असावें तसें नसें. विष्णुपतांच्या घराच्या जवळच असणाऱ्या एका खोलींत एक २४—२५ वर्षें वयाचा खुपसुरत तरुण राहत असे. विनायकराव ज्या वेळीं कॉलेजांत होते त्या वेळेस ह्या तरुणाची व त्यांची थोडीबहुत ओळख असे. अथवा, त्या तरुणानें आपण होऊनच ती जास्त करून घेतली होती, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. पुढे विनायकरावांचें लवकरच देहावसान झाल्यावर, दुःखाचे कांहीं दिवस लोटून देऊन, नतर पुन्हां आमचा तरुण चंपूच्या घरीं मधून मधून येऊ लागला. लीला, कृष्णाबाई, वेणू आपापल्या उद्योगात नेहेमीं गर्क असल्यामुळें, चपूलाहि हास्यविनोदाच्या आनदाची बहार लुटावयास कोणीतरी सहचर पाहिजेच होता ! पहिल्या-

पासूनच तिचे मन या तरुणानें आपल्या रूपानें व सौजन्याच्या वागणुकीच्या भपकाऱ्याने आकर्षित केलें होते. त्यांत आतां तिचा दादा ( विनायकराव ) मृत झाल्यापासून तर आनदाच्या चार गप्पागोष्टी करावयास तिला कोणीच नाहींसे झालें. तेव्हा आताशा ती होऊनहि पुष्कळ वेळां ह्या तरुणाच्या इथें कधीं अभ्यासासाठीं, तर कधीं गप्पागोष्टी करावयास जात असे. पुष्कळ वेळां ते सायकाळीं फिरावयासहि जात असत.

आमचा तरुण या वेळीं ज्युनिअर बी. ए. च्या क्लासमध्यें होता. त्याचे नाव मनोहर होतें. मे महिन्याच्या भरपूर तीन महिन्यांच्या सुट्टींत तो पचवटींत आपल्या भाड्याच्या खोलींत येऊन राहिला होता. चपूला तो नसला म्हणजे कसेसेंच होई ! त्यामुळें सध्या तिचा आनद काय विचारावा ? दोन वेळच्या जेवणाखेरीज ती बहुतेक काळ आपल्या तरुण सहचराच्या इथेच असें म्हटलें, तरी चालेल. तिलाहि सध्या सुट्टीच होती. सहामाहीची परीक्षा नुकतीच होऊन गेली होती. त्यामुळें अहोरात्र ती आपला त्याच्या इथें आनद लुटीत होती ! विष्णुपत हे सुधारकी मताचे असल्यामुळें, तरुणतरुणींनी एकत्र गप्पा मारणे व हास्यविनोदाचा निराग्रस आनद उपभोगणें म्हणजे ' अब्रह्मण्य,' अशी त्यांची आकुचित वृत्ति कधींच नसे. एक दोन वर्षांपूर्वी, " तुझे आता लग्न करायचें ना ? " म्हणून त्यांनीं तिला विचारले होतें, परतु "बी. ए. झाल्यावर मग पाहू" असें तिनें उत्तर दिलें होतें, व आमच्या खऱ्या सुधारकी मताच्या विष्णुपंतास त्यात कांहींच वावगें वाटलें नाहीं.

आमचा तरुण गाण्याबजावण्याचा, नाटकसिनेमाचा, व एकदर चैनींचा मोठा शोकी होता. चपूताईसही नटणें मुरडणें, थाटमाट, नाटके, सिनेमा व गाणेंबजावणें आवडत असे. यामुळें एकाच आवडीच्या या तरुण युगुलाचा एकत्र मैत्रीचा आनद काय वर्णावा !

सायकाळीं साडेसहा वाजण्याचा समय होता ! पचवटींतल्या एका रम्य पण एका बाजूस असलेल्या वीथिकेवरील एका लताकुजांत या वेळीं चपू हातपेटीच्या सुरावर एक नितांतरमणीय पद्य म्हणत होती ! सुदरी या वेळीं एक पोपटी रगाचें पातळ नेसली होती ! केशपाश मुक्त असा तिच्या पाठीवर स्कंधावर विहरत होता ! सायवायूच्या शीतल, शांत लहरी तिच्या

वसनाशीं व केशकलापाशीं क्रीडत होत्या. लताकुंजातून अस्तोन्मुख सवित्याचीं येणारीं ताम्र पीत कोमल किरणें सुंदरीच्या सर्वांगावर विखुरलीं होतीं ! स्कंधावरील पदर गायनवादनाच्या बहारींत किंचित् मागें सरल्यामुळे सुंदर गौरवर्ण करकमल व उन्नत वक्षःस्थल दृग्गोचर होऊन जवळच बसलेल्या तरुणाची चित्तवृत्ति बावरून टाकीत होते ! तथापि तो बराच धूर्त असल्यामुळे आनंदाच्या हास्याशिवाय ती वृत्ति क्वचितच तो दिसू देत असे. आमच्या चंपूचेंहि चित्त त्या मदनमोहन तरुणाच्या सदैव निकट सान्निध्यानें बरेंच चंचल झालें होतें ! तारुण्याचा उन्माद तिच्या शरीरात विद्युल्लतेसारखा नाचू लागला होता ! पंचशराच्या अत्यंत सुखद अशा बाणानें ती क्षणोक्षणीं विद्ध होत होती ! त्यामुळें आमच्या तरुणानें केलेल्या चेष्टाना वरवर जरी ती नाखुषी दर्शवी, तरी आंतून तिला त्यामुळें आनंदाच्या गुदगुल्याच होत असत !

आमचा तरुणहि आज उन्हाळ्यानिमित्त काढलेल्या स्वच्छ पण पातळ अशा ड्रेसने विनटला होता ! विरल पण सुंदर दिसणारा त्याचा मस्तकावरील क्रॉप, अत्यंत पातळ अशा मलमलीच्या शर्टवर पातळ असा एक फॅशनेबल कोट, डाव्या मनगटावर सायंकालीन कोमल रविकिरणात चमकणारें सोनेरी रिस्टवॉच, अत्यंत पातळ अशा धोतराचा मोहक रितीनें घातलेला काचा, व पायात पातळ पायमोजे व कॅनव्हासचा एक धवल असा शू होता ! या सर्व झकपकीस शोभविणारें त्याचें मदनासारखें सौंदर्य पाहून चंपीचें चित्त मदनाच्या कोमल शराने विव्हल होई व त्याच्या आलिंगनादि सौख्यानें तिला थोडेसें बरें वाटे ! असो. चंपीच्या गाण्याची बहार चालू होती ! वीणाझंकारसदृश असे रमणीच्या कंठांतून तिच्या मनःस्थितीचें चित्र उठत होतें ! सुंदरी गात होतीः—

" मला मदन भासे हाऽमोही मना । याऽभामा मना "—

ह्या पदाची बहार चालू असतां सुंदरीचे मदालस अंगविक्षेप व चंचल नयनकटाक्षपात पाहून आमच्या तरुणाच्या चित्तास अधिकच फावलें, व " आतां या सुंदर गुलाबकलिकेचा सुगंध तिच्याच अनुमतीनें आपण लवकरच सेविणार !" या आनंदानें त्याच्या मुखावर राजस गुणाचें स्मित विलसू लागलें ! आज आमच्या तरुणानें कोठेंसें भोजनास गेल्यामुळें तांबूल भक्षण केला होता, त्याची लाली अजूनही त्याच्या मधुर ओष्ठ-

द्रयावर विलसत होती ! हास्यप्रसंगीं ती जास्तच खुलत असे ! पहिलें पद्य संपल्यावर पुन्हा तिनें एक, आपल्या चित्ताचें दर्शक असें, दुसरें पद्य गाण्यास सुरवात केली. सुंदरी हृदयाच्या कळवळ्यानें गाऊं लागली:—

" असतानाऽयतिऽसन्निध किंचित् सुखऽवाटते "—

सारंगीच्या कोमल सुराप्रमाणें निघणारे रमणीचे आलाप वातावरणांत मिलाफ पावूं लागले ! या वेळीं पश्चिमा नभ्रहि सवित्याच्या सन्निध बसून हेंच पद्य अत्यंत सात्त्विक भावानें गात होती ! लज्जा, खेद, अनुराग, इत्यादि विकार तिच्या मुखावर विलसत होते ! असो. याप्रमाणें सुंदरीचें गायन संपल्यावर तरुण म्हणाला:—

" वा, सुंदरी मिस् चंपू, तुझ्या गाण्यानीं तूं क्षणभर स्वर्गसुखाचीच आठवण उत्पन्न केलीस ! खरोखर, अशा अप्रतिम गाण्याचा व वादनाचा आनंद आम्हाला नेहेमीं उपभोगावयास मिळत नाहीं, हें आमचें किती दुर्दैव ! परंतु तूं लवकरच म्हणजे पुढल्या वर्षी पुण्यास कॉलेजांत येशीलच. त्या वेळीं मात्र तूं कृपा केल्यास, मिस चंपू, मला तुझ्या आनंदाची बहार नेहेमीं लुटावयास सांपडेल ! "

" कसचें, कसचें मास्टर मनोहरपंत ? " चंपू किंचित् लाजल्यासारखी होऊन एक नयनकटाक्ष ( Side glance ) त्याच्याकडे फेंकीत म्हणाली, " मी कांहीं इतकें सुरेख गात नाहीं. बाकी तुमच्या सारख्यांचें आपलें " परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्य " असेंच ब्रीद असायचें, व तुम्हास ते फारच शोभतेंहि ! " असें म्हणून रमणीनें मधुर स्मित केलें ! मनोहरपंतही हसले ! कांहीं वेळ तसाच गेल्यावर मनोहरपंत म्हणाले:—

" खरोखर मिस् चंपू, माझ्याप्रमाणें तूंहि आजन्म लग्न न करतां देश-सेवेसाठीं अविवाहितच राहण्याचा निश्चय केलास, तो किती पण उदात्त आहे ! खरोखर आज आपल्या देशास जितक्या आपल्यासारख्या कार्य-कर्त्या तरुणतरुणी मिळतील, तितक्या हव्याच आहेत. बरें, अविवाहित राहिलें म्हणजे विषयोपभोग घेऊंच नये किंवा घेतां येऊंच नये असें थोडेंच आहे ? अनंत लग्नें करून, लौकिक दृष्ट्या नाना तऱ्हेचे व्याभि-चार करून देखील, श्रीकृष्णाला नाहीं का पुन्हा ब्रह्मचारी म्हणून मिर-वितां आलें ? पांच पांच नवरे करून देखील, द्रौपदीला नाहीं का पुन्हा पातिव्रता म्हणून डौलानें राहतां आलें ? छे, छे, मिस् चंपू, श्रीकृष्णाच्या

वेळचा समाज आजच्या सारखा धार्मिक, सामाजिक, व नैतिक बाबतीत इतका आकुंचित व अध नव्हता ! अरेरे, कुठें ते उदात्त व रमणीय चित्र, व कुठे आमच्या सध्याच्या अधळ्या समजुतीचे हिडिस चित्र ! सुदरी चपू, माय डिअर मिस् चपू, '' असें म्हणून रमणीच्या कठाभोवती आपला कोमल बाहुपाश टाकून बसलेल्या तिच्या मनोहर सहचरानें तिला आपल्या करपाशांत बद्ध करून तिचे अधरामृत पान केले, व ते पुढें म्हणाले:—

" अहाहा, तुझे हे अधरामृत खरोखर त्या स्वर्गीय अमृतासहि लाजेनें खाली पहावयास लावील ! ह्या अधरामृताचें सदैव पान करण्याचे भाग्य मला लाधलें, तेव्हां खरोखर मी किती धन्य आहे ! ''

"डिअर मनोहरपत, आपला मनोहर सहवास सदैव लाभून आपले मदनमोहन आलिंगनसौख्य मला मिळत आहे, तेव्हां मीच भाग्याची म्हणायची ! '' चपीनें उत्तर केले.

" मिस् चपू, '' मनोहरपत पुन्हा पहिल्या विषयाकडे वळून म्हणतात, " खरोखर तो श्रीकृष्णाचा काळ किती उज्ज्वल ! अविवाहित अथवा विवाहित, कोणच्याहि अवस्थेंत असले, तरी सुदरींच्या मधुर स्मितादिकाच्या बहारीची लयलूट केल्याशिवाय कोणच्याहि कर्मवीरास आपल्या कार्यात प्रोत्साहन येत नाहीं, हेंच श्रीकृष्णानीं आपल्या चरित्रांतील रासक्रीडेसारख्या प्रसंगावरून दाखविलें नाहीं काय ? अहाहा ! चपू, त्या रासक्रीडेच्या रात्रीं जी सौख्याची लयलूट झाली व जो दिव्य स्वर्गीय आनद लुटला गेला, त्याची आमच्या कोत्या समजुतीच्या समाजास काय कल्पना येणार ? सुदरी, तें वर्णन तू एकदा वाचच, असे माझे तुला आग्रहाचे सागणें आहे ! अहाहा, अशा अनत रात्री केलेल्या लयलुटीचें वर्णन एकनाथमहाराजांच्या तोंडून प्रत्यक्ष श्रीकृष्ण मोठ्या बहारीनें करतात:—

" ते रासक्रीडेची राती । म्या ब्रह्मषण्मास केली होती । गोपिका अर्धक्षण मानिती ! । लवकरी का गभस्ती उगवला ? ॥ जेथे माझी क्रीडा सुखकल्लोळ । तेथ कोण स्मरे काळवेळ! । ......ऐशा माझिया संगती । भोगिल्या राती नेणों किती ! । तरी त्यासी नाहीं तृप्ती । चढती प्रीती मजलागीं ! ॥–''

तसेंच त्या सुखाची पुन्हा आठवण होऊन, त्या रात्रीं त्याना निमिषासारख्या वाटल्या हें पुन्हा सागून, गोपिकाच्या तळमळीचे वर्णन तें पुढें करतातः—

" माझ्या वियोगे त्या त्या राती । ज्या आलिया यथास्थिती । त्या गोपिका कल्पप्राय मानिती । सन्निध स्वपती असताही ! ॥ "—

लाडके, त्याचप्रमाणे लौकिकदृष्ट्या त्या गोपिकार्नी त्याच्याशीं व्यभिचार केला,ही गोष्ट श्रीकृष्ण कधींच नाकबूल करीत नाहींत—लपवून ठेवीत नाहींत ! ते भ्याड नव्हते ! ज्याला Moral courage म्हणतात,तें नीतिधैर्य त्यांच्या नसानसातून नाचत होतें! उघडपणे ते सर्व जगास सागतातः—

" त्या केवळ अबला निश्चिती । मत्सगाची अति प्रीती । तेही सगतीं कामसक्ती । शास्त्रप्रवृत्तीविरुद्ध ! ॥ मी भ्रतारु नव्हे शास्त्रविधी । रुपे मदनमोहन त्रिशुद्धी । मजासि रतल्या त्या अविधी । जारबुद्धि व्यभिचारें ! ॥ "—

परतु म्हणून काय झालें ? श्रीकृष्णाची प्रेमाची व्याख्या किती उच्च, किती उत्तुग, व किती उदात्त आहे ! अहाहा ! त्याची आम्हा मानवांस—अज्ञ व आंधळ्या अशा नीतीच्या कल्पनास चिकटून बसणाऱ्या आम्हा मानवांस—काय कल्पना येणार ? लग्न झालेलें असले वा नसलें, म्हणून काय झाले ? त्यानें अत्यत उच्च अशा प्रेमास बाध येत नाहीं ! स्वर्गीय प्रेमानें झालेल्या हृदयमीलनाचे अत्यत उज्ज्वल चित्र जर कुणास पहावयाचें असेल, तर त्याने श्रीकृष्ण व गोपींच्या चारित्राकडे दृष्टि फेकावी ! अहाहा ! अशा दिव्य स्वर्गीय प्रेमाचा आनद हा केवळ स्वसवेद्य आहे. त्याची कल्पना श्रीकृष्णासारख्या महात्म्यासच होणार आहे.ते सांगतातः—

" तें सुख गोपिका जाणती । कीं माझे मी जाणे श्रीपती । जे रासक्रीडेच्या राती । झाली सुखप्राप्ती सर्वांसी ! ॥ "—

अहाहा ! त्या गोकुळातील रासक्रीडेची आठवण होऊन श्रीकृष्णास पुढे किती प्रेमाचे भरते आले आहे, व त्याचें ते उद्धवापाशीं किती बहारीनें वर्णन करून आपला हृदयभार हलका करीत आहेत !त्या नितांतस्वर्गीय हृदयमीलनाची गोष्ट सागतां सागतां वियोगकाळींचेहि स्मरण होऊन त्या वेळीं गोपींची किती शोचनीय स्थिति झाली, ह्याचेहि वर्णन, पाषाणासही पाझर फोडणाऱ्या वाणीनें, श्रीकृष्णार्नी नाथमुखानें

केलें आहे ! असो. तर चंपू, माय डिअर मिस् चंपू, या सर्व गोष्टीं-पासून आपणांस इतकेंच घ्यायचें कीं, विवाहित स्थितीमध्यें वा अविवाहित स्थितीमध्यें, लौकिकदृष्ट्या व्यभिचार करून देखील, ज्याच्या स्वर्गीय प्रेमाचे तत्त्वाची ओळख शुकासारख्या ब्रह्मचाऱ्यास झाली व विवेकानंदासारख्या स्वामीस पटली, त्या स्वर्गीय प्रेमाचा आस्वाद अविवाहित स्थितींत देखील आपणांस घेतां येणार नाहीं, असें थोडेंच आहे ? " असे बोलून मनोहरपंतांनीं बराच वेळ बोलून दमल्यामुळें एक सुस्कारा सोडला व ते सुंदरीच्या कमनीय मुखमंडलाकडे पाहूं लागले ! रमणीहृदयांत आपल्या मनोहर सहचराचें तें संभाषण ऐकून आनंदाच्या ऊर्मी येत होत्या व मुखावरील स्मिताच्या रूपाने त्या वारंवार दृग्गोचर होत होत्या !

" वा, मनोहरपंत, " आपल्या दंतपंक्तीची कौमुदी अंधुक होणाऱ्या आसमंतात् पसरीत ललना म्हणाली, " आज तुम्ही एक लेक्चरच दिलेंत म्हणायचें ! परंतु माझ्याखेरीज दुसरा कोणी आपणांस श्रोता मिळाला नाहीं, याबद्दल मला वाईट वाटतें. अशा उत्कृष्ट भाषणाचें श्रवण करण्यास नाहींतरी तितकें भाग्यच लागतें ! "

" न मिळूं दे दुसरा श्रोता " मनोहरपंत म्हणाले, " तें ऐकण्यास तितकी योग्यताही लागत असते ! तुझ्यासारख्या काव्यमय हृदयाच्या सुंदरीस माझे बोल पटले, पण दुसरा एखादा अरसिक मनुष्य जर येथें असता, तर profane म्हणून त्यांनीं माझ्यावर गहजब केला असता. लाडके चंपू, माय डिअर मिस् चंपू, " तिला पुन्हा आपल्या जवळ ओढून, तिच्या गुलाबी गालांचें चुंबन घेत ते पुढें म्हणाले,—" त्या श्रीकृष्णाच्या दिव्य प्रेमाचा आनंद पुन्हा कोणी चाखूं नये, म्हणून अरसिक अशा लोकांनीं—" न देवचरितं चरेत् "—अशा तऱ्हेचीं विधानें केलीं आहेत. कारण, त्या अरसिकांना त्यांत काय गोडी वाटणार ? परंतु आपणहि तसेंच म्हटल्यास आपणांसहि त्यांच्याच पंक्तीस बसावें लागेल ! असो. चला आतां. उशीर झाला. पण येत्या शनिवारीं नाटकाला येणार ना ? "

" हो हो. मला बाई तें ' विनोद ' नाटक भारीच आवडलें! " असें म्हणून ती उठली. सविता अस्तास गेल्यामुळें त्याच्या वियोगाच्या दुःखानें

पश्चिमावधूच्या मुखावरील ती पूर्वीची लाली हलुहळू नाहींशी होत होती ! लवकरच ते घरीं येऊन पोहोंचले, व त्यांनीं एकमेकांचा अत्यंत कष्टांतः-करणानें निरोप घेतला !

## प्रकरण १७ वें.

## सात्त्विक वैधव्य !

मागील हकीकतीस दोन तीन दिवस लोटले होते. एके रात्रीं ११–१२ वाजण्याच्या सुमारास गंगेच्या कांठीं एक १८ वर्षांची सुंदर बाला बसली होती व तिच्यापासून कांहीं अंतरावर एक २७–२८ वर्षें वयाचा एक तरुण बसला होता. ती पौर्णिमेची रात्र असल्यामुळें सुधांशूची धवल ज्योत्स्ना सर्व शांत निस्तब्ध अशा पृथ्वीतलावर पसरली होती!—सुधांशूच्या ज्योत्स्नामृताचे पानानें जणों सर्व जगास समाधिच लागली होती ! निरभ्र नीलाकाशांत अनंत तारारमणींचा सलज्ज चमचमाट चालू होता. निशावायूच्या शांतप्रशांत लहरी नदीजलावर क्षुद्र तरंगभंग कंपित करीत होत्या, नदीतीरीं बसलेल्या सुंदरीच्या वसनाशीं व किंचिन्मुक्त अशा अलकराजीशीं क्रीडत होत्या, नदीकांठीं असणाऱ्या वृक्षराजीस डोलवीत होत्या, लतापल्लवास नाचवीत होत्या, पुष्पगुच्छास हसवीत होत्या ! ललनेच्या मुखावर सात्त्विक वृत्तीचें तेज विलसत होते.आपल्या प्रियकराचे ध्यानांत रंगल्यामुळें लीलेच्या मुखावर मंदस्मित विलसत होतें.

“ लीलाताई, आपणांस येथवर येण्याची तसदी दिली, याबद्दल आपण मला क्षमा करावी ! ” विष्णुपंत म्हणाले.

“ छे छे, तसदी कशाची विष्णुपंत ! आपलें तसेंच कांहीं महत्त्वाचें व नाजूक काम असेल आणि म्हणूनच आपण असें एकांतीं भेटण्याचें योजिलें असेल, एवढें कां मला कळत नाहीं ! आणि आपल्यासारख्या सभ्य गृहस्थाच्या विनंतीस मान देऊन येथवर येणें, हें माझें कर्तव्यच आहे. ” लीलेनें विनयपूर्ण उत्तर दिलें.

“ तथापि आपणांस तसदी पडली याबद्दल आपली प्रथम क्षमा

मागणे, हेंहि माझें कर्तव्यच आहे. '' विष्णुपंत म्हणाले. यावर लीलेनें एक मंदस्मित केलें. विष्णुपंत पुढे बोलू लागले:—

" ललिताबाई, आपण असेच आजन्म अविवाहित राहणार काय? आपली अनुमति असल्यास, आपल्याशीं पुनर्विवाह करावा अशी माझी इच्छा आहे. आपणास माझ्या बोलण्याचा राग तर आला नाहींना? ललिताबाई, आपली सध्याची स्थिति पाहिली म्हणजे माझें हृदय कसें तिळतिळ तुटते! इतक्या अल्पवयातच आपणावर वैधव्याचा घाला पडलेला पाहून, कोणा सहृदयास वाईट वाटल्यावाचून राहणार आहे? आणि एका अर्थानें पाहता, आपण खरोखरी विधवाहि नाहींत. कारण विनायकाशीं आपला विवाह—शास्त्रोक्त विवाह-विधि—झालेला नव्हता. सप्तपदी पूर्ण झाल्याशिवाय विवाह पूर्ण झाला असें होत नाहीं, असे शास्त्रवचन आहे हें, लीलाबाई, आपणांस मी सांगितलेच पाहिजे असें नाहीं. मग अशी स्थिति असता, आपण मुद्दाम ह्या वैधव्याचीं दुःखें कां बरें भोगता? अरेरे, आपली किती ही शोचनीय स्थिति झाली आहे? ती आपली पूर्वीची आनंदानें हसणारी—डोलणारी देहलतिका कशी वाळून गेली आहे! लीलाबाई, आपल्या स्थितीकडे पाहून एखाद्या पाषाणासहि पाझर फुटेल, मग माझ्या हृदयाची कालवाकालव व्हावी, यात काय नवल? माझीहि सध्या विधुरावस्थाच आहे. मी स्पष्ट बोलतों, याचा आपणास राग तर येत नाहीं ना? आपल्या ठिकाणीं माझें प्रेम जडलें आहे, असें म्हटल्यास आपण रागावणार तर नाहीं ना? पुन्हा विवाह करायचा, तर त्यातच एकादें समाजकार्यही करावे, असा माझ्या मनात विचार आला. माझ्याशीं विवाह करून आपण मला धन्य कराल काय?'' एवढे बोलून विष्णुपंत आशेनें सुंदरीच्या मुखकमलाकडे पाहू लागले. त्याचें भाषण चालू असतांना लीलेनें आपले विलोल नेत्र चंद्रबिंबाकडे लावले होते! त्याचे भाषण तिला बिलकुल प्रिय नव्हतें, तरी सभ्यतेला उचित असें त्याचें भाषण होईतोंवर, तिनें मौन स्वीकारलें होतें. तिच्या वदनावर मात्र एक प्रकारच्या अलौकिक निश्चयाचें दिव्य तेज सारखें खेळत होतें! त्यांचे भाषण संपल्यावर आपला मुखेंदु—चंद्रबिंबाशीं स्पर्धा करून त्यांस लज्जित करणारा

आपला मुखचंद्र—तिनें खालीं केला व अत्यंत सभ्यपणाच्या विनयानें ती म्हणाली:—

" विष्णुपंत, आपल्या भाषणाचा मला बिलकूल राग आला नाहीं. व माझी स्थिति पाहून आपल्या हृदयाची कालवाकालव होते आहे, या आपल्या संवेदनात्मक ( sympathetic ) भावनेबद्दल मी आपली अत्यंत आभारी आहे ! तथापि, विष्णुपंत आपल्या आशापूर्ण मनाची मला निराशा करावी लागत आहे, याबद्दल मला आपण क्षमा करा! एकदा ज्याला ह्या हृदयाचें दान केले, ह्या हृदयसिंहासनावर एकदां ज्या देवाची स्थापना झाली, त्याच्याशिवाय अन्य देवाची स्थापना तिथें कशी होईल ? त्याच देवाची आजन्म मनोभावानें पूजाअर्चा न करतां, जर प्रत्येक क्षणीं मनुष्य ह्या देवापासून त्या देवाकडे धांव घेऊं लागला, तर मग त्याची अव्यभिचारिणी भक्ति ती काय राहिली ? विष्णुपंत, हृदयाचें दान एकदांच होत असते !—

" सकृदंशो निपतति सकृत्कन्या प्रदीयते ।
सकृदाह ददानीति त्रीण्येतानि सतां सकृत् ॥ "—

त्याचप्रमाणें:—

" न दत्त्वा कस्यचित् कन्यां पुनर्दद्यात् विचक्षणः "—

तसेच:—

" पतिं या नाभिचरति मनोवाग्देहसंयता ।
सा भर्तृलोकानाप्नोति सद्भिः साध्वीति चोच्यते ॥ "—

अशा तऱ्हेच्या शास्त्रवचनांचा असाच अर्थ नाहीं काय ? विष्णुपंत, आमचा प्रत्यक्ष विवाह झाला नसला, म्हणून काय झालें ? बोहल्यावर उभें राहून होणाऱ्या अशा किती तरी सप्तपद्या याच गंगेच्या कांठीं अशाच वेळेस आम्ही केल्या असतील ! विष्णुपंत, ज्या वेळीं आमचें लग्न झालें, त्या वेळीं ह्या गंगेच्या निर्मल घाटावर आम्ही उभे होतों, त्या वेळीं आकाशांत चमकणाऱ्या करवल्या आमचें मंगल पाहून आनंदानें हसत होत्या, सुधांशु चंद्रमा आम्हांस मंत्र सांगत होता, व निशावायूच्या लहरींने डोलणारे वृक्ष व लता आपल्या पर्णपुष्पांच्या अक्षता आम्हांवर उधळीत होत्या ! विष्णुपंत, आमच्या विवाहाचीहि अशीच गोष्ट आहे. त्या वेळीं मी आपल्या बागेंत बसलेली होतें—त्या लताकुंजांतील बोहल्या-

वर माझा विवाह झाला ! अस्तोन्मुख सविता व पश्चिमादिग्वधू आम्हावर रक्तकिरणाचा गुलाल उधळीत होती, लता व वृक्ष आम्हावर वरून कुसुम-रेणूंच्या मगलाक्षता टाकीत होते, पिकसारिकादि ' द्विज ' गण आमच्या विवाहकालीन मगलाष्टके म्हणत होता ! विष्णुपत, ह्या आमच्या विवाहाची व लग्नाची सर, मानवी बाहुलाबाहुलींच्या हजारो लग्नास तरी येईल काय? आपला समाज ह्या अत्यत उच्च विवाहाच्या स्वर्गीय आनदात एके काळीं विहरत होता. अशा स्वर्गीय विवाहाने व दिव्य लग्नाने मंडित झालेली व हृदयमीलनाच्या दिव्य आनदाच्या समाधींत सदैव डुलणारी ही बाला, ज्या वेळीं त्या निर्दय काळाने तिच्या जीवनसर्वस्वावर घाला घातला—आपला बर्फमय हात त्यावरून फिरविला—त्याच वेळीं जोगीण बनली,—त्याच वेळीं तिचा सर्व राजस आनद विलयास गेला ! विष्णुपत, ज्याची दृष्टि नितांत काव्यमय झाली, ज्याच्या मनोभावनेत ऐहिक व्यव-हाराचा निष्ठुरपणा व चचलता हीं लेशमात्रही राहिलीं नाहींत, असा प्राणी, अशी व्यक्ति जशी वागेल, तशा तऱ्हेनें राहण्याचा मी यत्न करीत आहे व तो परमात्मा त्यात मला यश देवो, हीच माझी त्याजजवळ प्रार्थना आहे ! विष्णुपत, अशा व्यक्ति हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या तरी निघतील का नाहीं, याची शकाच आहे. अशा कोटीप्रत जाऊन पोहोचणें म्हणजे अत्यत कठीण गोष्ट आहे, ती सुळा-वरची पोळी आहे, लोखडाच्या चण्याहूनही ती अगीं बाणण्यास कठिण आहे, हे मला कबूल आहे. अत्यत उच्च कोटींतले साधुसत व कवि हे एकाच मालिकेंत बसतात. अशा उच्च कोटीपर्यंत मजल पोचणें, हें कार्य मोठें दुस्तर आहे. कारण भगवताची ' दुरत्यया माया ' आपले मोहक जाल पसरून बसलेली आहे, तिचे अनत पाश तोडावे लागतात !

" कामक्रोध आड पडले पर्वत । राहिला अनत पलीकडे ॥
नुलघवे मज न सापडे वाट । दुस्तर हा घाट वैरियाचा ! ॥"—

असें तुकोबारायासारख्यास देखील उद्गार काढावे लागले, तिथें माझ्यासारख्या अबलेचा काय पाड ? तथापि विष्णुपत, मी अबला असलें, तरी ज्या चिच्छक्तीच्या जोरावर षड्रिपूंचे निर्दालन होतें, ती माझ्यातहि वास करीत आहे ! तेव्हां तिच्या साह्यानें मी आपला कार्यभाग उरकीन अशी माझ्या अगांत सात्त्विक स्फूर्ति आहे ! यासाठी आपले जर माझ्या-

वर प्रेम जडलेच असेल, तर तें समूळ नाहींसें करा असें सांगण्याचा निर्दय-पणा न करता, माझी आपणास एवढीच विनंति आहे कीं, जशी आप-णास वेणूताई, तशाच मी एक आपली भगिनी समजून आपण मजवर प्रेम करावे. अहाहा ! विष्णुपत, ज्या वेळीं अशा दिव्य स्वर्गीय आनदांत प्रणयी युगुले बद्ध होत असतील त्या काळाची कल्पना व स्मृतिचित्र देखील किती रमणीय दिसते ! " लीला किंचित्काळ चद्रबिंबाकडे आपले विलोल नेत्र लावून म्हणाली, "भाऊराया, त्या काळचा चित्रपट अत्यत उज्ज्वल अशा एखाद्या सिनेमाच्या फिल्मप्रमाणे तुमच्या डोळ्यांपुढें नाचत नाहीं का ? अहा, ते पहा अशा एका दिव्य हृदयमीलनाचें प्रणयी युगुल त्या बोहल्यावर बसले आहे ! "–चद्राकडे पहाता पहाता आपल्या विचाराशीं व भावनांशीं तन्मय झालेली लीला, जणू आपल्याशींच बोलत होती- "तो पाहिलात का तिचा प्रियकर तिच्याशीं कशा गुजगोष्टी करीत आहे व तीहि मदस्मितानें त्याचा आनद वाढवीत आहे ! अहाहा ! " धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि " असें हें त्रिवार उच्चारलेलें वचन आपण ऐकलेत काय ? अरेरे, पण ते पहा, विष्णुपत, हें काय ? एकदम देखावा बदलला. अत्यत आनदांत हसणारा हा युवक पहा कसा स्फुदून स्फुदून रडत आहे ! ते पहा त्याच्या भार्येचे प्रेत ! अरेरे, गरीब बिचाऱ्या युवकाचा स्वर्गीय आनद विलयास गेला ! ससाराची सुरेल सतार एकदोन बहारींच्या चिजा झाल्या नाहींत, तोंच काळाच्या कराल आघातानें विदीर्ण झाली ! पण तो पहा पुन्हां देखावा बदलला. तो युवक सायकाळीं एका उद्यानात बसला असता, ती पहा एक अप्सरेसारखी सुंदर बाला त्याचें चित्त विचलित करण्याचा यत्न करीत आहे. गरीब बिचाऱ्या त्या बालेस तो विधुर आहे हें माहीत नाहींसें दिसतें. पण तो पहा स्वतःशींच पुटपुटत आहे:—" धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि, नातिचरामि ! हाय हाय ! प्रिये, तू कशी ग मला सोडून गेलीस ? तुझ्यावांचून आतां मला ह्या जगात कांहींच गोड वाटत नाहीं ! " पण ती पहा ती बाला–गरीब बिचारी त्याच्या हृदय-वेदनांशीं अज्ञात अशी बाला–आपल्या तारुण्यावस्थेंतील सहज लीलांनीं त्याचें चित्त कसें क्षणोक्षणीं विचलित करीत आहे ! तिचे ते हरिणीप्रमाणें

चचल नयनकटाक्ष, भ्रमरासहि लज्जित करणारा व वायूच्या लहरींनें इतस्ततः विहरणारा केशकलाप, तिचें तें उन्नत वक्षःस्थल, तिचे ते गालावरील हसरे गुलाब, तिच्या कर्णप्रदेशीं हलणारे हिरव्यागार पाचेचे लोलक, व तिचे ते हावभाव व चेष्टा ह्यानीं एखाद्या योग्याचीहि समाधी ढळवणाऱ्या त्या मोहिनीनें तो पहा युवक कसा बावरा होत आहे ! पण प्रत्येक क्षणीं एक दुःखाचा उसासा टाकून, आपले नेत्र आकाशाकडे लावून, तो पहा अत्यत निश्चयानें नकारार्थी आपली मान हलवून, " प्रिये, नाहीं बरें, मी तुझ्याशीं बेइमान होणार नाहीं ! तुला दिलेलें वचन मी नाहीं बरें विसरणार ! " असें वारवार म्हणत आहे. " नंतर एकदम भानावर आल्यासारखी होऊन, पण आपल्या भावनेच्या उत्कटावस्थेंत पाहिलेल्या दृश्याची स्मृति पूर्ण जागृत आहे अशा स्थितींत, ती पुढें म्हणाली, " पाहिलांत का विष्णुपत, आपण पाहिलात का तो युवक ?" असें म्हणून तिनें पुन्हां चंद्राकडे आपले नेत्र लावले व जणू काय पुन्हा त्या भावनेच्या चित्राशीं तन्मय होऊन ती म्हणतेः—" अहाहा, तो पहा तो युवक एका आश्रमांत बसून आपल्या गरीब शिष्यास आनदानें विद्यादान करीत आहे! त्याच्या वदनावर सात्त्विक आनंद विहरत आहे. त्याचे राहणे किती साधें आहे ! त्या आनंदातहि आपल्या मृत प्रियेची उत्कट अशी मधूनमधून आठवण होऊन त्यानें टाकलेले उसासेहि क्वचित् ऐकू येताहेत. " असे म्हणून ती पुन्हा विष्णुपतास म्हणाली, " विष्णुपत, पाहिलात का तो युवक तुम्ही ? "

" लीलाताई " विष्णुपत म्हणाले, " तुम्ही कोण युवक म्हणता तो दिसण्याचें भाग्य ह्या कमनशिब्याच्या कपाळीं नाहीं! तथापि, आपणांस गतकालांतील अत्यत रमणीय असा देखावा भासमान झाला व त्यास अनुलक्षून आपण बोलत होतां, एवढें मी समजलों. "

" अहाहा, विष्णुपत " लीला पुढें म्हणाली, "असे युवक सध्या कुठें दृष्टीस पडतील कांहो ? अरेरे, कुठें तो उज्ज्वल काल व त्या कालांतील स्वर्गीय आनद ! मृतधर्मांच्या पिशाचाची कवाईत करणाऱ्या अध समाजा, त्या उज्ज्वल कालाकडे अजून तरी डोळे उघडून पहा! अरेरे, " धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि " अशी अग्निब्राह्मणासमक्ष शपथ घेऊन पहिल्या बायकोच्या बाराव्या दिवशींच दुसऱ्या बायकोच्या गळ्यांत मिठी

मारणारे आजचे तरुण युवक कुठें, व त्या शपथेस आजन्म जागणारे ते पूर्वीचे दिव्यनिश्चयाचे तरुण कुठें ! अशा शपथा व वचनें हे खरोखर प्रेमाचे सहजोद्गार आहेत !—ही प्रेमाचीं सहजोद्गारितें आहेत ! परंतु ज्या समाजांत प्रेम कशाशीं खातात हेंहि ठाऊक नाहीं, त्या समाजाचा असा अधःपात व्हावा, त्यात बजबजपुरी माजावी, जुल्म, अन्याय व पक्षपातीपणास ऊत यावा हे ठीकच आहे. ज्या समाजाला स्वर्गीय आनंदानें होणारें हृदयमीलन ही काय चीज आहे ह्याची ओळखही नाहीं, त्या समाजांत जुलुमानें आणलेला जरी विधवाचा बराच मोठा वर्ग दिसत असला, तरी आता मी पाहिलेल्या तरुण युवकासारखे युवक मात्र हाताच्या बोटावर मोजण्याइतके तरी सापडतील कीं नाहीं, याची शंकाच आहे. विष्णुपंत, त्या तरुण युवकाचें तुम्ही अनुकरण करून गतवैभवाच्या उच्च सौख्याची प्राप्ति करून घ्या, असें माझें तुम्हांला आग्रहाचे सांगणें आहे सध्याची माजलेली बजबजपुरी व अन्यायी पक्षपात तुमच्याप्रमाणेच मलाही पसंत नाहींत. आपल्या समाजाची स्थिति सुधारून तो पहिल्या उच्च स्वर्गीय स्थितीस जाऊन पोचावा असें वाटत असेल, तर प्रथम सात्त्विक शिक्षणाचें सर्वांनी शक्य तितकें पान केले पाहिजे. त्याच्याच अनुषंगानें येणारे प्रौढ व तेहि प्रीतिविवाह झाले पाहिजेत. म्हणजे अर्थात् पतीच्या मरणोत्तर पत्नी व पत्नीच्या निधनोत्तर पति ही आपल्या दिव्य प्रेमाशी व्यभिचारी होण्याचा संभव बराच कमी होईल. कारण प्रीतिविवाहानें—खऱ्या हृदयप्रेमानें—बद्ध होणारें प्रत्येक प्रणयी युगुल " धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि " अशाच आणाभाका करीत असतें व त्या आणाभाका केवळ अशाच प्रेमानें सलग्न होणाऱ्या वधूवरांनींच उच्चारण्यासाठीं आहेत, नव्हे, तीं त्यांचीं सहज प्रेमाचीं उद्गारितें आहेत ! असो. आहे ह्या स्थितींतलाच अन्याय काढून टाकण्याचा विचार म्हणजे इतकाच कीं, विधुर व विधवा यांचा बराच नंबर वाढून अनीति फार माजू लागल्यामुळें अथवा विधुरांना तसे अविवाहित रहाणें अशक्य झाल्यामुळें, त्यांच्या पक्षपाती कैवाऱ्या शास्त्रकारांनीं जर त्यांस पुन्हां द्वितीय, तृतीय असे विवाह करण्यास परवानगी दिली असेल—( आणि यांशिवाय दुसरें क्वचितच कारण असणार )—तर त्यांच कारणामुळें विधवांनाहि—निदान

अक्षतयोनीच्या तरी—तशीच परवानगी द्यावयास नको काय ? कारण जुलुमाने जसे साधूसत निर्माण होत नाहींत तसाच जुलुमाने लादलेला जबरीचा सन्यासहि फार दिवस टिकत नाहीं, हें कोणीहि विसरू नये ! कारण साधुसत व सन्यासीसन्यासिनी याची पैदास फार अल्प असते. मानवाच्या सात्विक इच्छा, सात्विक आकाक्षा, व सात्विक भावना ढळवावयास मायेच्या अजब मोहिनींचा नाच सदैव चालू आहे व त्यात शेकडा ९९ प्राणी सांपडले जाणें ही कमकुवत मानवास अपरिहार्य गोष्ट आहे हेंहि लक्षात ठेवले पाहिजे. पण ह्याच विचाराने जर विधुराना पुनर्विवाहाला—दुसऱ्या लग्नाला—परवानगी द्यायची तर ती विधवाना का नको? अरेरे, जिकडे पहाल तिकडे आम्हां अबलावर मात्र जुलूम व आमची गुलामासारखी—पशूसारखी वागवणूक ! पण अशा जुलुमाने नैसर्गिक वृत्तींच्या मोहिनीच्या अनीतीस आळा बसत नाहीं—किंबहुना, जुलुमानें कोणतेंच कार्य होत नाहीं—हें ह्यानीं पूर्ण लक्षात ठेवावे ! अरेरे, मी अशी challenge देते कीं, जुलुमानें ब्रह्मचर्याचा सन्यास बोडक्यावर लादण्यापेक्षा—व लादण्याचे आधीं— नैसर्गिक वृत्तीस, बहुजनसमाजाच्या frail अशा सहनशीलतेस शक्य असे कायदे करा, व मग पहा कीं विधुराप्रमाणेंच खऱ्या विधवाची सख्याहि हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच दृष्टीस पडते कीं नाहीं तें ! पण ती सध्याच्या अन्यायोद्भूत अनीतीच्या बजबजपुरीपेक्षां शतपट बरी नव्हे काय ?" असे म्हणून लिला क्षणभर सुस्कारा टाकून स्वस्थ बसली. नतर कांहीं वेळानें ती पुन्हा बोलू लागली:—

"बाकी विष्णुपत, विधुरानें काय अथवा विधवेनें काय, कोणत्याहि स्थितींत द्वितीय विवाह होताहोईतो न करावा—तो करण्याचे शक्य तितकें टाळावें, याला पुढें मी सांगत आहे ह्या कारणापैकीं कोणचे ना कोणचें तरी लागूं पडेलच. एक तर आत्मोद्धाराच्या दृष्टीने ह्या विषयकर्दमापासून जितकें अलिप्त राहता येईल तितकें राहण्याचा यत्न करावा, हेंच प्रत्येकास परिणामीं श्रेयस्कर आहे. दुसरें, ज्या प्रेमदेवाशीं—अथवा देवीशीं—हृदयमीलनाचा दिव्य आनद लुटला व त्याच्याशीं प्रेमाची वचनें बोललों त्याशीं बेइमान होणें आपणांस शोभत नाहीं. व तिसरें, सध्यां आपल्या देशाला—आपल्या समाजाला—आपल्यासारख्या कार्यकर्त्या

तरुणतरुणींची किती जरूर आहे हें मी आपणास सांगावयासच हवें असें नाहीं. तेव्हां अशा स्थितींत आपल्या मायभूमीची सेवा कर-ण्याचें टाकून आपण आपल्याच विषयसुखांत दंग राहावें, हे केव्हांहि बरें नाहीं. यासाठीं होताहोईतों सुदैवानें झालेल्या सुटकेचा शक्य तितका फायदा घेऊन समाजसेवा करणें, हे आपलें कर्तव्य आहे. विष्णुपंत, आपण हातीं घेतलेलें फ्री प्रायमरी स्कूल, अनाथविद्यार्थीगृह इ. कार्यें खरोखर स्तुत्य आहेत व त्यांतच आपलें तनुमनधन वाहून आत्मोद्धार करा, अशी माझी—आपल्या भगिनीची—आपणास हात जोडून विनंति आहे व आग्रहाचें सांगणें आहे ! " असें म्हणून लीलेनें पुन्हा एक मंद सुस्कारा टाकला व ती स्वस्थ बसली.

" खरोखर लीलाताई, आपण मला एक गुरूच भेटलांत. आपल्या सांगण्याप्रमाणें—उपदेशाप्रमाणे—वागण्याचा मी शक्य तितका यत्न करीन. आपणासारख्या तपस्विनीचा अधिकार न जाणून माझ्या तोंडून निघालेल्या शब्दांचा आपणास राग तर नाहींना आला ? त्याबद्दल मी आपली क्षमा मागतों ! " असें म्हणून विष्णुपंतांनीं खरोखरच लीलेचे पाय धरले.

" छे, छे, विष्णुपंत त्यांत राग कशाचा व क्षमा कशाची ? " लीला गहिंवरून त्यास वर उठवीत म्हणाली. तिच्याहि डोळ्यांत अश्रुबिंदु चमकूं लागले. " असे कुठें भावानें बहिणीच्या कां पायां पडावयाचें असतें ? आणि त्यांतून माझ्यासारख्या धाकट्या बहिणीच्या ? "

" होहो, न पडायला काय झालं ? ' विष्णुपंत म्हणाले, " वसिष्ठांनीं सीतेला उद्देशून म्हटलेंच आहे, 'गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः ' तें काय उगीच ? " यावर लीलेनें मंद स्मित केलें ! नंतर तीं दोघेंही उठलीं. आकाशमध्यावरून तारारमणींच्या पाठोपाठ पश्चिमेकडे धावणाऱ्या, आकाशसरोवरांत तारासुंदरींशीं जलक्रीडा करणाऱ्या चंद्रम्यास त्यांनीं नमस्कार केला. आपल्या केलीमध्यें क्षणैक थांबून चंद्रानें आपला धवल कर त्यांच्या मस्तकीं ठेविला ! निशावायूनें डोल-णाऱ्या वृक्षलता आपलीं पर्णपुष्पें लीलेच्या मस्तकावर ढाळूं लागल्या ! आजचा तिचा अलौकिक निश्चय पाहून चंद्राचें बिंबहि नदीजलावरील तरंगावर आनंदानें नाचूं लागलें ! नंतर लवकरच तीं दोघेंहि परत आलीं व मोठ्या आनंदानें त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला !

## प्रकरण १८ वें.

# अधःपाताच्या कड्यावर.

मागील प्रकरणात वर्णन केलेला अपूर्व प्रसग चालू असता त्याच वेळीं इकडे 'विनोद'नाटकाची बहार साग्खी झडत होती. ती पाहून आमच्या मनोहरपताच्या व चपीच्या हृदयांत आनदोर्मी सारख्या उठत होत्या. "डॉक्टराचा ड्राइव्ह मोठा फोर्सिबल आहे बाई." अशा तऱ्हेच्या अश्लील कोट्यांच्या प्रसगीं मनोहरपत चपीचा मृदु हस्त अर्थ-पूर्ण दाबीन व चपीहि आपल्या हास्याच्या कौमुदीनें थिएटरातील चद्र-प्रकाशांत भर टाकी! नतर काहीं वेळानें नाटक सपल्यावर जाग्रणाचा त्रास होऊ नये म्हणून मनोहरपतानीं एक कॉफीचा सिंगल झोकला व चपीसहि आग्रहानें पाजला व हे ब्रह्मचर्याचा टेंभा मिरविणारें प्रणयी युगुल प्रेमचेष्टा करीत घरीं येऊ लागले! त्या वेळीं दोनएक वाजण्याचा सुमार झाला होता. विष्णुपत व लीला आनदानें व निर्मल मनानें एकमेकांचा निरोप घेऊन सुखनिद्रेच्या आधीन झालीं होतीं. विष्णुपतांच्या स्वप्नांत नुकताच घडलेला सर्व देखावा, जोगिणी लीलेची ती तपस्विनीसारखी मूर्ति, तिच्या वदनावरील तें सात्त्विक तेज, तिचें तें आवेशपूर्ण भाषण, इत्यादि सर्व दिसत होते! आपण लीलेचे चरण धरून, "भगिनी, तुझ्या उपदेशाप्रमाणें मी शक्य तों चालेन" अशा तऱ्हेचे उद्गार काढीत असतां लीला आनंदभरानें स्मित करीत आहे, वायुलहरीनें तिचा कुरल केशपाश भुरभुर उडत आहे, व स्वर्गातून अनत लीलाच जणू काय अशा अप्सरा व देवांगना आपणावर पुष्पवृष्टि करीत आहेत, व हा सर्व देखावा हसऱ्या मुखानें तारासुदरी व त्यांचा प्रियकर पहात आहे, या गोड सुखस्वप्नानें विष्णुपतांच्या मुखावर स्मिताची लकेर झळकत होती! लीलाहि आपल्या प्रिय प्राणनाथाच्या सगतीं घालविलेल्या सुखदरात्रींच्या आनदाचें स्वप्न अनुभवीत असतां तिच्याहि वदनावर मद स्मित विलसत होतें! पण याच वेळीं मनोहरपताच्या आग्रहावरून चपू त्याच्याचकडे निजावयास जाणार असल्यामुळें, चपूच्या हृदयांत पचशराचे अद्भुत मोहन सुरू झालें होतें! चपूचा थाट आज कांहीं अपूर्वच होता. अलक-राजीची मनोहर रचना करून त्यांत एक मदनबाणाचा गजरा मोहकपणें

गोंविला होता ! निशीथकालीन वायूच्या मदशीतल लहरींत अत्यत सौगंधित तैलाने युक्त असा सुंदरीचा तुळतुळीत केशपाश तिच्या स्कद-प्रदेशीं व पाठीवर इतस्ततः विहरत असता मनोहरपताप्रमाणेच तिच्या गुलाबी गालाचे चुबन घेण्यासहि तो मधून मधून धावत असे ! तांबूल-भक्षणाने तिचें ओष्ठबिंब फारच खुलून दिसत होते. अत्यत विरविरीत अशा नील पातळानें सुदरी अभिसारिकेची देहलतिका शोभिवत झाली होती ! पातळाची कास मारली असून पायात सॉक्स व आंग्ल युवतींचे सुदर पॉलिश केलेले काळे व उच टाचेचे बूट घातले होते. तिच्या डाव्या हातावर एक रिस्टवॉच चमकत होतें. वाऱ्यानें पदर मागें गेला होता. गजगतीनें चालणाऱ्या हरिणाक्षीचे मदालस चचल नयनबाण मनोहर-पतास विद्ध करीत होते !

हळुहळू दोघेहि मनोहरपतांच्या घरापाशीं पोहोंचली. तारुण्यांतील मदनाच्या उन्मादानें बेहोष झालेलें युगुल खोलींत शिरलें. आज मनोहर-पतांनीं आपला पलग विशेष रीतीनें शृगारला होता ! अत्यत पातळ अशी मच्छरदाणी पलगावर लावलेली असून तिच्या अलवणाच्या तांबड्या कड्या दोन्ही बाजूस समांतर व त्रिकोणाकृति वर करून ठेवल्या होत्या. अत्यत स्वच्छ अशी चादर गादीवर घातली असून शिवरीच्या कापसा-च्या गुलगुलीत उशा व गिरद्या उशाकडे व्यवस्थित रीतीनें ठेवून दिल्या होत्या ! जवळच एका तिपायी स्टुलावर एक पानाचा डबा असून, तबकांत पिकलेलीं पानें, कांहीं जाई, जुई, मोगरा, गुलाब, अशीं पुष्पें, अत्तराची कुपी व लव्हेंडरची बाटली, इत्यादि साहित्य विलसत होतें ! जमिनीवर एक मोठी सतरजी पसरली असून कोपऱ्यांत एक चार पायांचें टेबल होतें. त्यावर अभ्यासाचीं पुस्तकें व्यवस्थित रीतीनें मांडलीं असून एक हिंक्सचा दिवा मदपणें जळत होता ! मोहना, दमयती, उषास्वप्न, राधाविलास इत्यादि कामोत्तेजक रमणींचे फोटो समोरच लावले होते ! एक मोठा बिलोरी आरसा भिंतीस लटकावला होता. एकीकडे टेनिसची रॅकेट भिंतीवर उंच अशा खिळ्यावर विश्रांति घेत होती ! एकदोन साध्या खुर्च्या व एक आराम खुर्ची व्यवस्थित रीतीनें मांडलेली दिसत होती. सतसखूबाई नाटकांत दिगबरपत व सखूच्या भेटीच्या प्रसगीं दिसणाऱ्या शृगारिक देखाव्याचें जणू काय इथें प्रतिबिंबच पडलें होतें !

खोलींत शिरल्याबरोबर दारास कडी वगैरे घातल्यावर व खिडक्या बद केल्यावर मनोहरपंतांनीं व चपीने—पण नको, पुढील हिडीस देखाव्याचे वर्णन न करावे हेच बरे ! परतु त्यांचा तो किळसवाणा व अत्यन निंद्य प्रकार सपतो न सपतो, इतक्यात खाड्दिशीं दारावर एक लाथ बसली व काड्काड्र करीत मोडून पडणाऱ्या दारांतून, " अधःपात, अधःपात " असा गभीर ध्वनि उमटवीत एक तेजःपुज महात्मा योगी आत शिरला !

" चपू " आत शिरल्याबरोबर तो महात्मा बोलू लागला, " अरेरे, चपू, हे तू काय केलेंस ? " पण लगेच त्या तरुणाकडे वळून तो महात्मा गभीर पण निश्चयाची आज्ञा करीत म्हणालाः—" मनोहरपत, मी तुम्हांस बरोबर चोवीस तासाची नोटीस देत आहे. उद्यांच्या उद्यां आपण येथून काळें करा ! नाहीं तर माझ्याशी गाठ आहे, हें पक्कें लक्षांत ठेवा ! " नतर त्याने, "चल, चपू चल," असे म्हटले व तो निघालाच! एखाद्या मत्रबद्ध प्राण्याप्रमाणे चपू त्याच्या पाठोपाठ चालली. नदीच्या घाटावर जाऊन पोहोचेपर्यंत महात्मा काहींच बोलला नाहीं. दोघेहि स्तब्धपणें चालली होतीं. लवकरच ते नदकिाठीं येऊन पोहोचले. यावेळीं प्रात.कालचा तीन वाजण्याचा सुमार झाला होता. आकाशपथाचें बरेंच आक्रमण करून चद्रमा पश्चिमेकडे कलला होता. आकाशसरोवरात तारारमणींशीं करीत असलेल्या शिवापळीच्या खेळानें श्रांत झाल्यामुळेंच कीं काय, सुधांशुच्या वदनावर किंचित् आरक्तता दिसत होती ! तारारमणी मात्र, "अजून आपणास यानें कुठें शिवले आहे ? " या आनदाने चद्राकडे पाहून सारख्या फिदीफिदी हसत होत्या ! त्याच्या दतपक्तींचें चादणे चद्रज्योत्स्नेंत विलीन होत होतें ! आकाशसरोवरात याची ही स्वैरक्रीडा चालू असता उठणाऱ्या लाटाचे कल्लोळ व जलतुषार आकाशगगेच्या रूपानें दिसत होते ! या सर्व देखाव्यासकट निर्मल नलिकाश नदीजलावरील तरगावर नाचत होते ! सर्वत्र शात निस्तब्धतेचा वास होता! निद्रेच्या मोहनी अस्त्राने सर्व जग मुग्ध झालें होतें. प्रातर्वायूच्या शीतल लहरी मदमदपणें वहात होत्या !

नदीच्या घाटावर आल्यावर त्या महात्म्यानें चपूस आपल्यासमोर

बसावयास सांगितले. भीतीनें थरथर कांपणारी चंपू तशीच उभी राहिली!

"चंपू, हें तूं काय केलेस?" इतका वेळ दाबून धरलेला उमाळा उसळून योगी बोलूं लागला, "अरेरे, तूं किती पापी आहेस! सदसद्-विवेक बुद्धीस पायाखालीं तुडवून प्रेमाच्या व ब्रह्मचर्याच्या टेंभ्याखालीं विषयकर्दमाला कवटाळणाऱ्या पोरी, तुला म्हणावें तरी काय, हेंच मला समजत नाहीं! दुष्काळांत भुकेनें जीव व्याकुळ होऊन पंचप्राण गोळा होऊं लागतात म्हणून दरोडे घालण्याची वासना होणें एक वेळ क्षम्य होईल, त्याप्रमाणें जिचा भविष्यकाळ काळ्याकुट्ट अधःकारानेंच भरलेला असून आशेचा एक किरणहि त्यांत दिसत नाहीं अशा एखाद्या विध-वेच्या—तरुण विधवेच्या—हातून जर असें कर्म झालें असतें तर तें एकवेळ घटकाभर क्षम्य मानतां आलें असतें. परंतु सर्वत्र आबादीआबाद असूनहि दुसऱ्याच्या घरावर दरोडे घालणाऱ्या ज्या अत्यंत नीच व्यक्ति आहेत त्यांना भयंकर—अत्यंत भयंकर अशी दीक्षा करणेंच जसें उचित होईल, तसें जिचा भविष्यकाळ अत्यंत उज्ज्वल अशा आशेच्या किरणांनीं देदीप्यमान झालेला आहे, आशेचे उत्तुंग व भव्य मनोरे ज्यांत शोभिवंत होत आहेत, आशेचे उज्वल मेघखंड व इंद्रधनुष्यें जिच्या भविष्य-कालाच्या आकाशांत इतस्ततः चमकत आहेत, अशा पोरीला लग्ना-आधींच शेण खाण्याची वासना झाली असतां, अशा पापी कुलकलंक बेशरम कार्टीला जितकी शिक्षा करावी तितकी थोडीच होणार नाहीं काय?

अरेरे, "आजन्म अविवाहित राहूनहि नानातऱ्हेच्या विषयोपभोगाचे विलास भोगतां येतात," अशा तऱ्हेच्या मोहक दिसणाऱ्या गप्पांनीं त्या नचि तरुणानें तुला मोहनी घातली. तुला 'मिस् चंपू,' म्हणवून घेण्याची भारी आवड! परंतु त्या 'मिस्' ह्या दोनच अक्षरांत किती अर्थ भरला आहे, याची तुला काय कल्पना? हाय! या भयंकर पातका-बद्दल तो परमात्मा किती क्रुद्ध झाला असेल, याची तुला जाणीव तरी आहे काय? पोरी, त्या परमात्म्याला फसवण्याचें सामर्थ्य तुझ्यासारख्या क्षुद्र कीटकास तर काय, पण यच्चयावत् जगांत कोणासहि नाहीं, हें तूं कसें विसरलीस? हृदयांतून निघणाऱ्या मंदमंद अशा सदसद्विवेक-

बुद्धीच्या स्वरास आपल्या पापी हास्यांत बुडवून तिचा खून—अरेरे, पोरी, तिचा तू खून केलास ना ?

पोरी, "शिक्षणामृताचे पान तुला हेच शिकवितें काय ?" म्हणून सर्व जग तुझ्या तोंडावर थुंकेल, त्याची तुला कशी लाज वाटली नाहीं ? परंतु " कामातुराणां न भयं न लज्जा " म्हणतात, त्याप्रमाणे तुला लाज कसची वाटते ? तू निर्लज्ज आहेस, बेशरम आहेस ! जारिणी, ह्या पापाची फेड तू कुठे करशील ? अरेरे, तुझ्यासारख्या पोरी एके काळीं पारमार्थिक गुणाच्या व वैभवाच्या शिखरावर वास करणाऱ्या आपल्या समाजात निघाव्यात ना ? केवढा हा अधःपात ! वसिष्ठ, वामदेव, अरुंधती, यांचेच आपण वंशज म्हणवून घेण्याची अशा समाजास लाज वाटली पाहिजे. आणि शिक्षणाचा असाच परिणाम होणार असेल, तर आग लागो त्या शिक्षणाला ! जे शिक्षण लग्न होण्यापूर्वीच नानातऱ्हेच्या अनीतिच्या मार्गास कारणीभूत होत असेल, त्यास सुशिक्षण म्हणण्यापेक्षां कुशिक्षण म्हटलेले जास्त बरें ! पोरी, आपल्या समाजांत सध्या दिसून येणारा व्याभिचार हा सुधारणेचाच द्योतक असेल तर अशा सुधारणेस काडी लावून द्यावी असें कोणास वाटणार नाहीं ? ही सुधारणा नव्हे तर कुधारणा आहे ! व कोणाहि खऱ्या सुधारकास अशा गोष्टींची चीड आल्याखेरीज कधींच रहाणार नाहीं !

प्रेमाच्या नावाखालीं अंधारांत शेण खाणारे दिवटे व दिवट्या आपल्या समाजात दिसून येतांना पाहून, ' प्रेम या शब्दाची कोण ही विटंबना ! ' ह्या विचाराने मन अत्यंत दुःखी व खिन्न होतें. अरेरे, जे प्रेम उच्च सात्त्विक भावना निर्माण करीत नाहीं, जें प्रेम अतुल नीतिधैर्य अंगीं आणत नाहीं, जें प्रेम धर्मास, समाजव्यवस्थेस व नीतिमार्गास धाब्यावर बसवून पशूसारखे कोठेंहि शेण खात हिंडतें, त्याला प्रेम म्हणण्यापेक्षा पशुवृत्ति म्हटल तर जास्त शोभेल ! !

अरेरे, पोरी, आजन्मब्रह्मचर्याने राहिलें तरच कोणचीहि व्यक्ति खरी बॅचलर अथवा व्हर्जिन होऊ शकते, हें तूं कसें विसरलीस ! चारचार पांच पांच जार उरावर घेऊन आपल्या कौमार्याचा टेंभा पाश्चिमात्य ललनांना किती मिरवायचा असेल तो मिरवू दे ! आपल्या समाजांत अशा स्त्रीची योग्यता बाजारबसवी, कुलटा, जारिणी, ह्यांच्या पलीकडे

केव्हांहि धरली जाणार नाहीं ! तसेंच ब्रह्मचर्याच्या व प्रेमाच्या नांवाखालीं कोणच्याहि समाजातले दरोडेखोर नरपशू कितीहि नाचले तरी त्याची योग्यता पशूपेक्षां केव्हांहि जास्त होणार नाहीं ! ब्रह्मचर्यव्रताचे पालन जर इतकें सोपे असते, तर कोणीहि विवाह न करतां घरोघरीं अवघे ब्रह्मचारी व ब्रह्मचारिणींचा सुळसुळाट झाला असता. पण खरें ब्रह्मचर्य म्हणजे असिधाराव्रताहूनहि कठीण, सुळावरच्या पोळीहून खडतर व लोखडाच्या चण्याहून दुस्तर आहे ! हाय ! पोरी, हें तू कसें विसरलीस ? या कामीं त्या नरपशूपेक्षा तुझ्याकडेच दोष जास्त येत नाहीं काय ? अरेरे, निर्लज्जपणें शेण खाण्यास तुझें मन तरी कसें वाहवले ? पूर्वी विष्णुपतास तू " बी. ए. झाल्यावर मग लग्नाचें पाहू. " म्हणून सांगितलें होतेस. तेव्हां तू बी. ए. होईपर्यंत खऱ्या सुधारकी मताच्या त्या तुझ्या भावानें वाट पहाण्याचें ठरविलें,यात त्याच्याकडे काय दोष ? तो तर दोन वर्षांपूर्वीच तुझें लग्न करून देण्यास तयार झाला होता ना ? मग तुझ्यानें जर आपली विषयवासना आवरून धरवेनाशी झाली तर त्याला तूं तसें कळविलें असतेंस तर त्यानें तुझें केव्हांहि आनदानें लग्न केलें नसतें काय ? ज्यानें तुला एथवर शिक्षण दिलें, तुला पूर्ण स्वातत्र्यानें वागू दिलें, ज्याची सुधारकीं मतें अशीं तुला पावलोंपावलीं ठाऊक, त्यानें तुझ्या स्पष्ट सागण्याचा यत्किंचितहि राग मानला नसता. कारण ह्या वयांत लग्नाची इच्छा होणे पूर्ण साहजिक आहे,हें त्याना ठाऊक आहे. तशी इच्छा झाली असतांहि तिला दाबून शिक्षणाचा मार्ग पुरा करण्यासाठीं यत्न करणें, हें केव्हांहि जास्त श्रेयस्कर व मानाचें आहे हें खरे. परतु तशा स्थितींत केवळ अपरिहार्य म्हणून लग्न करणेंहि मनुष्यत्वाला सोडून नाहीं. किंबहुना, त्या मानाच्या वरवरच्या झकपकीखालीं अनन्वित पापाची रास रचणाऱ्या तुझ्यासारख्या पोरीपेक्षां, योग्य कालीं व योग्य समयीं विवाह करणारी कुमारिका परमेश्वराच्या घरीं लाखों पटींनें जास्त श्रेष्ठच ठरेल ! पण ब्रह्मचर्याच्या मानाच्या भ्रामक कल्पनानीं भरारलेल्या तुमच्यासारख्या मूर्ख तरुणींस तें कसचें मानवतें ? त्यांना शेण खाणेंच रुचणार ! अरेरे, आमच्या समाजांतील मुलींचे पालक आपल्या मुलींची योग्य ती काळजी घेऊन ‘ शिक्षणामृत, ’ ‘ सुधारणा ’ इत्यादि गोष्टींबरोबरच त्यांच्या वयोमानपरत्वें इतरहि चौकशी मधूनमधून करतील व तशी

त्यांनीं न केल्यास, वाटेल तिथें व वाटेल तसे शेण खाण्यापूर्वी, आंग्ल-शिक्षणानें सजणाऱ्या प्रौढ मुली जर आपल्या पालकाच्या कानावर आपली मन:स्थिति स्पष्टपणे घालतील, तर या अनीतीच्या मार्गानें शेण खाण्याचे काहीच कारण राहणार नाहीं! चपू, तुझ्या पालकानी—विष्णुपतानीं-आपलें कर्तव्य केलें होते, पण त्याच्या विश्वासाचा फायदा घेऊन त्याच्या अब्रूस काळिमा आणण्याची-शेण खाण्याची—वासना तुला कुठून झाली कोणास ठाऊक ? बरें तर बरे, पहिल्याच अधःपाताच्या प्रसगीं मी आलों म्हणून बरें झालें. नाहींतर 'एकदां गुततां अधिक अडकतो पाशीं' ह्या न्यायानें अधःपाताच्या पुऱ्या खोल दरींत पडून तुझी काय स्थिति झाली असती कोणास ठाऊक! कारण अशींहि उदाहरणे आपल्या ह्या अधः-पतित समाजांत घडलेलीं मला ठाऊक आहेत! यापुढें तरी या तुझ्या उदाहरणावरून तुझ्या भगिनी योग्य तो बोध घेतील काय ?

चपू, या तुझ्या अक्षम्य पापाबद्दल तुला काय शिक्षा करावी—तुझ्या सारख्या पोरींना काय शिक्षा करावी—हा एक मोठा प्रश्न आहे. परंतु जर तुला कांहीं लज्जा असेल, कृतकर्माचें घोर स्वरूप डोळ्यांपुढें उभें राहून जर अंतःकरणांत पश्चात्तापाचा आगडोंब उठला असेल, तर पोरी, जन्मभर त्या पश्चात्तापाच्या अग्नींत आपलें काळेंकुट्ट मन जाळून, कृतकर्माच्या पश्चात्तापानें नयनांतून ढळढळा अश्रू ढाळून आपलें मन शुद्ध व निष्कलंक कर, म्हणजे तो दयामय परमात्मा तुला क्षमा करील! कोणच्याहि तऱ्हेचें कारण नसतां होणाऱ्या पापी आचरणाची शिक्षाहि फार खडतर असते, हें विसरू नकोस! आजन्म कृतकर्माच्या पश्चात्तापानें अंतःशुद्धि करून परमात्म्याच्या भजन पूजनात दंग रहा, व आपल्या भगिनींची सेवा करून चराचरांत नटून राहिलेल्या त्या परमा-त्म्याची पूजा कर, म्हणजे चंपे, तो दीनदयाळ तुला क्षमा करील!" एवढें बोलून महात्मा विसावा घेण्यासाठीं क्षणभर थांबला. सुमंद मारु-ताच्या लहरी वहात होत्या, धवल ज्योत्स्नेचा सडा सर्व पृथ्वीवर टाकलेला होता, शांततेचें साम्राज्य चालू होतें! चपूनें महात्म्याच्या चरणावर लोळण घेतली व त्याचे पाय अश्रूंनीं न्हाणून पश्चात्तापाच्या दाहानें कंपित अशा स्वरांत ती म्हणालीः—

"महाराज, मी आजन्म तशी वागेन. पण महाराज, तो परमात्मा

मला पापिणीला क्षमा करील का हो ? हाय,–हाय रे दैवा ! चपे, कोण ही तुझी स्थिति ! " असे म्हणून चपी ओक्साबोक्शीं रडू लागली !

" ऊठ, चपे, ऊठ ! " तो महात्मा कारुण्यपूर्ण वाणीनें तिला उठवून तिचे अश्रू पुशीत म्हणाला, "तू जर माझ्या उपदेशाप्रमाणे वागशील, तर तो परमात्मा खचित् तुला क्षमा करील ! पोरी, अशाच पश्चात्तापाच्या धारा तुझ्या नयनातून अखंड वाहू दे, जों जो पश्चात्तापाची आग तुझ्या हृदयांत भडकेल, तों तो तेथील किल्मिषे जळून जाऊन त्या परमात्म्याचे हृदय द्रवेल ! चपू, परमात्मा दयाघन व कारुण्यसागर आहे ! तुझ्यापेक्षाहि हजार पटीने पातकी अशा लोकाना त्याने, पश्चात्तापाने हृदयाचा भडका करून त्यांत स्वतःस जाळून घेतल्यामुळे, क्षमा केली आहे ! "अगा नांवे घेता वोखटी । जे आघवेया अधमाचिये शेवटीं । " अशा लोकांनाहि त्यानें क्षमा केली आहे ! चपू, तूं अशी अस्वस्थ का होतेस ? सर्वांचा आधार तो परमात्मा आहे ! जगांत असे एकहि पातक नाहीं, कीं ज्याबद्दल पुरापुरा पश्चात्ताप झाल्यावर त्या परमात्म्याने त्याची क्षमा केली नाहीं ! मी तुला सागत असलेली शिक्षा तुझ्यासारख्या पोरींच्या बाबतींत समाजाने अमलात आणली पाहिजे— अत्यत निष्ठुर मनानें तिची अम्मलबजावणी केली पाहिजे–तरच हा अनीतीचा मार्ग थांबणार आहे, तरच ही शेण खाण्याची वासना नाहींशी होण्याची आशा आहे ! नाहींतर, कितीहि शेण खाल्लें–काहींएक कारण नसता लग्नापूर्वी कितीहि शेण खाल्ले–तरी, कधीं कधीं तर ' कानीन ' पुत्रासह लग्नें होतातच आहेत, 'सहोढा' दृष्टीस पडतातच आहेत, चैनींत व उपभोगांत काहीं कमतरता येत नाहीं, असें पाहून, इतरही पोरींना त्यापासून एकप्रकारचें उत्तेजन येणार आहे–निदान, 'खपतें आहे,' ' हरकत नाहीं, ' असें वाटणार आहे; आणि ही स्थिति केव्हांहि इष्ट नाहीं ! तेव्हा अशा पोरीशीं प्रथमवर, बिजवर, कोणीहि लग्न न लावतां तिला कृतकर्माचा पश्चात्ताप करण्याची पाळी आणली पाहिजे व याप्रमाणें पश्चात्तप्त मनाने ती राहू लागल्यावर मग मात्र तिला हिडिसफिडिस करू नये. यावर कोणी असें म्हणेल कीं, अशा मुलींची लग्नें न केल्यास त्या अधिकच अपःपात पावतील. पण त्यावर उत्तर इतकेंच कीं, अशा व्यभिचारी कुमारिकाचीं लग्नें करून त्यांचा

असाच सतत प्रवाह चालू देण्यापेक्षां—( आणि तसें करण्यानें आपण त्या कामीं अप्रत्यक्ष मदत कशी करीत असतो हें वर आलेच आहे—) एकदम असा नियम अमलात आणल्यास–निदान तसा तो आणण्याचा अटोकाट यत्न केल्यास–अशा अनीतिच्या आचरणास कायमचा आळा तरी पडेल, मग आहेत त्यांत काय ज्याचा अधःपात होईल तो होईल. तो एकवेळ पुरवला. पण त्याची ही कायम परंपरा नको. दयामय हृदयाने ऑर्फनेजेस् उघडून अनीतिच्या मार्गास मात्र त्याने अप्रत्यक्ष मुक्तद्वार मिळवून दिल्यासारखे झालें आहे, हे ज्याप्रमाणें त्या ऑर्फनेजवाल्यानीं विसरतां कामा नये, तशीच गोष्ट जवळ जवळ इथेंहि आहे. अपात्रीं, अस्थानीं दयेचा व नीतिचा ज्यावेळीं झगडा सुरू होतो, त्यावेळीं नीतीच्या पालनासाठीं प्रसंगीं वज्राप्रमाणे हृदय कठोरहि करावें लागतें! "मऊ मेणाहूनि आम्हीं विष्णुदास। काठिण वज्रास भेदू ऐसे! ॥ भले तरी देऊ नेसूची लगोटी। नाठाळाचे पाठीं हाणू सोटा! ॥" असें तुकोबानीं म्हटलें आहे, त्याचाहि अर्थ हाच आहे! असो. तर चंपू, तू आजन्म मी सांगितल्याप्रमाणें वाग. तुझ्यावर मी कृपा करून ह्याबद्दल कोणापाशींहि कांहीं सांगत नाहीं. बरें तर, आता बराच उशीर झाला. चल,तुला आपल्या घरीं पोंचवून मला आपल्या मुक्कामास गेले पाहिजे!" असें म्हणून तो योगी उठलाच व " तो परमात्मा मला खचित क्षमा करील " ह्या विचारानें डोळे अश्रूनीं भरून आलेली व त्यातल्यात्यात ह्या भावनेनें समाधानाची छाया चेहऱ्यावर दिसणारी चंपू त्याच्या मागून चालू लागली! लवकरच ते घरापाशीं येऊन पोहोंचले. " बरे तर, येऊं मी आतां ? " असे म्हणून तो महात्मा निघाला! चंपूनें त्याच्या पायावर पुन्हां मस्तक ठेवले, तों तिच्या पाठीवर दोन अश्रुबिंदु पडले! " कल्याण, चंपी, तुझे कल्याण होवो, व तो परमात्मा तुझी इच्छा पुरी करो! बरें, जातो अ मी ? " असे म्हणून तो योगी पहातां पहातां दिसेनासा झाला!

## प्रकरण १९ वें.

# खरी ईश्वरपूजा.

आमच्या दिव्य अलौकिक योगी महात्म्याचा हळूंहळू सर्वास परिचय झाला. कृष्णाबाईस त्यानी केलेल्या दिव्य उपदेशाप्रमाणे ती साध्वी निश्चयानें वागू लागली. तिनें एके दिवशी बोलतां बोलता सहज लीलाताईला त्या योग्याची ओळख करून दिली. त्याचे तें दिव्य अतर्ज्ञान व निष्काम परोपकाराचें व्रत, यामुळे सर्व मंडळींच्या मनात त्याच्याविषयीं कृतज्ञता वास करू लागली. ललिनें मुद्दाम येत्या व्याख्यानाचे प्रसगीं " आपला अमोल उपदेश भगिनीवर्गास व तद्द्वारें सर्व समाजास करावा " असा निरोप त्र्यंबकेश्वरीं त्यास पाठविला व त्यानेंहि आनदानें येण्याचें कबूल केले. व्याख्यानाचा विषय " खरी ईश्वरपूजा " असा होता !

ती सायकाळची वेळ होती. दिनमणि आपलें नित्यकार्य आटपून पश्चिमावधूगृहीं क्षणभर विश्राति घेण्यासाठी श्रांत होऊनसे बसले होते ! श्रमाच्या थकव्याची लाली जरी प्रथम त्याच्या मुखमडलावर विलसत होती, तरी साध्वी पश्चिमेच्या प्रेमपूर्ण स्वागताने लवकरच तिचे अनुरागरंगांत परिवर्तन झाले ! शिरस्त्याप्रमाणें सर्व रमणीगण " अबलोन्नति कार्यालया"तल्या भव्य पटांगणात स्थित झाला होता. महात्मा योगी, लीला, वेणू, कृष्णाबाई इत्यादि तिथेच प्लॅटफॉर्मवरील खुर्च्यावर स्थित झाली होती. नतर प्रथम लीला त्या महात्म्याचा परिचय करून देण्यासाठीं उठली. टाळ्याचा कडकडाट झाला. लीला म्हणालीः—

" भगिनींनो, आज आपणास एका अलौकिक महात्म्याचें अधिकारयुक्त भाषण ऐकण्यास सांपडणार आहे, तेव्हा आज आपलें भाग्य फारच मोठें आहे व याबद्दल त्या महात्म्याचे व परमेश्वराचे आपण फार उतराई आहोंत. या ठिकाणीं जरी केवळ स्त्रीजातीच्या उन्नतीसाठीं केवळ स्त्रियांच्याच प्रयत्नानें कार्य करण्याचा आमचा मानस—विचार—आहे, तरी आज आपणास लाभलेल्या विभूतीसारख्या विभूतींनाहि न अगीकारण्याइतका खचित् हा समाज हतभागी नाहीं अथवा दुराग्रहीहि नाहीं. असो. आजचा विषय " खरी ईश्वरपूजा " असा आहे व

त्यासाठीं मी महात्म्याना आपणांस चार उपदेशामृतबिंदु पाजण्यास नम्र विनति करते!" असें म्हणून लीला खालीं बसली. नतर टाळ्यांच्या कडकडाटात महात्मा बोलावयास उभा राहिला! त्याचा तो दिव्य तेजः-पुज देह, त्यावरील ते सात्त्विक तेज, इत्यादिकानीं सर्व श्रोतृवृंदास त्याच्याविषयीं आदर उत्पन्न झाला! महात्मा बोलू लागलाः—

" मातांनो व भगिनींनो, तुमच्या स्वरूपाने नटणाऱ्या त्या जगज्ज-ननीस माझा अन्य नमस्कार असो! आजचा विषय नुक्ताच माझ्या भगिनींनी—लीलाताईंनी—आपणांस कळविलाच आहे. त्यांनीं माझी जी स्तुति केली ती त्यांच्या थोरपणाची द्योतक असून माझ्या अगच्या गुणाचे तें वर्णन नव्हे! असो.

भगिनींनो, ' खरी ईश्वरपूजा ' म्हणजे काय? खरी ईश्वरपूजा एखादी परमेश्वराची धातूची मूर्ति घेऊन त्याची तासचे तास पूजा करीत बसणें नव्हे. ती केवळ खऱ्या पूजेची एक पायरी अथवा साधन आहे, साध्य नव्हे, हे तुम्ही विसरू नका. त्या पूजेनें हळूहळू त्या सच्चिदानद प्रभूची अतर्बाह्य व्याप्ति कळून आली,तरच त्याचें सार्थक्य. जी देवपूजा सर्वात्म-भाव शिकवीत नाही, ती खरी देवपूजाच नव्हे. ईश्वराची पूजा, आरा-धना, भक्ति याचा सताचा अर्थ कांहीं निराळाच आहे. तुकोबा सांग-तातः——

" कोणाहि जिवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥ "

विवेकानदाचाहि हाच मॉटो—ब्रिदवाक्य—असें कीं:—

"From me no danger be to aught that lives "

ज्ञानोबाहि सांगतात कीं:—

" जें जे देखिजे भूत। तें तें मानिजे भगवत।

हा भक्तियोगु निश्चित। जाण तू माझा ॥ "

तसेचः—

" भूतमात्रीं हरिविण। न पाहेंचि दुजेपण।

या नांव लक्षण। साधकाचे ॥"—असे रामदासहि म्हणतात. स्वामी रामतीर्थहि हाच उपदेश आपलें " यज्ञाचें रहस्य " ह्या व्याख्यानांत करतात! ते म्हणतात कीं, " नुसत्या अग्नीमध्यें आहुति टाकण्यापेक्षा भुकेनें व्याकुळ झालेल्या हजारों दीनदुबळ्या चालत्या बोलत्या ईश्वराच्या

लेकरांच्या जठराग्नीचा दाह शमाविल्यानेच परमात्मा खरा सतुष्ट होतो !" विवेकानदहि सागतात कीं, " बाबांनो, तुम्हांला ईश्वर भेटावा अशी इच्छा आहेना ? तर मग ह्या चालत्या बोलत्या ईश्वरास तुम्हीं आधीं संतुष्ट करा !" जीझस ख्राइस्टचाहि असाच उपदेश आहे कीं, " ईश्वर भेटण्यास आपल्या बधूवर प्रीति करा. " एका आधुनिक विद्वान् लेखकाचेहि उद्गार असेच आहेत कीं.—" परमेश्वरपूजा म्हणजे मूर्तिपूजा नव्हे, योगासन नव्हे, किंवा तर्थाटण नव्हे, तर परोपकारकर्म–पवित्र कर्म–प्रेमकर्म, वीर्य-कर्म. धर्माचें बजि प्रेमात, सर्व भूतांविषयीं आत्मभावात आहे. " एकनाथ महाराजहि श्रीकृष्णाचें वचन सागतात कीं:—

" सर्वभूतेषु यः पश्येत् भगवद्भावमात्मनः ।
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥ "

प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण अर्जुनास सागतात, अर्जुना–

" आत्मौपम्येन सर्वत्र सम पश्यति योऽर्जुन ।
सुख वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः॥"

"रामसुधें"तलि एक अमोलिक वचन असेच आहे कीं:—

" प्रार्थना करणाऱ्या हातांपेक्षां मदतीसाठीं धावून जाणारे हात कितीतरी पटीनें श्रेष्ठ आहेत ! "

याप्रमाणें, माझ्या भगिनींनो, अशा तऱ्हेचीं साधुसतांचीं शेकडों वचनें काढून देता येतील कीं, त्यात खऱ्या ईश्वरपूजेचें हृद्गत, रहस्य, व खूण त्यांनीं सांगितली आहे. ती रामतीर्थांच्या " रामरहस्या " तलि दिव्य वाणीनेंच मी आपणास आता सागतों. ते म्हणतात:—

" भक्ति म्हणजे ईश्वराच्या नावानें नुसते ओरडणें नव्हे. भक्ति म्हणजे भिक्षांदेहीची वृत्ति नव्हे. तसेंच भक्ति ही कांहीं अभावात्मक स्थिति नाहीं ! भक्ति याचा अर्थ समत्वभावाची अनिर्वचनीय स्थिति, ज्ञानयुक्त प्रेममयता, आणि ईश्वरी प्रेमाची दिव्यता असा आहे ! सर्वत्र त्या पूर्णाचें––त्या परमात्म्याचे दर्शन होणे, ज्या ज्या ठिकाणीं आपले नेत्र जाऊन पोहोंचतात त्या त्या ठिकाणीं आत्मतत्त्व प्रतीत होणें, अखिल चराचरांत ऐश्वर्यभावाचे सौंदर्य अनुभवास येणें ही त्या भक्तीची खूण आहे ! तदहमस्मि, तत्त्वमसि ! " अहाहा, भगिनींनो, हा उपदेश किती प्रेमळ, सुदर, उदात्त व स्फूर्तिदायक आहे बरें ! या उपदेशाप्रमाणें जर अखिल

मानवजात चालेल तर मारामाऱ्या, दगेधोपे, लढाया, खून, रक्तपात, यांचे या जगांत नावही ऐकू येणार नाहीं! परंतु या जगात सज्जनाप्रमाणेच दुर्जनाचाहि वास आहे हें विसरून चालत नाही, व याचसाठीं या केवळ तात्त्विक, उच्च, अशा नितांत स्वर्गीय प्रदेशातून खालीं उतरून प्रत्यक्ष व्यवहारात खऱ्या ईश्वरपूजनाचे मार्ग काय आहेत, हें आपण आता पाहू या!

माझ्या भगिनींनो, ज्याला practical philosophy म्हणतात, त्या व्यावहारिक तत्त्वज्ञानासाठींच प्रामुख्याने गीताग्रंथाचा अवतार आहे व हा प्रश्न ह्या उज्ज्वल ग्रंथात जितका उत्कृष्ट रीतीनें सोडविला आहे तितका जगांत दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाने सोडविला नाहीं! "कोणच्याहि स्थितींत असलांत—साधक, सिद्ध, मुमुक्षु, ज्ञानी इत्यादि कोणच्याहि स्थितींत असलांत—तरी निष्काम, निरहंकार, निःस्वार्थी बुद्धीनें, कर्तव्य म्हणून कर्तव्यकर्म करा—म्हणजे परंपरेनें लोकसंग्रह करा—हीच उत्कृष्ट भक्ति गीतेंत सांगितली आहे" असें महात्मा टिळकानीं सर्व गीतेंचें सार काढलें आहे, तें किती यथार्थ व सुंदर आहे बरें! त्याप्रमाणें जर प्रत्येक मनुष्य चालेल, तर क्षणार्धांत पृथ्वीचा स्वर्ग बनेल—हिंदुस्थानच्या भाग्योदयाचा प्रश्न हां हां म्हणता सुटेल!

प्रत्येकानें निरहंकार व निःस्वार्थ बुद्धीनें कर्तव्यकर्म बजावीत राहणें, यांतच खऱ्या ईश्वरपूजेचें रहस्य आहे! तें कसें, तें प्रत्यक्ष परमात्मा श्रीकृष्ण अठराव्या अध्यायांत उत्कृष्ट रीतीनें सांगतात. ते म्हणतात, अर्जुना,—

"स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तत् शृणु॥
यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततं।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः॥"

भगिनींनो, याप्रमाणें प्रत्येकानें आपलें कर्तव्यकर्म बेशक करीत रहावें, म्हणजे त्यानेंच परमात्मा संतुष्ट होऊन अतीं चिरसौख्याची प्राप्ति होते. कर्म कोणचें, अकर्म कोणचें, कर्तव्यकर्माची मीमांसा काय, असे पेच मनुष्यास व्यवहारांत हमेष येतात व त्यापुढें मोठमोठे कवीहि 'मोहित' होतात; यासाठीं "तत्तेकर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसे ऽ

शुभात्" असे म्हणून भगवतानीं त्याची केलेली मीमांसा वाचून सर्वांनीं निःशंक चित्तानें "जो जो भागासि आला व्यवसाय" तो उत्कृष्ट रीतीनें पार पाडावा! अशा रीतीने चातुर्वर्ण्यकर्माची उत्कृष्ट व्यवस्था लावून समाजाच्या ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा भगवतानीं जो हृदयंगम मिलाफ घालून दिला आहे, त्याची कोठवर स्तुति करावी!

भगिनींनो, शेवटीं एकाच मुद्याचें स्पष्टीकरण करून मी आपली रजा घेणार आहे. तो म्हणजे सर्व भूतमात्रांवर प्रेम करणे व त्यांपैकीं अनाथाच्या मदतीस धावून जाऊन दुष्टाचे निर्दालन करणे या दोन गोष्टींच्या वरवर दिसणाऱ्या विसंगततेचा निरास. भगिनींनो, या कामीं आपण थोरांचाच कित्ता गिरवू या. कारण "यद्यादाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः। स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते" असें भगवताचेंच वचन आहे. भगवतांच्यापेक्षा काहीं कोणी श्रेष्ठ नाहीं, तेव्हा त्याचेंच अवतारकार्य म्हणजे "परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्" असें असतें, हें लक्षात ठेवले पाहिजे. 'सर्वांवर आपल्यासारखे प्रेम करण्याचा' उपदेश करणाऱ्या प्रत्यक्ष भगवताच्याच वर्तनांत केवढा हा विसंगतपणा असें कित्येकास वाटण्याचा संभव आहे, व तो वरवर पाहता एका अर्थी यथार्थहि आहे. कारण इकडे म्हणायचे कीं, "समोऽहं सर्वभुतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः" आणि लगेच दुसरीकडे म्हणायचे कीं, "प्रियो हि ज्ञानिनोत्यर्थं अहं स च मम प्रियः" आणि "तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान्। क्षिपाम्यजस्रमशुभां आसुरीष्वेव योनिषु॥" इ. हें वर्तन विसंगत वाटण्याचा संभव आहे. पण त्याचा मेळ 'सम' या शब्दाचा अर्थ लोकमान्याच्या प्रमाणें दुसऱ्या म्हणजे व्यावहारिक तऱ्हेनें घेतला, म्हणजे बरोबर बसतो. या दृष्टीनें ज्ञानेबादिकांनीं जें त्याचें "जो खांडावया घावो घाली" इत्यादि तऱ्हेचे फारच बहारीचें तात्त्विक विवेचन केलें आहे, ते अग्राह्य मानावें लागते!

श्रीकृष्णाचा अर्थ म्हणजे एखादा तडफदार, न्यायी 'रामशास्त्री' जसा म्हणेल कीं, "मला सगळे सारखेच आहेत, हा आपला, अन् हा परका, असा माझ्या इथें भेद नाहीं, अन्याय दिसला कीं ठेचायचा, न्यायाने वागेल तो आम्हाला प्रिय. आम्हाला सगळे सारखेच!" तसा

आहे. त्याचा अर्थ इतकाच की, " मंडळीशीं वागण्याचा जो एक नियम—सज्जनांचें अवन व दुर्जनाचे शासन—ठरला, त्याप्रमाणेच मी सगळ्याशीं वागत असतो. त्यात मग मला भेदाभेद नाहीं." आणि हाच खरा अर्थ आहे व दयेचाहि हाच खराखरा अर्थ आहे असें तुकोबाहि सागतात ! ते म्हणतातः—

" दया तिचे नाव भूताचे पाळण । आणिक निर्दळण कटकांचें ! ॥
धर्मनीतीचा हा ऐक व्यवहार । सागतसे सार निवडोनि ! ॥ "

ह्याच खऱ्या अर्थाचा धडा परमात्मा युगायुगाचे ठायीं अवतार घेऊन घालून देत असतो व तुकोबा, समर्थ, इत्यादि कांहीं साधुसंतांस तो पटलाहि आहे. कारण " नाठाळाचे पाठीं सोटा " हाणण्यास प्रसगीं " कठिण वज्रास भेदू ऐसें " व्हावें लागतें, हें तुकोबा कधीं विसरले नाहींत ! रामदासांची तर गोष्ट बोलायलाच नको !—त्याचा चरित्रक्रमच त्याच्या उपदेशाची साक्ष देत आहे ! परतु भगिनींनो, ह्या परमात्म्याच्या उपदेशाचा अर्थविपर्यास होऊन कांहींकांची दिशाभूल झाली, व दुसरा एक 'नाथ पथ ' निघाला, आणि त्या पथाने—अथवा खरें पाहता याहि पथाच्या मताच्या विपर्यासानें—आमचे जितकें नुकसान केलें आहे, तितके कदाचित् पहिल्या प्रतीच्या सतानी हितहि केलें नसेल ! कारण घर बाधायला वर्षभर लागतें, पण तें पाडायला एक दिवसहि लागत नाहीं! अरेरे ! कोण ही भयकर दिशाभूल ! परतु भगिनींनो, यापासून आपण सर्वांनीं सावध राहून परमात्म्याच्या, व त्याच्या खऱ्या उपदेशाप्रमाणे चालणाऱ्या महात्म्याच्या पावलावर पाऊल ठेवून जाऊ या, आपलीं कर्तव्यकर्मे आपण चोख बजावूं या, म्हणजे तीच खरी ईश्वराची पूजा होय ! एवढें सागून व शेवटीं माझ्या प्रिय भगिनी लीलाताईनीं चालविलेल्या ह्या स्तुत्य उद्योगाने खरोखर तो परमात्मा फारच सतुष्ट होत आहे, ईश्वर त्याना असेच स्वकार्यात अधिकाधिक बळ देवो असें चिंतून, मी आपली रजा घेतो !" असें म्हणून तो महात्मा टाळ्याच्या कडकडाटात खालीं बसला ! श्रोतृवृंदांत त्याच्या ओजस्वी भाषणाची स्तुति होऊ लागली ! नतर एकदोन किरकोळ वक्त्यांचीं भाषणें झाल्यावर आभार प्रदर्शन होऊन समारभ खलास झाला, व रमणीगण आपापल्या घरीं जाता झाला.

## प्रकरण २० वें.

# नीतिमत्तेची कसोटी!

गणपतरावांनीं खुद्द नाशकास असलेल्या आपल्या एका वाड्यामध्यें "रुग्णालय" स्थापिलें होतें व त्या घरापासून जवळच एक टुमदार बंगला बांधून त्यातच ते बहुतेक काळ रहात असत. रात्रीच्या वेळींहि तेथेंच ते निजत असत, कारण "रुग्णालयां"त बाराहि मास असणाऱ्या गरीब अशा रोग्यांपैकीं कोणास केव्हा जरूर लागेल याचा नेम नसे.

रात्रीचा अकरा वाजण्याचा सुमार झाला होता. रोग्यास लागणाऱ्या औषधपाण्याची सोय करून वेणूला तेथेंच आज एका कॉटवर डुलकी लागली होती. गणपतराव एकटेच आपल्या नजीकच्या बंगल्यांतील टुमदार उद्यानात रात्रीची शोभा पहात एका कोचावर पडले होते. निर्मल नीलाकाशातून सुधांशूच्या रजतसदृश ज्योत्स्नेचा प्रवाह अविपरतर्णे पृथ्वीतलावर वहात होता! उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें निशाकालीन मंद शीतल समीरण सकल गात्रांस सुखवीत होता, उद्यानातील वृक्षराजीस व लतापल्लवांस डोलवीत होता! सर्वत्र शांत निस्तब्धतेचा वास होता. अद्यापिहि उष्ण काळामुळें जागृत असणाऱ्या गांवातील मंडळींचा भजनगायनादिकाचा दूर असा ध्वनि ऐकू येत होता!

इतक्यात रंगाजी त्या उद्यानात शिरली व धावत धांवत येऊन प्रथम तिनें गणपतरावास दृढालिंगन दिलें!

"प्रियकरा," ती म्हणाली, "आपण ह्या पायाच्या दासीची मनीषा तृप्त कराना? अहाहा, लावण्यसुंदर तरुणा, आज ह्या सबंध नाशिकक्षेत्रांत ही रंगाजी कोणास भाळली नाहीं, पण मदनमोहना, तुझ्या लावण्याकडे पाहून मात्र माझ्या जिवाला सारखी तळमळ लागून राहिली आहे. प्रियकरा, तात्यासाहेब माझ्याकडे येतात, म्हणून तुम्हांला माझा तिटकारा वाटत असेल. परंतु प्राणसख्या, माझे पंचप्राण खरेखरे तुलाच वाहिले आहेत! तात्यांच्यासारखीं बाहुलीं खेळवणें ही आमची नीतीच आहे. पण सुंदर तरुणा, माझ्या जीवाचें पाणी तूंच एकट्यानें केलेंस! मी किती दिवस तरी संधि पहात होतें. शेवटीं आज तो योग लाभला. अहाहा,

गणपतराव, ह्या चंद्रप्रकाशांत तर तुम्ही कितीहो सुंदर दिसतां ! प्रिय-करा, मला एकदा आलिंगन देऊन सुख दे ना ? मी तुझ्यावर किती मोहित झालें आहे, मदनानें माझे पंचप्राण किती व्याकुळ होत आहेत, याची तुला काय कल्पना ? सुंदर तरुणा, मला एकदा सुखीव ना ? लाडक्या, अहाहा, तुझा स्पर्शसुद्धां किती मृदु व गोड आहे !''

गणपतराव खरोखरच फार सुंदर होते ! त्यांचा तो सुंदर गौरवर्ण, तें त्यांचें मदनमोहन मुखकमल, व त्याचा तो गोंडस बांधा फारच रमणीय होता ! रंगाजीच्या सौंदर्याची कल्पना आम्हीं आमच्या वाचकांस एकदां दिलीच आहे. आज तिचा एकंदर थाट म्हणजे एखाद्या योग्याची तप-श्चर्या ढळवावयास निघालेल्या अप्सरेसारखा होता ! सौगंधिक तेलानें तुकतुकीत दिसणाऱ्या केशपाशाची तिनें फारच मोहक रचना केली होती, व त्यांत सौगंधिक पुष्पांची वेणी घातली होती ! अत्यंत विरविरीत असें गुलाबी पातळ तिनें परिधान केलें असून, आलिंगनाच्या भरांत तिचा पदर खांद्यामागें गेला होता! ललनेच्या कमनीय देहलतिकेचा पाश तारुण्याच्या ऐन ज्वानींत व त्यांतहि विधुरावस्थेंत असणाऱ्या युवकाभोंवतीं पडला होता ! कोण तो भयंकर प्रसंग ! नितांतसौंदर्यानें जगास वेडें करणाऱ्या रमणीच्या कोमल बाहूंचा पाश देहाभोंवतीं पडला असतां तो तोडण्याचें कार्य किती दुर्घट आहे, याची कल्पना तसा प्रसंग ज्यावर आला असेल त्यासच होणार आहे ! वेदांताच्या लब्यालब्या गप्पा ठोकणारे लोकांपैकीं अशा भयंकर मोहिनीच्या प्रसंगीं कितीजण न डागळतां पार पडत असतील, याची वानवाच आहे ! कनकाची रास आणि सुंदरीचा विलास यांनीं ज्याचें चित्त विचलित होत नाहीं तोच खरा साधु, असें तुकोबांचें जें वचन आहे, तें किती यथार्थ आहे, हें अशा ठिकाणीं प्रत्ययास येतें ! कनककांतेची मोहनी सर्व जगावर थैमान घालीत असतां त्यांतून सुख-रूपपणें सुटणारे वीर हाताच्या बोटावरच मोजावे लागतील आणि ह्यांनाच खरे वीर ही संज्ञा शोभते ! असे वीर ह्या जगांत फारच थोडे दृष्टीस पडतात. बाकीचे सर्व ' वीर ' मेनकेच्या क्षणैक चुंबनासाठीं आपल्या तपश्चर्येचें दिवाळें काढणाऱ्या—त्या तपश्चर्येवर तिलांजली देणाऱ्या विश्वामित्राच्या, अथवा कोळ्याच्या पोरीशीं संगोत्सुक झालेल्या परा-शराच्या, किंवा अरेरे, ह्या कामाच्या पायीं प्रत्यक्ष आपल्या सुनेवरहि

पापी नजर ठेवणाऱ्या ब्रह्मनिष्ठ वसिष्ठांच्याच कोटींतले ! अरेरे, केवढी ही जबरदस्त मोहिनी ! ह्या मोहिनींतून पार पडून आपल्या उज्ज्वल तेजानें चमकणारे हिरे फारच थोडे. पण तेच खरे हिरे! एकट्या मदनाचा केवढा हा प्रताप ! ह्या प्रतापाचे नाथानीं " एडका मदन ! । तो केवळ पचानन! ॥ " ह्या पद्यात फारच सुदर रीतीनें वर्णन केलें आहे ! अशा रीतीनें ज्यांनीं षड्रिपू जिंकले,'सहा धुतले' तेच खरे साधु होत! ब्रह्मपदावर नाचण्याच्या गोष्टी सोप्या नाहींत. त्याला लोखडाचे चणे खावे लाम-तात, अनेक अग्निदिव्यांतून पार पडावें लागतें, " वैरियाचा दुस्तर घाट " चढतां चढतां जीव मेटाकुटीस येतो, " नुलघवे मज न सांपडे वाट " अशी स्थिति होऊन जाते, अनत मोहांच्या मोहिनीनें दृष्टि दिपून जाते, वृत्ति बावरते, चित्त गांगरतें, इद्रियें त्या मोहनीकडे धांवू लागतात व बहुतेकांचा अवःपात—उदात्त का होईना, पण अधः-पात होतो, न्यायनीतीचा विसर पडतो, सदाचार आठवत नाहींसा होतो !

परतु आमचा गणपतराव कच्च्या गुरूचा चेला नव्हता. तारुण्यानें मुसमुसणाऱ्या त्या युवकाभोंवतीं त्या सौंदर्यखनीनें आपल्या सौंदर्य-सर्वस्वाची भयकर मोहनी टाकली असतां अनाचार, अनीति ह्यांच्या कल्पनांना तो विसरला नाहीं. उलट अत्यत शुद्ध मनाच्या त्या तरुणानें, आलिंगनाचा तिचा पहिला बहर ओसरल्यावर, तिला अत्यत शांतपणें दूर केलें, तिच्या कमनीय बाहुपाशातून आपणास मोकळें केलें व तो तिला शांतपणें म्हणालाः—

" रगाजी, आज हें तू काय आरभिलें आहेस ? शंभर ठिकाणीं शेण खाणाऱ्या बाजारबसवे, तुझ्या कामचेष्टांनीं, तुझ्या आलिंगनानीं, तुझ्या नयनकटाक्षांनीं, व तुझ्या अनुपम लावण्याने, दिङ्मूढ कर-णाऱ्या सौंदर्यानें मी तुला मोहित होईन असें कां तू समजलीस ? परतु रगाजी, ही तुझी नुसती भूल आहे. पण्यांगने, हा गणपतराव कधींहि अनीतिमार्गाचें आचरण करणारा नव्हे, हे तू कसें विसरलीस ? पण जा, मी तुला एकवेळ क्षमा करतों ! तुझ्या सबधानें मी कुणापाशींहि उच्चार करीत नाहीं. परतु पुन्हां मला त्रास देण्याच्या भानगडींत मात्र पडू नकोस ! "

" असें काय हो गणपतराव? लाडक्या, एकदां माझा कामदाह शांत करना? सुंदर तरुणा, नको रे माझा अव्हेर करूस!—हाय !" असें म्हणून ती त्याच्या अंगावर पडली—नव्हे,पुन्हां तिने त्याला दृढालिंगनच दिलें! पुन्हा तोच प्रसंग येऊन ठेपला! रात्रीचा बारा वाजण्याचा सुमार झालेला! सगळीकडे शांत निस्तब्धतेचा वास होता. आकाशातून पौर्णिमेचा चंद्र व त्याच्या तारारमणी हा देखावा अधीरपणें पहात होत्या! वाराहि जणू काय,पुढे काय होते हें पहाण्यासाठीं क्षणैक वाहण्याचा थांबला! कोण ती जबरदस्त मोहिनी! तारुण्याच्या बहरात असणारे दोन प्राणी. पण अरेरे, एक आपला देह क्रयविक्रयासाठीं भर बाजारात उघडा ठेवून समाजास व स्वतःच्या आत्म्यास अधोगतीस नेण्यास प्रवृत्त झालेली,—सुंदर पण हिडिस रंडा, आणि दुसरा तारुण्याचा उन्माद नसानसातून खेळत असताहि त्यास अयोग्य मार्गानें न जाऊ देण्यासाठीं धडपडणारा सात्विक वीर! आकाशस्थ ताराररमणी त्या रांडेच्या वेड्या प्रयत्नाकडे पाहून हसू लागल्या. 'गणपतराव आपणास वश होईल ही कोण हीं इची भूल?' असें म्हणूनच कीं काय त्या हसत होत्या! त्यांचा प्रियकरहि त्यांचें अनुकरण करीत होता. गणपतरावांनींही त्या मोहिनीस दूर करून तिला तेंच सांगितलें व निश्चयाच्या स्वरानें तिला तेथून निघून जाण्यास आज्ञा केली! व ती निघून गेल्यावर ते आनंदानें बंगल्यांत जाऊन निजले व लवकरच शांत निद्रावश झाले!

* * *

पण त्याच वेळीं इकडे आपल्या रंगमहालांतील आरशासमोर उभे राहून आपल्या नितांतरमणीय सौंदर्याचें वीक्षण करीत रंगाजी बोलत होतीः—

"अहाहा, किती हें माझें मोहक सौंदर्य! एखाद्या योग्याचीहि समाधी ढळवितील असे हे माझे नयनबाण, भ्रमरासहि लाजित करील असा हा माझा कुरल केशपाश,देवहि चुंबन घेण्यास धावतील असे हे माझे कपोला-वरील गुलाब, शुक्राचार्यांचेंहि ब्रह्मचर्य गळून पडेल असें हें माझें कमनीय उन्नत वक्षःस्थल,—अरेरे, अरसिक तरुणा, याचा अव्हेर करून तू माझा धिक्कार केलास काय? मला उलट नाहीं नाहीं तसें बोलून या नागिणीला

तू डिवचलेंस काय ? पण खूप लक्षांत ठेव कीं,ही नागीण तुला चांगलाच दंश केल्याशिवाय रहाणार नाहीं !" याप्रमाणे रंगाजी नागिणीचे फूत्कार चालू होते ! तिच्या एकदोन दासी खालीं निजल्या होत्या. त्या गाढ-निद्रेत मग्न होत्या.वर ती एकटीच होती.इतक्यात घड्याळांत साडेबाराचा ठोका पडला व ती स्वतःशीच हसली. तिने आपला पोशाक उतरून ठेवला व " याचा मी चांगलाच सूड घेईन ! " असें काहींसें पुटपुटत ती निजावयास गेली व लवकरच निद्रावश झाली ! अरेरे, रंगाजी, हेच का तुझे प्रेमाचे बोल ? आग लागो तुझ्या त्या बाजारबसव्या प्रेमाला !

## प्रकरण २१ वें.

## नागिणीचा दंश !

मागील प्रकरणातील हकीकतीस चारपाच दिवस लोटले. सध्यां सात आठ दिवस वऱ्हाडच्या जमिनींच्या उत्पन्नाच्या वसुलीच्या बाबतींत भानगड उपस्थित झाल्यामुळें तात्या गांवीं नव्हते. ते जाऊन आले. आपल्या प्रिय रंगाजीची कधीं एकदा गांठ घेईन असें त्यास होऊन गेले होतें. अर्थात् ही संधि आपल्या सूडाच्या कपटनाटकास ठीक आहे, असें त्या चतुर वारांगनेनें तेव्हांच ताडले !

रात्रीं अकरा वाजण्याचा सुमार झाला होता. तात्यांस रात्र कधीं होईल असे झाले होतें. अकरा वाजल्याबरोबर ते तडक रंगाजीच्या माडीकडे निघालेच. तात्या सध्यां रंगाजीच्या मोहपाशात बद्ध होऊन ती नाचवील तसें नाचणारें एक बाहुले बनले होतें! तिच्या पायीं त्यांनीं अर्धीअधिक संपत्ति उधळली होती ! तिच्या गोड मिठ्ठास भाषणानें मोहून गेलेले तात्या अधःपाताच्या पायऱ्यावरून घसरत घसरत लवकरच पुरे कंगाल बनणार होते, पण त्याची त्याना शुद्धहि नव्हती ! आपल्या प्यारीचें आपणावर निरतिशय प्रेम आहे,ह्या विचारांतच ते सदा रंगलेले असत, आणि रंगाजीहि त्यास त्या रंगांत सदैव डुबत ठेवण्याची पूर्ण खबरदारी घेई! पण आपल्या प्यारीच्या रंगमहालांत ते येऊन पहातात

तों काय ! रंगाजी अस्ताव्यस्त अशी पलंगावर पडलेली आहे, तिचा पदर एकीकडे जाऊन तिचें उन्नत वक्षःस्थल मोहकपणें दृग्गोचर होत आहे, अलकपाश अस्ताव्यस्त असा विखुरला आहे, आणि उशीमध्ये मुखचंद्र दडला आहे, असें त्यास दिसून आले ! हा सर्व देखावा पाहून तात्या घाबऱ्या घाबऱ्या तिच्याजवळ गेले व "सुंदरी, लाडके, असें काय करतेस? तुला काय झालें ? कोणी तुला त्रास दिला?" अशा प्रकारें तिला विचारून तिचे अस्ताव्यस्त झालेले केस व पदर ते नीट करू लागले ! दशरथ ज्याप्रमाणें कैकयीची मनधरणी करताना देखावा दृग्गोचर होतो, तसाच देखावा इथें दिसत होता ! आज रंगाजीनें मुद्दामच इतर सर्व गिऱ्हाइकांस— आजारीपणाचे निमित्त सांगून—बंदी केली होती. लवकरच तिनें आपल्या कपटनाटकास सुरुवात केली. तात्याकडून बरीच मनधरणी झाल्यावर ती उठली व दुःखित, खिन्न अशा आवाजानें म्हणाली:—

" प्राणनाथ, आपल्या दासीवर—आपल्या चरणाच्या दासीवर—त्या मेल्यानें हात टाकून माझी अब्रू घेण्याचा प्रसंग आणावा ना ? " तात्या घाबऱ्या आवाजानें म्हणाले:—

"कोणी, कोणी तुझ्यावर हात टाकला? माझ्या लाडकीची अब्रू घेण्याचें साहस करावयास कोण नराधम धजला ? " मात्रा चांगली लागू पडत चालली, असें पाहून रंगाजी पुढें म्हणाली:—

" आपल्याच भावांनीं—गणपतरावांनीं !"

"काय म्हणतेस,गणपतरावांनीं?" तात्या ओरडून म्हणाले, "अरेच्या, तरी म्हटलें हा चोर अजून लग्न कां करीत नाहीं ? अशी दुसऱ्या बायकांची अब्रू घेण्यासाठीं नाहीं का ? आणि पुन्हां स्वदेशहिताच्या व परोपकाराच्या लब्यालब्या गप्पा मारतोय् ! थांब चोरा, तू काय समजून आहेस ? पण रंगे, काय ग, कशी ग त्यानीं अब्रू घेण्याचा यत्न केलान् ? आणि तू सुटलीस कशी ? इथें आला होता का तो मादरचोद ?" तात्यानीं अधीऱ्या आवाजानें पुढें विचारलें. मात्रा चांगलीच लागू झाली असें पाहून आंतल्या आंत रंगाजीला आनंदाच्या गुदगुल्या होऊं लागल्या व त्या तिच्या गालांवरहि दृग्गोचर झाल्या ! लडिवाळपणें त्यांच्या गळ्याभोंवतीं आपल्या कमनीय बाहूंचें वेष्टण टाकून हंसत हंसत तिनें अजून मात्रेचे दोन चार वळसे देण्यास सुरुवात केली:—

"हो पण, भारी बाई प्रश्नाची घाई! प्राणनाथ, किती हें आपलें मजवर प्रेम ! बाकी माझे भाग्य मोठें, म्हणूनच ह्या पायांची दासी होण्याचें मला लाभलें. किनी, आपण गावाला गेल्यापासून मला कसें तें चैन पडेना. किती दिवस गडे जाणें तें ! कसें मेले इतके दिवस राहवते पुरुषाच्या जातीला, कोणास ठाऊक ? "

" अग, मला काम होतें जरा, म्हणून गेलों होतो ! " तात्या म्हणाले, "कांहीं फार दिवस नाहीं झाले जाऊन. सारे आठच दिवस ! बर, पुढ सांग काय झालें तें ? "

" तेव्हां किनी " रगाजी लडिवाळपणें पुढें सांगू लागली, " मला चैन पडेना म्हणून दोन चार दिवसांपूर्वी सहज गेले होते त्या गणपतरावांच्याकडे चौकशी करायला इकडून नक्की केव्हां येणें होणार तें ! "असें म्हणून मध्येंच ललना लज्जेनें मुरकली! तात्या बिचारे ह्या तिच्या आविर्भावानें बेहोष होऊन गारच झाले! "रात्रीची अशी अकरा साडेअकराची वेळ होती, " ती पुढें सांगू लागली, " पण मला बाई चैनच पडेना कसें तें ! सारखी इकडची मूर्ति डोळ्यापुढें उभी राहून जिवाची तगमग होऊं लागली ! म्हणून थोडेसें बरें वाटावें म्हणून सहज हिंडावयास गेलें व येतां येतां गणपतरावांच्या बंगल्यावरून येत होतें. तेही जागे होते. तेव्हां सहज विचारावें म्हणून आंत गेले. तों मेल्यानें माझा हातच पकडलान् !–"

" अरे हरामखोर," तात्या खवळून म्हणाले, "पाजी, बेवकूब, सभावित चोरा, अशा दुसऱ्याच्या बायकावर हात टाकतोस काय ? माझ्या लाडकीची अब्रू घेऊ पहातोस काय ? पण या तात्याशीं गांठ आहे, समजलास ? तूं काय समजून आहेस ? चागली हड्डी नरम करीन म्हणाव. बरें, मग पुढें काय झालें ? " कांहींसे शांत होऊन त्यांनीं विचारलें.

" पुढें काय व्हायचें ? " ती म्हणाली, " तो माझी नाना तऱ्हेनें मनधरणी करू लागला. पैशाचें आमिष दाखविलेंन्. पण या पायाशिवाय मला अन्य दैवतच ठाऊक नसल्यामुळें मी त्याला कबूल होईना ! पण माझ्या सौंदर्याला मोहित होऊन, शेवटीं मेल्या त्या पशूनें जेव्हां माझी अब्रू घेण्याचाच प्रसंग आणलान् , तेव्हा मी ओरडलें; तशी ती पळाला बंगल्यांन ! "

" अहाहा ! लाडके, तुझें माझ्यावरचें किती हें अकृत्रिम प्रेम ! " तिच्या नाटकी बोलानें फसलेले तात्या गहिंवरून म्हणतात, " असो. परमेश्वरानेंच तो प्रसंग टाळलान् याबद्दल त्याचे आभारच मानले पाहिजेत ! "

" पण असा मजवर आलेला प्रसंग आपणांस स्वस्थ बसून पाहवतों ना ? " मात्रेचा शेवटचा वळसा देत ती म्हणाली !

" छे छे, सुंदरी, मला तो कसा स्वस्थपणें पहावेल ? मी त्याची चांगलीच खरडपट्टी काढून त्याला ऐसा लबे करतों, कीं कधीं देखली होती की नव्हती ! " बायकोच्या नथेंतून तीर मारणाऱ्या वीराप्रमाणें तात्या मोठ्या आवेशानें म्हणाले, " बच्चजी, माझ्याशीं—ह्या तात्याशीं गांठ आहे बरें ! तूं काय समजून आहेस ? " याप्रमाणें आपल्या कपट-नाटकाचा प्रयोग बहारीनें पार पडला या आनंदानें हर्षभरित झालेल्या रंगाजीनें आपल्या प्रियकरास सुदृढालिंगन दिलें व नतर तयार करून ठेवलेल्या सुदर पानांचा विडा त्यास खायला दिला, सुदर पुष्पांची माला त्याच्या गळ्यांत घातली,व लवकरच तीं दोघें आनदानें निद्रावश झालीं !

## प्रकरण २२ वें

# एक रम्य देखावा !

आमच्या गणपतरावानीं त्या दिवशीं अत्यत अलोट अशा मनोधैर्यानें आपल्या नीनिमत्तेच्या तपश्चर्येचा भग करावयास आलेल्या रगाजी—मेन-केस—रभेस—दूर लोटलें होतें. म्हणून काहीं ते अनतरावासारखे—( त्र्यंब-केश्वरीं पुरश्चरण करणाऱ्या आमच्या अनतरावास वाचक विसरले नसती-लच )—जितेंद्रिय ब्रह्मचारी नव्हते अथवा तृतीयप्रकृति पुरुषाप्रमाणें पौरुषहीनही नव्हते ! तारुण्याच्या ज्वानींत मुसमुसणारा तो एक साधा सभ्य गृहस्थ होता. त्यांतून सध्यां ते विधुरावस्थेंत असल्यामुळें तर त्यांस ती अविवाहित अवस्था किती कठीण जात असेल, याची ज्यांना तसा

अनुभव असेल त्यासच कल्पना होईल. तसेच, आमचे गणपतराव हे लीलेनें त्या दिव्य रात्रीं वर्णन केलेल्या प्राचीनकालीन ऋषिकुमारा-प्रमाणेंहि नव्हते. याचा दोष सर्वस्वीं त्यांच्यावरच येतो असें नव्हे. कारण त्यांच्या जुन्या खानदानीच्या घराण्यामुळे त्यांचें लग्न अर्थात् प्रीतिविवा-हाच्या तत्त्वावर थोडेंच होणार! त्यातूनही पुढे, प्रथम लागणाऱ्या प्रेमाचा उमाळा कसाबसा सगतीनें थोडाबहुत भरून निघावा, तर त्यास प्रारंभहि होण्यापूर्वी बिचाऱ्याची बायकोहि मरून गेली! यामुळे हृदयांतील उत्कट प्रेमाच्या दिव्य लहरी अजून तशाच वहात होत्या, त्यांचें अद्याप खरें दान व्हावयाचें होतें व त्याचा चित्तभ्रमर सध्या फारच उत्कटतेनें एका कमलिनीभोंवतीं गुंजारव घालीत होता!

गरीब बिचाऱ्या वेणूची स्थितीहि आम्ही मागें एकदां वर्णन केलीच आहे. हाय! हाय! नैसर्गिकपणे आपल्या शैशवावस्थेंत आनदानें क्रीड-णाऱ्या बालिकावर आपण आंधळ्यासारखे कांहीं प्रयोग करतों—लग्नाची कल्पनाहि ठाऊक नसता एखाद्या बाहुलीप्रमाणें तिचे लग्न लावतो—व अधरूढीच्या पिशाचिकेनें झपाटलेले आम्ही, दुर्दैवाने तिचें जर कांहीं बरें वाईट झालें, तर त्याच बालविधवेला हिडिसफिडिस करतो! अरेरे, आणि अत्यत क्रूरपणे, अमानुषपणे, तिच्या नैसर्गिक वृत्तीस प्रतिबंध घालून, तिचा यत्किंचित् पाय घसरल्यास आम्ही तिची वाभाडीं काढतो—आम्ही, विश्वयोषितांच्या माड्यातून लोळणारे व परदारा-गमन करणारे आम्हीच—तिच्या अब्रूवर उठतो! हाय! हाय! गरीब बिचाऱ्या बालविधवांनो! तुम्ही गरीब गायी आहांत. तुम्हाला जितका चारा व जितकें पाणी हे पक्षपाती शास्त्रकार—हे मांगहृदयी कसाई—पाजतील तितकेंच तुम्ही प्यायलें पाहिजें व त्यातच सतुष्ट राहिलें पाहिजे! तुमच्याच गोठ्यांतील तुमच्याच शेजारीं असणाऱ्या बैलांना दिवसांतून दहा वेळां पाणी व पन्नास वेळां चारा दिला जाईल, पण तहानेने तडफडून तुम्ही मेलांत तरी त्या बैलांच्या कैवाऱ्यांना तुमची बिलकूल दया येत नाहीं; अथवा जर करता तहानेनें जीव कासावीस होऊन तुम्ही एखाद्या पाण्याच्या टाक्यांत तोंड घातलेंत, तर तुमच्या कुसुमकोमल पाठीवर बडगे घालून हे तुम्हाला ठार करतील—करतात. तोंड दाबून असलेला हा बुक्क्याचा मार, सर्वसाक्षी परमेश्वरा, तुला पाहवतो ना!

तारुण्याच्या, यौवनाच्या बहारींत फुलणाऱ्या–हंसणाऱ्या आमच्या वेणूची स्थिति तर गणपरावाहूनहि जास्त कींव करण्यासारखी होती! साधुसंत किंवा नपुंसक याशिवाय जगांत अशी एकही व्यक्ति नाहीं कीं यौवनाच्या भरांत ज्यांना प्रेमाच्या गोष्टी सुचत नाहींत! आयुष्यांत असा एक काळ येतो कीं, ज्या वेळीं मनुष्य प्रेमवेडा बनत असतो!–प्रेमाशिवाय त्यास दुसरें कांहीं दिसत नाहीं! आमची वेणूही सध्या एखाद्या उमललेल्या कमलिनीप्रमाणें आपल्या प्रेमाचा सौरभ सर्वत्र पसरीत होती व तिचें चित्तकमल एका भ्रमरास आपल्या सौरभाची—आपल्यांतील मकरंदाची—लयलुट करण्यासाठीं जणों पाचारणच करीत होतें! गणपतराव व वेणू यांचा एकत्र सहवास आज वर्षसहा महिने होऊं लागला होता. दोघांनींहि अजूनपर्यंत यौवनांतील हृदयमीलनाचे अमृताची खरी गोडी चाखली नव्हती! अर्थात् दोघांच्याहि हृदयाचें लवकरच मीलन झालें. परंतु अद्याप तें मुग्धच होतें. हृदय हृदयाशीं बोललें होतें. मूक संभाषण झाले होतें. तथापि, अजूनपर्यंत कोणी कोणाजवळ प्रत्यक्ष बोलण्याचें धाडस केलें नव्हतें. पण अनुरागाची भाषा ही जिव्हेपेक्षां इतर हावभावांतच जास्त असते, हें कोणास ठाऊक नाहीं? त्याप्रमाणें एकमेकांनीं एकमेकांचीं हृदयें ओळखलीं होतीं, त्यांच्या प्रणयचेष्टांची मुग्ध बहार ते चाखीत होते! परंतु एकदां प्रत्यक्षपणेंहि याविषयीं संभाषण करण्याचा योग जुळून आला.

तो प्रातःकालचा समय होता! आदल्याच दिवशीं पौर्णिमा असल्यामुळें चंद्राचें आरक्त बिंब पश्चिम क्षितिजावर विलसत होतें! पचपच उषःकाल झाला होता! पूर्व दिग्वधू आपल्या पतीस पाहून त्या आनंदानें जणों गुलाल उधळीत होती! गणपतरावाच्या टुमदार बंगल्याच्या मागील बाजूस असणाऱ्या सुंदर बगीचांत हातांत परडी घेऊन फुलें तोडणाऱ्या ललनेच्या–वेणूच्या–गालावरही तो गुलाल येऊन पडला होता! सुंदरी एक गुलाबी पातळ नेसली होती! प्रातर्वायूच्या मंद मंद लहरी तिच्या मुक्त अशा अलकराजींशीं क्रीडत होत्या! पुष्पें गोळा करतांना वायुलहरींनें पदर खांद्यामागें गेला होता, त्यामुळें सुंदरीचें उन्नत वक्षःस्थल नितांत सुंदर असें विशेष खुलून दिसत होतें! तिची ती गौरकांति, ते तिच्या गालावरील गुलाब, वायुलहरींनें इतस्ततः विहरणारा तो मुक्त केशपाश,

तें गुलाबी पातळ, व या सर्वांसह रक्त रविकिरणांच्या सुखद दृश्यांत होणारे तिचे यौवनाच्या बहारींतील सहज विलास, गणपतराव बगल्यांतील खिडकींतून पहात होते ! इतक्यांत एक भ्रमर त्या उद्यानात गुगु असा मधुर गुंजारव करीत आला व ललनेच्या मुखकमलास जणों खरेंच कमल समजून त्याभोंवतीं आपल्या गुंजारवाचें गाणें गाऊं लागला ! सुंदरी भयभीत झाली व तिनें रागानें हातानें त्यास झिडकारून ती पलीकडल्या पुष्पांच्या ताटव्याकडे गेली. पण तो लोचट भुंगा पुन्हा तिकडेहि गेला ! तशी वेणूची फारच गाळण उडाली ! तिच्या कपाळावर घर्मबिंदु चमकूं लागले व अगदीं अवशपणें, " गणपतराव, हा पहा मेला भुंगा मला कसा त्रास देतो आहे तें ! " असे उद्गार तिच्या तोंडून मोठ्यानें बाहेर पडले. ही संधी चांगली आहे असें जाणून, " भिऊं नकोस. सुंदरी, हा मी आलोंच ! " असें म्हणून तो प्रेमवेडा युवक धांवतच निघाला ! लवकरच त्यानें त्या भुंग्यास घालवून दिल्यावर तीं दोघेंही एका बांकावर क्षणैक बसलीं !

" सुंदरी, तू फारच घाबरून गेलीस ! " गणपतराव म्हणाले.

" मेला तो भारीच त्रास देऊं लागला !" वेणूनें सस्मित उत्तर केलें.

" मग ह्या मुखकमलाचें आपण कुणाच भ्रमरास पान करून देणार नाहीं तर ? " गणपतरावांनीं हसत विचारलें.

या वेळीं वेणूनें लज्जेनें खालीं मान घातली !

" कां, सुंदरी, अशी तू मुग्ध कां ? या भ्रमराला तुझा प्रेममकरंद सेवावयास मिळेल काय ? तू माझ्याशीं पुनर्विवाह करण्यास तयार आहेस काय ? " तथापि वेणू कांहींच बोलली नाहीं. ती तशीच खालीं पहात राहिली. त्यावर किंचित् शंका येऊन ते म्हणाले, " वेणूबाई, माझा तुम्हाला विश्वास वाटत नाहीं काय ? पुनर्विवाहाच्या गोड आमिषाखालीं सुंदर अनाथ विधवांची अब्रू घेऊन त्यांना दुःखगर्तेत लोटणाऱ्या व पुन्हां उजळ माथ्यानें समाजांत वावरणाऱ्या नीच नरपशूप्रमाणें कदाचित् मी तुमची नागवणूक करीन, असें तुम्हांला वाटलें काय ? परंतु वेणूबाई, मी तुम्हांला वचन देतों कीं, तुमचा माझा विवाह होईपर्यंत पाहिजे तर मी तुमच्या देहास स्पर्शहि करणार नाहीं !" गणपतराव भलतीकडेच वाहवले असें पाहून वेणूबाई कृतज्ञतेनें म्हणालीः—

" छे, छे, गणपतराव, हें काय हें आपण भलतेंच बोलतां ! आपल्याविषयीं असा भलताच संशय घेण्यापेक्षां मी मेलेली बरें. प्राणनाथ, आपण ह्या दासीचा अंगीकार केलात. या गरीब गायीचा आपण उद्धार केलात, समाजाकडून होणाऱ्या त्रासाची पर्वा न करतां या दीन अबलेला हात देऊन आपण तिला प्रेमदान दिलेंत, या उपकारानें माझें हृदय भरून आलें——माझ्या तोंडांतून शब्द निघेना ! नाथ, यापेक्षां मी अधिक काय बोलूं ? "

" अहाहा, सुंदरी, आज मला तू स्वर्गीय सुखाचा प्रत्यक्ष अनुभव देत असून, तू एखाद्या दिव्य बालेसारखी सुंदर दिसत आहेस ! " गणपतराव हृदयाच्या उत्कटतेनें म्हणाले. या वेळीं सवित्याचें आरक्त बिंब पूर्वक्षितिजावर उदय पावले होतें! त्याचीं तीं ताम्रपीत कोमल किरणें सर्वत्र विखुरलीं होतीं ! " ये, सुंदरी ये " ते पुढे म्हणाले, " या सवित्यास साक्ष ठेवून आपण आपलें हृदयमीलन करूं या ! " असें म्हणून त्यांनीं सुंदरीचा हात धरला व दोघांनीहि अनन्य भावाने सवित्यास नमस्कार केला ! सवित्यानें हास्यमुखानें त्याच्या विवाहास परवानगी दिली ! नंतर त्या प्रेमबद्ध युगुलाच्या——आयुष्यांत प्रथमच प्रेमबद्ध झालेल्या त्या युगुलाच्या——किती गुलगुल गोष्टी झाल्या असतील व हास्यविनोदाची त्यांनीं किती बहार लुटली असेल, याची कल्पना वाचकांवरच सोंपवावी, हें बरे ! बोलतां बोलतां वेणू सहज म्हणालीः—

" बाकी, पुनर्विवाहापूर्वी कोणच्याहि विधवेनें पुरुषाशीं संबंध न ठेवण्याची खबरदारी घेतल्यास, पुढें त्यांना पश्चात्तापाची पाळी येणार नाहीं यांत शंका नाहीं. आणि तशी पाळी येणार नसली, तरी विवाहाच्या आधीं संबंध ठेवणाऱ्या विधुरविधवेचें लोकांत जें हसें होतें तेंहि वांचेल! "

" आणि ज्यांना इतकाहि काम आवरत नाहीं ते पशूच म्हणायचे! " गणपतरावांनीं सडेतोड उत्तर दिलें. " मग लग्न तरी कशाला करायचें? " याप्रमाणें गंभीर संभाषण व बराच निरागस प्रेमालाप झाल्यावर, मोठ्या कष्टांतःकरणानें दोघेंही उठलीं व आपल्या नित्याच्या कर्तव्यास लागलीं!

## प्रकरण २३ वें

# उपसंहार.

तात्यांनीं गणपतरावाची कानउघाडणी करण्याचा निश्चय केला व ते त्याप्रमाणे गणपतरावांस बरेंच बोलले, गणतरावानीं त्यांस परोपरीनें खरी हकीकत समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, 'रडकीच्या नादीं लागून तुमची पुरी नागवण होईल' असा परोपरीनें उपदेश केला, पण त्याचा त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाहीं. उलट ते रंगाजीच्या रंगांत जास्तच रंगले। रंगाजीनेहि त्यांना पुरें रंगवून त्यांना कफल्लक केलें, व आता त्यांच्यात कांहीं "रस" राहिला नाहीं असें पाहून एक दिवस त्याना हात धरून बाहेर घालविले, तेव्हां तात्यांचे पुरे डोळे उघडले व त्यांना कृतकर्माचा पश्चात्ताप झाला ! अन्नालाहि महाग झालेल्या आपल्या तात्यांची ती दैना पाहून गणपतरावांनीं त्यास मागील अपराधांची क्षमा केली ! "गणू, तू मला त्यावेळीं नानातऱ्हेनें सांगितलेंस, परंतु माझ्या डोळ्यावर त्या राडेने पुरी भुरळ घातली असल्यामुळे मी तुला नाहीं नाहीं तसें बोललों, त्याची मला क्षमा कर !" असें म्हणून खरोखरच तात्यांनीं गणपतरावांच्या पायांवर लोटांगण घातलें !

"छे छे, तात्या, हे काय ?" त्याना उठवीत गणपतराव म्हणाले, "चाललेंच आहे. त्यात क्षमा कशाची ? असो. आतांतरी चांगलें वागून खुशाल माझ्या इथे रहा बरें !" नंतर तात्या गणपतरावाच्या इथेंच राहिले व "वेश्या भोगा कवडा वेचे। मग दारही चेपूं नये तियेचें" ह्या ज्ञानोबांनीं वर्णिलेल्या "लाजिरवाण्या" स्थितीचा अनुभव घेऊन, पश्चात्तापानें पोळलेल्या आमच्या तात्यांनीं, पुनश्च आपणांस देशसेवेस वाहून घेऊन, विष्णुपंतांच्या कार्यांत त्यास मदत करण्यांत आपलें शेष आयुष्य घालविलें.

लवकरच गणपतराव व वेणूचा पुनर्विवाह झाला। महात्म्या योग्याचीहि त्याला पूर्ण अनुमति होती ! विवाहसमयीं दोन्ही घरची सर्व मंडळी व महात्मा हजर राहून त्यांनीं त्या वधूवरांचे मंगल चिंतिलें !

अनंतराव बारा वर्षांनीं पूर्ण तपःसिद्धि प्राप्त करून आले व नंतर शेष आयुष्य विष्णुपंतांना पूर्ण साह्य करण्यांत त्यांनीं घालविलें !

कृष्णाबाई लीलेपाशीं आस्थेनें व झपाट्यानें मॅट्रिकपर्यंत शिकल्या, व नतर त्यांनींही लीलेच्या कार्यास आजन्म हातभार लावला.

× × ×

चपूच्या आजन्म अविवाहित राहण्याच्या निश्चयाचें सर्वांना एकपरी आश्चर्य वाटलें. परंतु तिच्या हृदयांत जी कालवाकालव होत होती, ती तिची तिला ठाऊक! तिनेंहि दहापांच वर्षें, पुढे न शिकता, केवळ ईश्वर-चिंतनात व पश्चात्तापाच्या भडाग्नींत आपलें चित्त जाळण्यात घालविलीं व नतर सर्व जन्म अविवाहित राहून तिनें आपलें तनमनधन लीलेच्या कार्याच्या मदतींत वेचलें! अत्यत पवित्र असा तिचा दिनक्रम चालू होता. महात्म्याला हें पाहून सतोष वाटला!

× × ×

"अबलोन्नतिकार्यालय" आदिकरून सर्व सस्था सध्यां मोठ्या प्रमाणावर व सुरळीत चालल्या असून सर्व मडळी त्यांच्या उत्कर्षासाठीं तनमनधनें करून झटत आहेत!

समाप्त.

---

—मालेचें पुढील पुष्प—

"नवशिवोदय!"

ही उच्चविचारप्रवर्तक कादंबरी लवकरच प्रसिद्ध होईल.

—श्री ग. रा. साने, बी. ए. बी. टी. कृत—

"तरुणांचा तांडेल !" किं. ८८ या पुस्तकावरील

# कांहीं निवडक अभिप्राय

" १६ ते २४ वर्षांमधील तरुणांना सन्मार्गाला लावण्यासाठीं लेखकानें अंत करण पिळवटून या पुस्तकातील प्रकरणें लिहिलीं आहेत. आपल्या विधानाच्या समर्थनार्थ भगवद्गीता, दासबोध, वगैरे ग्रंथातील उतारे लेखकानें भरपूर दिले असून पाश्चात्य विद्वानाचेहि अभिप्राय मधून मधून दिलें आहेत हें पुस्तक मुलांना बोधप्रद होईल यात शंकाच नाहीं मुखपृष्ठावरील गदाधारी बलभीमाचें छायाचित्रहि मुलांना स्फूर्तिदायकच आहे "

—"त्रिकाळ"

" या पुस्तकात तरुणांना सध्याच्या बिकट परिस्थितींत कोणत्या शिक्षणाची जरूरी आहे याचा उहापोह करण्यांत आला आहे. भाषा साधी व सरळ असून विचार निर्दोष व पद्धतशीर आहेत. मधूनमधून योग्य स्थळीं टाकलेलीं थोर लेखकाचीं मोठमोठीं वचनें शोभून दिसतात. एकंदरींत पुस्तक तरुणतरुणींनीं अभ्यासावयास योग्य असून अवश्य संग्रहीं ठेवावें. "

—"मन्वंतर"

" मुलासाठीं सन्मार्गप्रवर्तक अशीं पुस्तकें रा. साने यांनीं पुष्कळ लिहिलीं आहेत. त्यात या पुस्तकानें चागली भर पडणार आहे ठाशीव लहान वाक्यें, सुभाषितें, अवतरणें, आवाहन देणारी लेखनपद्धति इ० वैशिष्ट्यामुळें नित्याचे नीतिपाठहि लेखकानें वेधक करून दाखविले आहेत. त्या पुस्तकाचा नीतिशिक्षणाचे कामीं चागला उपयोग होईल. "

—"आनंद"

" रा साने यास आपला विषय सुबोधपणें समजावून सागण्याची हातोटी चागली साधली आहे. शिक्षक व लेखक ह्या दोनहि नात्यानीं त्यांचें वाचन मोठें आहे. या पुस्तकात त्यानीं विद्यार्थ्यांना व तरुणाना उच्च भूमिकेवरून कळवळून बोध केला आहे आणि तोहि जे थोर सत्पुरुष, महात्मे व संत होऊन गेले त्याच्या शब्दानीं केला असल्यामुळें लहानानीं व तरुणानीं हें पुस्तक वाचलें असता त्यांना आपली स्वत ची सुधारणा करण्याची बुद्धि झाल्याशिवाय खास रहाणार नाही या तऱ्हेची मुलाच्या हातीं देण्यास सर्वस्वी योग्य पुस्तकें क्वचितच निर्माण होतात. '

—"केसरी."

"तारुण्याचा काल हा जीवनांत अत्यंत महत्त्वाचा जातो. तारुण्याचा काल म्हणजे नसानसांतून सळसळणाऱ्या रक्ताचाच काल तो अशा वेळींच त्यांना कोणी तरी सन्मार्ग दाखविणारा, त्यांच्या आशा, आकांक्षांना चांगलें वळण लावणारा हितोपदेशक हवा असतो आणि तें काम लेखकानें या पुस्तकाच्या द्वारें उत्तम प्रकारें केलें आहे शारीरिक, मानासिक, बौद्धिक, आध्यात्मिक शिक्षणाचें सम्यक् विवेचन करून स्वाभिमान स्वदेशाभिमान यांचें महत्त्व पटवून देऊन सरते शेवटीं तरुणाचें 'विवाहमंगल' करून लेखकानें हें पुस्तक पूर्ण केले आहे. सुगम भाषा, साधार विवेचन, व्यापक दृष्टि इत्यादि गुणानीं हें पुस्तक सजलेलें असल्यामुळें तरुणांनीं तें एकवार अवश्य लक्षपूर्वक वाचावें असें आमचें सांगणें आहे."

—"चैतन्य"

---

## शिवशाही ते पेशवाई ! ( सचित्र )
## भाग १ ते ४, किं. प्रत्येकीं ८४

"श्रीशिवाजीमहाराजांपासून शेवटच्या रावबाजीपर्यंतचा पद्यात्मक इतिहास शाहिरी थाटात व चटकदार भाषेंत या चार पुस्तकांत दिला आहे या पुस्तकावरून महाराष्ट्राचा इतिहास मुलें हसत खेळत शिकतील. प्रत्येक घरीं व शाळांच्या बालवाचनालयांतून हीं पुस्तकें अवश्य घेतलीं जावीं."

—"बालसन्मित्र."

---

## भारतवर्षाचा धार्मिक इतिहास ! ( सचित्र )
## किं. ४ रु.

पूर्वार्ध व उत्तरार्ध एकत्र बांधविलेल्या ह्या पुस्तकासंबंधीं प्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. वा. शि. कोल्हटकर आपल्या "चैतन्य" मासिकांत म्हणतात—

"हरिदास व पुराणिकांना हें पुस्तक वाचनीयच नव्हे, तर अभ्यसनीय आहे."

वरील सर्व पुस्तकें मिळण्याचा पत्ता:—

**गं. रा. साने,** १७, पेंडसे चाळ सदाशिव, टिळकरोड, पुणें २